# आयडियाज् आर् डेंजरस

राजू परुळेकर



प्रकाशिका :
सौ. सुप्रिया शरद मराठे
नवचैतन्य प्रकाशन
न्यू गजांत को. ऑ. हौ. सो. लि.
ब्लॉक नं. सी-११, तळमजला,
कोसांम्गोनगर, फ्लायओव्हरजवळ,
एस. व्ही. रोड, बोरिवली (प.) मुंबई ४०० ०९२.
दूरध्वनी : २८६४५२१२

—

© राजू परुळेकर

—

प्रथमावृत्ती : २६ नोव्हेंबर २००५

—

मुखपृष्ठ
मनोज आचार्य (विरार)

—

मुद्रक
सौ. शामला अनंत चिंचणीकर
माधुरी मुद्रण
४४३, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

—

मूल्य : १००/- रुपये

श्री. विजय तेंडुलकर यांस...

# भूमिका


'आयडियाज् आर् डेंजरस' या लेखसंग्रहात मी वेगवेगळ्या कालखंडात लिहिलेले आठ लेख समाविष्ट करण्यात आलेले आहेत. हे लेख वेगवेगळ्या विषयांशी संबंधित आहेत. वरवर पहाता त्यात विषयांचा खूपच वेगळेपणा असला तरीही त्यांना बांधून ठेवणारा एक आंतरीक धागा पक्का आहे. 'शिवसेना : भासमान आणि वास्तविक *(अक्षर : २००३)*' सारख्या लेखात आणि 'मराठ्यांचा जो भूतकाळ तोच त्यांचा भविष्यकाळ *(सामना : २००३)*' या लेखामध्ये ज्या समाजगटासंबंधी भाष्य केलेलं आहे तो समाजगट एकच आहे. काळाबरोबर या समाजगटाच्या रचनेमध्ये सतत बदल होतो आहे. परंतु लेखांमधली गृहितकं आणि निष्कर्ष आजही बदललेले नाहीत. हे लेख काही कालावधीनंतर वाचताना मला त्यात अजून खूप भर घालावीशी वाटली. ती भर या पुस्तकाच्या निमित्ताने लगेच इथे न घालता पुढे याच विषयांवर स्वतंत्रपणे विस्ताराने लिहीणे मला आवडेल. तरी काही ठिकाणी आवश्यक त्या संदर्भांमध्ये बदल केलेले आहेत.

'बाई, बाजार आणि पॉलिटीक्स ऑफ सेक्स *(अनुभव, मार्च : २००३)*' सारखा लेख लिहीताना व्यापारीकरणाचे जे पैलू ज्या समाजगटासंबंधी मनाला अपील होतात तेच पैलू अत्यंत वेगळ्या दृष्टिकोनातून 'माध्यमांच्या बूमवर झूम *(महाराष्ट्र टाइम्स, २००५ : दिवाळी)*' सारख्या लेखात माझ्यासमोर येतात. अशा वेळी एकाच

भूगोलाची वेगळी त्वचा आपण उघडत जातो आहोत, याची जाणीव होते. विश्लेषण करणं हे सर्जनसारखं काम असतं. मानवी शरीराची ॲनॉटॉमी तीच असते व सर्जनला फक्त प्रत्येक वेळी समोर येणाऱ्या शरीरातला उपचाराची गरज असलेला अवयव उघडत जावा लागतो. जग, देश, राज्य, समाज वगैरे तेच असतात. लेखकाला आपली गृहितकं निवडून नव्या सिद्धतेवर काम करत जावं लागतं. हे करताना स्वत:ला खूप एकाग्र करत जावं लागतं. हे लेखन लिहिताना मी काही नवीन सिद्धांत मांडलेले आहेत. माझ्या तर्क करण्याच्या पद्धतीची ती अपत्यं आहेत. माझ्या सिद्धांताचं कोणतंही 'स्कूल ऑफ थॉट' नाही किंवा कुठल्याही प्रचलित राजकीय तत्त्वज्ञानाच्या ते पलिकडे आहेत.

नवे सिद्धांत हे सर्वच प्रस्थापित व्यवस्थांना सुरुंग लावतात असं मानलं जातं. तसं झालं तर ते लेखनाचं सार्थक आहे मी मानेन. त्या अर्थानेच 'आयडियाज् आर् डेंजरस' हे नाव आहे. त्या नावाचा लेख या लेखसंग्रहात समाविष्ट आहे. तो स्वत:मध्येच स्पष्ट आहे. पुस्तकावर अधिक भाष्य करण्याचा अधिकार माझ्या वाचकांचा आहे !

हे पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल मराठे पती-पत्नींचा मी आभारी आहे.



# अनुक्रम


मराठ्यांचा जो भूतकाळ तोच त्यांचा भविष्यकाळ । १३

शिवसेना : भासमान आणि वास्तविक । २७

आयडियाज् आर डेंजरस । ६४

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि मुस्लिम प्रश्नाचं मूळ । ७६

बाई, बाजार आणि पॉलिटिक्स ऑफ सेक्स । ८५

कार्यक्षमता आणि नैतिकतेचा प्रवास । ९१

मराठी साहित्याचे धागे : उभे आणि आडवे । ९८

माध्यमांच्या बूमवर झूम । १०९

# मराठ्यांचा जो भूतकाळ तोच त्यांचा भविष्यकाळ

एकेकाळी मराठे हे जवळजवळ संपूर्ण देशाचे जेते होते. 'मराठ्यांचे साम्राज्य' असे ज्याचे वर्णन केले जाते ते साम्राज्य देशभर अस्तित्वात होते. पूर्ण अठरावे शतक हे मराठ्यांचे शतक होते. सातारा आणि पुणे येथे काय चाललेले आहे, यावर साऱ्यांची नजर असे. साऱ्या देशाच्या दृष्टीने त्या दोन राजधान्यांचे असाधारण महत्त्व होते. पुढे साताऱ्याचे महत्त्व कमी झाले आणि पुण्याचे महत्त्व वाढले. मराठ्यांच्या त्या साम्राज्याचे फार दूरगामी परिणाम देशाच्या राजकारणावर झाले आणि त्याहूनही भीषण परिणाम मराठ्यांच्या मानसिकतेवर झाले. हिंदुस्थानच्या इतिहासात मराठी मानसिकतेचे जे दोष आहेत, ते फक्त मुसलमानच जाणू शकतात. कारण त्या दोनच समूहांकडून इंग्रजांनी हिंदुस्थानी साम्राज्य प्रामुख्याने हिसकावून घेतलेले होते.

या देशातल्या मुस्लिम समाजाची मानसिकता समजावून घेताना एक महत्त्वाची गोष्ट समजून घेतली पाहिजे. ती म्हणजे हा देश आम्ही जिंकला होता. तो इंग्रजांनी आमच्याकडून जिंकून घेतला. पण स्वातंत्र्य

मिळाल्यावर आपण राज्यकर्ते समाज म्हणून मिरवू शकत नाही. ही खंत त्यांच्या मनाला पोखरत असते. त्यामुळे मुस्लिम मानसिकतेत एक प्रकारचा विचित्र अहंगंड *(म्हणजे खरे तर न्यूनगंड)* आणि विचित्र आक्रमक असुरक्षितता आढळून येते. भग्न असलेल्या आपल्या स्वप्नाचे तुकडे हा समाज वेचत असतो. त्या मानसिकतेतले धार्मिक अस्तर वजा केले तर नेमके असेच मराठी समाजाचे झालेले दिसत नाही काय? आपण तलवारीच्या बळावर राज्यकर्ते होतो. सभ्यपणाने मोगल बादशहाची आब राखली. अन्यथा दिल्लीसुद्धा आपल्याच कब्जात होती आणि अचानक आपण संपूर्णपणे बेदखल झालो. ती भावना आणि त्यातून येणारी आक्रमक असुरक्षितता आणि अहंगड *(म्हणजे न्यूनगंड)* मराठी समाजात खोलवर रुजला. इंग्रजांनी पुणे येथील जरीपटका उतरवून युनियन जॅक फडकावला तो १८१८ मध्ये. परंतु मराठी साम्राज्य खरे तर त्या अगोदर खूप काळापूर्वी खालसा झाले होते. मोठ्या साम्राज्यांचा बुडण्याचा दिवस असतच नाही. त्याअगोदर खूप काळापूर्वी त्याला एक एक भोक पडत जाते आणि हे भोक तपशिलातल्या पराभवाचे नसते; तर मानवी समूहाच्या स्वभावातल्या दोषाचे असते. आपण स्मशानातून जाताना जसे स्वत:ला 'भूत नसतेच' असे समजावत चालत राहातो, तसेच साम्राज्ये स्वत:च्या दोषांकडे दुर्लक्ष करत मार्गक्रमण करत राहतात आणि मग एके दिवशी बुडतात. तसे मराठी साम्राज्य १८१८ मध्ये बुडाले. त्यानंतरही एल्फिन्स्टनचा विरोध करण्यासाठी ब्राह्मण हजारोंच्या संख्येने गोळा झाले होते. पण ते आपण परदास्यात गेलो म्हणून निषेध करण्यासाठी नव्हे तर 'साहेब मजकुरांनी' आमचे रमणे (दक्षिणा) बंद करू नये म्हणून! सत्ता गेल्यावर मराठी समाजात लगेच बेदखल झाल्याची भावना आली असे नव्हे. चापेकरांपासून ते वासुदेव बळवंत फडक्यापर्यंत सर्वच क्रांतिकारकांना आपण त्या महान मराठी साम्राज्याचे वंशज आहोत असे वाटत असे. उलट आजचा मराठी समाज संपूर्ण देशात अगदीच बेदखल असल्याचे व दिल्लीपासून गल्लीपर्यंत इतिहास आणि भविष्य नसल्यासारखा चिडखोर आणि रडका झालेला दिसतो. हे तुटणे मराठी समाजात १९२० नंतर आले. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर मराठी समाज देशात आणि देशाच्या राजकारणात पूर्णत: पोरका झाला. तोपर्यंत एका अर्थाने 'पुणे' हे देशाच्या घडामोडींचे *(एकमेव नसले तरी)* एक महत्त्वाचे केंद्र होते. लोकमान्य गेले आणि हिंदुस्थानी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व महात्मा गांधींकडे गेले. त्यानंतर मराठी समाजाचा आवाज फक्त तक्रारखोर गाऱ्हाणी ऐकवण्यापुरताच देशात ऐकायला यायला लागला. राज्यकर्तेपणाची मिजास आणि रया पूर्णपणे गेली. मराठी समाजातले महान ऐतिहासिक दोष कायम होते, पण देशाच्या राजकीय

भविष्यावर प्रभाव टाकण्याची क्षमता त्यांनी पूर्णपणे गमावलेली होती.

मराठी समाजाच्या दृष्टीने इतिहासाचे तीन टप्पे पडतात. १९२० पूर्व आणि १९२० उत्तर. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडाची एक विभागणी. दुसरी त्यांच्या मृत्यूनंतर ते थेट १९२० पर्यंत. आणि त्यानंतर थेट आजपर्यंत अशा तीन टप्प्यांमध्ये ही विभागणी होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी समुदायाचे जे दोष हेरून त्यावर जे उपाय योजले होते त्यावर त्यांच्या मृत्यूनंतर लगेचच पाणी फिरवण्यास त्यांच्याच वंशजांनी सुरुवात केली. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या आयुष्याचा कालखंड संपूर्णपणे त्यातून वजा करून वेगळा करावा लागेल. कारण महापुरुष म्हणजे अखेर काय असते? महापुरुष म्हणजे आपल्या समाजाविषयी त्यांनी पाहिलेली स्वप्ने असतात. ती स्वप्ने प्रत्यक्षात आणण्याची शक्यता नष्ट करून आपण ज्या त्यांच्या जयंत्या करतो त्यापेक्षा ते महापुरुष त्यांच्या कालखंडातील प्रकट व प्रच्छन्न शत्रूंना आपले मित्र मानतील. त्यामुळे शिवकाल हा फक्त शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील त्यांच्या कर्तृत्वाची ३२-३४ वर्षेच. त्यानंतर आजतागायत तशी स्वप्ने कोणी पाहिली नाहीत, ना प्रत्यक्षात आणलीत. एक साधे उदाहरणच द्यायचे झाले तर सरंजामदारी नष्ट करण्याचे स्वप्न शिवाजीने पाहिले. आजही स्वतंत्र हिंदुस्थानातल्या स्वतंत्र महाराष्ट्रात सरंजामदारी सुखाने नांदते आहे. फक्त प्रत्येक पक्षाचे सरंजामदार वेगळे. यातच आनंद मानायचा झाला तर वेगळे.

मराठ्यांचे साम्राज्य देशात पसरलेले असताना देशभरातून वेगवेगळ्या प्रांतातून मराठ्यांना खंडण्या येत असत. काही प्रांतातले मांडलिक शासक खंडण्या चुकवण्याचा प्रयत्न करीत. त्यांना वठणीवर आणण्याचे हरतऱ्हेचे मार्ग अवलंबिले जात असत. मानवी इतिहासातल्या दंडशक्तीच्या वर्चस्वाचा तो कालखंड होता. परंतु त्याचे परिणाम दूरगामी झाले. संपूर्ण देशात मराठे आक्रमक लुटेरे आहेत हा समज खोलवर रुजला. जिंकलेल्या भागाच्या कायदा आणि सुव्यवस्थेपेक्षा जबरीने खंडणी वसूल करण्यातच त्यांना रस असतो ही मराठी राज्यकर्त्यांची प्रतिमा होती. गुजरात, मध्य हिंदुस्थान, बुंदेलखंडपासून ते थेट उत्तरेपर्यंत हा समज प्रभावी होता आणि खोलवर मुरलेला होता. 'मराठे आले' ही हाळी पुढे पुढे मोगलांना नव्हे तर रयतेच्याच मनात धडकी भरवू लागली. या उलट दिल्लीच्या दुर्बळ पातशहाशी मराठ्यांची मैत्रीच होती. इच्छाशक्ती असती तर दिल्लीचे तख्त उखडणे हे मराठ्यांसाठी काही तासांचे काम होते; परंतु तसे न करता मराठे हे पातशहाचे संरक्षक बनले होते. कोणाचा जर असा समज असेल की हिंदू विरुद्ध मुस्लिम शासक अशी सरळ लढाई जिंकून मराठ्यांनी साम्राज्य पसरवत नेले

होते, तर ते फारसे सत्य नाही. औरंगजेबानंतर ही लढाई अनेक पदरी झाली. त्यातले धार्मिक कडवेपण विरत गेले. कित्येक लढाया या मुस्लिम-मुस्लिम वा हिंदू-हिंदू शासकांमधल्या होत्या. फक्त व्यवहार एवढेच त्याचे स्वरूप मर्यादित होते. तात्पुरते शत्रू मित्र होत. मित्र शत्रू होत. पहिल्या बाजीरावाच्या आयुष्यात त्याने एकवीस मोठ्या लढाया केल्या आणि सर्व जिंकल्या. त्याच्या आईला *(राधाबाईला)* काशीयात्रेला सुरक्षित पोचवून परत सोडण्याची हमी एका महंमद खान बंगश या मुस्लिम मोगल सरदाराने घेतली होती. त्याने बाजीरावाला 'तुमची मातोश्री आम्हाला मातेसम' अशा प्रकारचे वचनही दिले होते. ते पुरेही केले होते. हे एक उदाहरण तेव्हाची राजकीय परिस्थिती कशी प्रवाही होती हे दाखविण्यासाठी पुरेसे आहे. पण या साऱ्याचा एकत्रित परिणाम मराठी समाजाच्या 'आज'वर कसा झाला हे बघणे फारच गुंतागुंतीचे आहे. आपण नेहमीच ऐकतो की, दिल्लीत मराठी माणसाला काही स्थान मिळत नाही. बाकी राज्यातले लोक मराठी माणसाकडे संशयाने बघतात. त्याची बीजे ही, मराठ्यांच्या इतिहासातील त्यांनी सुव्यवस्था लावण्याची मेहनत घेऊन मांडलिक जनतेला चांगले शासन न देता वतने आणि खंडण्या वसूल करण्यावरच सर्व भर दिला आणि अशाच तऱ्हेने साम्राज्य पसरवण्याचे स्वप्न पाहिले, त्यात आहेत.

राजधानी पुणे आणि परिसर सोडला तर साम्राज्यातील रयतेचा *(म्हणजे जनतेचा)* समग्र विचार करण्याची सूक्ष्म, मर्मग्राही आणि विलक्षण दूरदृष्टी शिवाजी वगळता अन्य कोणत्याही मराठी राजाने दाखविली असे *(मनापासून)* म्हणता येत नाही. बऱ्याच प्रमाणात राजकारणाची दूरदृष्टी पहिल्या बाजीरावात होती. परंतु त्याचे आयुष्य चाळीस वर्षांचे होते. विसाव्या वर्षी तो पेशवा झाला. मिळालेल्या वीस वर्षात तो देशभर एकवीस लढाया लढत फिरला. सर्व लढाया तो जिंकला. दिल्लीच्या दिशेने मराठी फौजा नेऊन उत्तरेवरच मराठी साम्राज्याचा अंमल बसवणारा तो पहिला मराठी माणूस. पण शिवाजी महाराजांचे स्वप्न दिल्ली ताब्यात घेण्याचे होते. ते इत:पर मराठी मनात जिरून गेले होते. त्यामुळे त्याचे स्वप्न दिल्लीला वेढा घालून बादशहाकडून सनदा मिळविण्याचेच होते. मराठी माणसामध्ये शासन करण्याची समग्र क्षमता नाही, हा समज मराठी साम्राज्याच्याच काळात देशभरात पसरला. मोगलांनी हिंदुस्थानवर राज्य केले त्या काळात देशात मोगल कला, वास्तुशिल्पे, खाद्यसंस्कृती, चित्रकला, संगीत, नगररचना, भाषासंस्कृती वगैरेवर आपली अमिट छाप सोडली. औरंगजेबासारख्या धर्मवेड्या व कडव्या बादशहाऐवजी जर दारा शुकोह दिल्लीचा बादशहा होता तर हिंदुस्थानी इतिहासात मोगल आणि मुस्लिम संस्कृती संपूर्णपणे एकजीव होऊन गेली

असती. अकबराने संपूर्ण आयुष्यात एक शासक म्हणून त्याची पायाभरणीही केली होती. पण औरंगजेबामुळे या साऱ्यालाच वेगळे वळण लागले. परंतु मराठ्यांच्या साम्राज्याबाबत अगदी प्रेमाने आपण लिहायला गेलो तरीही देशभर आपण कोणत्या कला, वास्तुशिल्पे, खाद्यसंस्कृती, चित्रकला, नगररचना, भाषासंस्कृती नेल्या ? उत्तर- एक मोठे शून्य. आपण मराठी समाज म्हणून एका भविष्यदर्शी संस्कृतीचे जतन करण्यास पूर्णत: अपयशी ठरलो. त्याची भरपाई आपली काटक, कष्टाळू आणि प्रामाणिक वृत्ती करू शकत नाही. मग आपण प्रामाणिक आहोत म्हणून आपली प्रगती होत नाही असा समज आज पद्धतशीरपणे पसरवून आपण स्वत:लाच फसवतो. आपली पीछेहाट आपल्या प्रामाणिकपणामुळे झालेली नसून शासकाला आपली भविष्यदर्शी संस्कृती निर्माण करावी लागते, ती करण्याची सृजनक्षमता आपण आपल्या इतिहासात दाखविल्यानेच आपली पीछेहाट झालेली आहे. मोगल साम्राज्य होते म्हणताना आपण जाऊन ताजमहाल बघतो. मोगल शैलीतली चित्रे बघतो. अनेक बागा, रस्ते, पंतप्रधान भाषण देतात तो लाल किल्ला अशा आपल्या जीवनात आलेल्या असंख्य गोष्टी... ब्रिटिशांचे साम्राज्य म्हटल्यावर आज आपल्या आयुष्यात आलेले कायदे, व्ही.टी. स्टेशन, रेल्वे, आजही वापरात असलेले असंख्य रस्ते, पूल, इंग्रजी भाषा, आपल्या खाण्याच्या सवयी, काटे-चमचे अशा असंख्य गोष्टी. आता अशाच पद्धतीने मराठी साम्राज्य जे देशात सर्वदूर पसरलेले होते त्याबद्दल आपण काय सांगू शकतो ? आपण आपले अत्यंत तटस्थपणे अवलोकन केले तर काय दिसते ? आपल्यामध्ये व्यवस्थेवर छाप सोडण्याची क्षमताच नाही. हे व्यक्तींबद्दल नाही. एकेकट्याने असंख्य मराठी व्यक्ती कर्तृत्ववान असतील. पण समाज म्हणून मराठी माणसाची भूतकाळात राज्यकर्ते असतानाही छाप सोडण्याची क्षमता अत्यंत कमी होती. खरे तर वकूवच कमी होता असे खेदाने म्हणावे लागते. मराठी समाजातले हे दुर्गुण छत्रपती शिवाजी महाराजांनी अचूक ओळखले होते. म्हणूनच त्यांनी राज्याभिषेक करून घेतला, नाणी पाडली, कलाकारांना प्रोत्साहन दिले, सरंजामदारी मोडून काढली, अष्टप्रधान मंडळ नेमले. समुद्रात किल्ले बांधले, आरमार उभे केले, व्यवस्था घडवण्यात आणि तिच्यावर शासक म्हणून मांड टाकण्यात मराठी समाज यशस्वी व्हावा म्हणून पायाभरणी केली. परंतु राज्य म्हणजे जमीन नव्हे हे त्यांच्यानंतर कोणीच ओळखले नाही.

राज्य आणि अधिकार जमिनीवरच्या अधिकाराने येतात. ते मुळातच फार कमी असतात आणि सत्ता जाताच ते सारे लयाला जाते. सत्ता म्हणजे रयतेच्या आयुष्याला सुखमय आणि स्वप्नमय बनवणाऱ्या व्यवस्था, साहित्य, संस्कृती, कला यांचे नव्याने

जतन करणे. हे करण्यात मराठी समाज कायमच अपयशी ठरला आणि मग त्या 'दिवाळखोर कल्पकतेचा' दोष आपण ''नियतीच्या मनातच हा समाज पुढे येऊ नये असे होते,'' पासून ते 'इतर समाजाप्रमाणे अप्रामाणिक नसल्यानेच मराठी समाजाची पीछेहाट झाली' अशी 'कल्पकता' दाखवून नियतीला दिला. वास्तविक ब्रिटिश समाज हा शिस्तबद्ध आणि प्रामाणिक असल्यानेच मूठभर संख्येने असूनही दीडशे वर्षे आपल्यावर राज्य करू शकला. ब्रिटिश समाज राणी आणि राजघराण्याला देवासम मानणारा पारंपारिक असला तरी समाज म्हणून तो अजिबात व्यक्तिपूजक नाही. आणि व्हिक्टोरिया राणीसारखी अतिसामर्थ्यशील राणी सर्व ब्रिटिश साम्राज्यावर राज्य करीत असतानाही तिची पराकोटीची टवाळी करण्यात ब्रिटिश माणूसच आघाडीवर असे. एवढेच काय, तर तिची खरी-खोटी *(पंतप्रधानांसोबतची)* प्रेमप्रकरणे, लफडी, कुलंगडी छापून येत आणि लोक त्यातही रस घेत. त्याबाबत ब्रिटिश माणूस उगाचच हळवा कधी झाला नाही की सर्वशक्तिमान राणीनेही त्यावर कधी बंदी आणली नाही. अर्थात बंदी आणली असती तर ब्रिटिश माणसाने ऐकलेही नसते. याचा त्यांच्या व्यवस्थेवर दूरगामी परिणाम झाला. एल्फिन्स्टन परत गेला किंवा लॉर्ड क्लाईव्ह परत गेला किंवा १८५७ च्या बंडात जनरल हॅवलॉक मारला गेला म्हणून ब्रिटिश राज्य बुडाले असे झाले नाही. याउलट मराठ्यांचा माधवराव पेशवा गेला की, रियासतकारांनी 'मराठ्यांचा कधी भाग्योदय होऊच नये असे नियतीच्या मनात असावे असे वाटते,' असा गळाच काढलेला आढळतो. ही अशा प्रकारची व्यक्तिपूजा वा विभूतिपूजा ज्या समाजात इतक्या टोकाला पोहोचते तो समाज एकीकडे नियतीवादी आणि दुसरीकडे अत्यंत अकार्यक्षम होणारच. मराठी समाजाच्या अपयशाची कारणे शोधताना आपण आपल्यालाच फार फसवतो. आपण आपल्याच भावना न दुखावण्याची काळजी घेतो. वास्तविक ज्या हिंदुस्थानी मुस्लिम समाजाच्या वर्तणुकीला आपण आज नावे ठेवतो त्यांचेच आपण खरे सहप्रवासी आहोत.

पारतंत्र्याच्या कालखंडात ज्यांच्या दूरदृष्टीविषयी आणि नवीन संस्कृती घडविण्याच्या जिद्दीविषयी काही लिहिणे हे अत्यंत आनंददायक होईल ते म्हणजे लोकमान्य टिळक. लोकमान्यांना या समाजाच्या मर्यादांची अचूक जाणीव होती. 'ओरायन' आणि 'गीतारहस्य'सारखे ग्रंथ त्यांनी लिहिले त्याची प्रमुख कारणे हीच होती. नवसंस्कृतीचा प्रसार केल्याशिवाय कोणत्याही सत्तेला खऱ्या अर्थाने आपली मुळे रुजवता येणार नाहीत आणि जुन्या सत्तेला आव्हान देता येणार नाही याची जाणीव लोकमान्यांना होती. आणि ही नवसंस्कृती अधिक प्रगत आणि अधिक सुसंस्कृत

असायला हवी. म्हणूनच लोकमान्यांनी 'ओरायन' हा ग्रंथ लिहिला. जेणेकरून आपण समाज म्हणून आत्मविश्वासाने उभे राहावे. परंतु लोकमान्यांनंतर समाज आत्मविश्वासाने उभा न राहता अहंगंडानेच भारला. लोकमान्यांचे प्रयत्न फुकटच गेले. हा अहंगंड समाजामध्ये एकाच वेळी आततायी आक्रमकता व थंड निष्क्रियता निर्माण करतो. पुढच्या काळात नेमके हेच झाले.

याचा अर्थ मराठी समाजात या काळात इतर सर्व क्षेत्रात जगभर आपली छाप टाकणाऱ्या व्यक्ती निर्माण झाल्या नाहीत असे नव्हे. रानड्यांपासून फुल्यांपर्यंत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून ते आनंदीबाई जोशींपर्यंत असंख्य श्रेष्ठ प्रतीची माणसे समाजात निर्माण झालीच; ज्यांचे मानवी संस्कृतीवरच ऋण आहे. पण याचा मराठी राजकीय सत्तासंस्कृतीवर फार थोडा परिणाम झाला. अल्बेरुणी किंवा उमर खय्यामसारख्या महापंडित व महाकवीवरून *(अनुक्रमे)* अरब आणि तुर्कांच्या राजकीय सत्तासंस्कृतीविषयी भाष्य करता येत नाही. केले तर चुकते. तसेच हे आहे. एकेकट्याने लाखो माणसे गुणी असल्याचे मान्य करूनही समाज म्हणून जी राजकीय सत्तासंकृती निर्माण झाली तिचा काही चेहरा असा सकारात्मक असल्याचे दिसत नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी समाज एकंदरीतच देशाच्या सत्तासंस्कृतीत मागे पडत गेला. इतर समाज - प्रांतात मराठी माणसाबद्दल जी भावना आहे त्याला ही अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन झाल्यावर मुंबई महाराष्ट्रात आली आणि आजचा बृहत् महाराष्ट्र बनला. त्या दिवसापासून आजतागायत कोणत्याही राजकीय पक्षाने राज्य म्हणजे खरोखरच काय असते त्याचा विचार केलेला नाही. राज्य म्हणजे विधानसभा जिंकणे नव्हे. विधानसभा जिंकल्यावर काय? हे न कळल्यावर मग विधानसभा हरणे येते. मग हे चक्र सुरू होते. राज्य म्हणजे संस्कृतीचा फैलाव. देशात जेवढा तुमच्या संस्कृतीचा फैलाव होईल, आपोआप राज्य फैलावेल, एवढा सरळ त्याचा अर्थ असतो. आपण भुकेला इडली-सांबार वा डोसा-उत्तप्पा खातो. ती संस्कृती असते. खाद्यसंस्कृती, वास्तुशिल्पे, चित्रकला, साहित्य, कला यांच्याद्वारे संस्कृती पसरते. त्यामुळे ही संस्कृती समृद्ध आणि सर्वसमावेशक करत न्यावी लागते. हिंदी साहित्याच्या तुलनेत *(काही अपवाद वगळता)* मराठी साहित्य पाहिले-वाचले की रडूच येते. मराठी साहित्यात राजकीय भान अपवादानेच आढळते. मराठी कवीसुद्धा प्रेयसीच्या 'ब्रा'च्या एम्ब्रॉयडरीचे पॅटर्न कवितांमधून शोधण्यात मग्न झालेले दिसतात. आपल्या लोकप्रिय कवितांमध्ये 'तुमचे आमचे सेम असते' अशा धेडगुजरी कविता

येतात. तर अशा अविकसित संस्कृतीला सर्वसमावेशक आणि उत्तुंग बनवणारे राजकीय नेतृत्व लागते. त्याचा तर महाराष्ट्रात पार अभावच दिसतो. स्वातंत्र्यानंतरच्या छप्पन्न वर्षांनंतरच्या महाराष्ट्रातल्या राजकीय नेत्यांशी बोलायचे झाल्यास कोणत्या विषयावर बोलावे हे कळत नाही. नगरसेवकापासून ते खासदारांपर्यंत अत्यंत थोडे अपवाद वगळले तर सर्व पक्षांचे जननेत्यांचे समकालीन जगाविषयीचे अज्ञान बघून तोंडात बोट घालण्याची वेळ येते. ''या भूमंडळाचे ठायी। धर्म रक्षी ऐसा नाही। महाराष्ट्र धर्म उरला काही। तुम्हांकरिता॥'' असे म्हणणाऱ्या समर्थ रामदासस्वामींच्या कल्पनेतला जो महाराष्ट्र धर्म होता ती राजकीय सत्तेच्या जोडीने पसरत जाणारी एक वैभवशाली संस्कृती होती. ज्याची बीजे त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखविली होती. जगाच्या इतिहासात राज्य करू पाहणाऱ्या कुठच्याही समाजाला स्वत:ची संस्कृती अत्यंत बलशाली आणि वैभवशाली बनवावीच लागते. ज्ञान-विज्ञानाबाबत उत्तुंग असल्याशिवाय राज्यकर्ता समाज म्हणून आपण मान्यता पावूच शकत नाही. मराठी समाज 'स्वान्तसुखाय' भूमिकेत आपण अजूनही बिहार आणि उत्तर प्रदेशाच्या तुलनेत पुढे आहोत अशा सुखात राहू इच्छितो. आपले नेतेसुद्धा आपल्या 'प्रगतीशील राज्या'च्या भ्रमाच्या समर्थनार्थ आपल्याला हेच समजावतात. आपण हे समजून घेतले पाहिजे की यांच्याशी आपण आपली तुलना करू इच्छित असू तर आधुनिक जगात ते बुडणारच आहेत. आपल्यालाही बुडायचे आहे का? पुन्हा हिंदी भाषेचा प्रवाह मराठीहून खूपच सशक्त आहे याचाही एक परिणाम आपण ध्यानात घ्यायला हवा. कारण मग संस्कृतिसंघर्षात आपल्याहून सुधारण्याची संधी त्यांना जास्त मिळणार आहे.

ज्या दंडशक्तीच्या बळावर मराठ्यांनी साम्राज्य मिळवले होते, ती दंडशक्ती आज मराठीजनांना विषासम ठरते आहे. आज महाराष्ट्रातल्या प्रत्येक राजकीय पक्षांची दंडशक्तीवर *(आणि फक्त दंडशक्तीवरच)* भिस्त आहे. लोकांना घाबरवू शकणाऱ्या व त्या जोरावर मतपेट्या कब्जात ठेवणाऱ्या बिनडोक गुंडांवर राजकीय पक्षांचा शहाणपणा आज अवलंबून दिसत आहे. *(या संदर्भात संपूर्ण देशावरच लिहिता येईल. पण तो वेगळ्या लेखाचा विषय आहे.)* वास्तविक ही विनाशाची पदचिन्हे आहेत. ज्या काळात दंडशक्ती ही सर्वंकष सर्वव्यापी होती, त्या काळातही कोणी साम्राज्ये पसरवली ते जाणून घेण्यासारखे आहे. त्याहीपेक्षा ताब्यात घेतलेल्या जमिनींचे खंड म्हणजे साम्राज्ये असे न मानणाऱ्यांनी साम्राज्ये आणि खऱ्या अर्थाने संस्कृतीच टिकल्या, त्या कोणाच्या होत्या हे जाणून घेणे रंजक तर आहेच. पण आपल्या आजच्या आणि

आजपर्यंतच्या दिवाळखोरीचे भेदक दर्शनही त्यातून घडते.

मोगल साम्राज्याचा संस्थापक बाबराने लिहिलेले त्याचे 'बाबरनामा' हे आत्मचरित्र वाचले की, त्याचा साम्राज्य म्हणजे काय? इथल्या समाजाचा साकल्याने तो कसा विचार करतो, इथल्या जनमानसाच्या त्रुटींचा त्याने कसा विचार केलेला आहे, हे सारे लक्षात येते. या साऱ्याचा अतिशय बारकाईने विचार करून त्याने हे सारे लिहून ठेवलेले आहे. मुहंमद तुघलक हा गणित, तर्क, काव्य, न्यायशास्त्र यातला महापंडित होता. तैमुरलंगानेही स्वत:चे आत्मचरित्र लिहिले आहे. तेही तितकेच आश्चर्यकारक आहे. औरंगजेबाचा 'रूकायत-इ-आलमगिरी' हा पत्रसंग्रह पहावा आणि तो किती अष्टपैलू होता ते ठरवावे. इंग्रज हे समकालीन, इतरांपेक्षा ज्ञान-विज्ञान-संस्कृतीच्या बाबतीत वरचढ होतेच, शिवाय अधिक न्यायप्रिय व सर्वसमावेशकही होते. ही सर्व उल्लेखिलेली सर्व माणसे व त्यांच्या सत्ता सैन्यबळ व दंडशक्तीच्या जोरावर अभेद्य होत्या आणि काळ ज्ञानयुगाच्या उपासनेचा *(आजच्यासारखा)* नव्हता. तरीही या इतिहासात बदनाम असलेल्या माणसांना आणि सत्तांना त्याही काळात दंडशक्ती ही त्यांच्या साम्राज्याची आत्मिक शक्ती म्हणून वापरता आली नाही. ती आत्मिक शक्ती न्याय, साहित्य, कला, संस्कृती यामध्येच होती. आणि मुख्य म्हणजे त्याची त्यांना अचूक जाण होती. त्यातले काहीही, कोणतेही विजय वा पराभव योगायोगाने आलेले नाहीत. मराठी माणसाचा ऐतिहासिक पराभव आणि खचलेपण इथेच लपलेला आहे आणि हा नियतीच्या इच्छेचा भाग नसून ती या समाजाचीच इच्छा आहे. साम्राज्याच्या काळात मराठी समाजाकडे *(छत्रपती शिवाजी महाराज वगळता)* ही आत्मिक शक्तीच नव्हती. त्यामुळे वतने व खंडण्या मिळवण्यातच त्यांच्या साम्राज्याचा अर्थ सामावलेला होता. आज जेव्हा दंडशक्तीचा अंतर्गत राजकारणात जगभर अर्थच उरलेला नाही वा त्याला काहीच नैतिक प्रतिष्ठा उरलेली नाही अशा वेळी आपले संपूर्ण मराठी समाजाचे अस्तित्वच दंडशक्तीने व्यापलेले आहे. ज्यांना जगातल्या कोणत्याही *(अगदी मराठीसुद्धा)* भाषेतल्या एकाही पुस्तकाचे नाव सांगता येणार नाही असे 'ग्रामसिंह' आमच्या शास्त्रज्ञांचे भवितव्य ठरवत आहेत.

आजही मराठी समाजात नवीन संस्कृती प्रसवू शकणाऱ्यांची अजिबात कमी नाही *(तशी ती कधीच नव्हती)*. पण समाजाच्या नेमक्या आजाराचे निदान कधीच झालेले नाही. ''मराठी माणूस मराठी माणसाचे पाय ओढतो म्हणून तो मागे पडतो.'' पासून ते ''मराठी माणसाला उद्योग-धंद्यात गती नाही म्हणून तो मागे पडला'' पर्यंत अनेक प्रकारचे चुकीचे निदान केले गेलेले आहे. समाजातल्या उत्तम प्रतीच्या गुणी

माणसांच्या गुणांचा समुच्चय साऱ्या समाजाची ललाटरेखा बदलू शकत नाही हे शक्यच नाही. परंतु सर्वांत मोठी समस्या हीच आहे की, मराठ्यांची संपूर्ण राज्यसंस्कृती पराकोटीच्या ढोंगावर उभी आहे. त्यात सुसंस्कृतपणापासून ते शालीनतेपर्यंतची सारी ढोंगे येतात आणि आणि ही सारी ढोंगे असल्यामुळे त्यात आत्मिक ऊर्जाच नाही. त्यामुळे कुणाही गुणी माणसाची क्षमता आणि गुणांचा समाजाच्या एकंदरीत शक्तीत विलय होत नाही. पर्यायाने समाज उत्तुंग न होता खुजा होत जातो आणि आज तर इतिहासात कधी नव्हे एवढ्या खुजेपणाकडे आपण मार्गक्रमणा करीत आहोत.

'महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले' वा 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री' वगैरे भावूक विधानांनी आपली समाज म्हणून स्वत:बद्दलची कल्पना अवास्तव झालेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन लोकोत्तर पुरुषांबाबत असे म्हणता येईल की, त्यांच्यामुळे देशाचे भागधेय बदलले. परंतु त्या तिघांचेही कर्तृत्व जे होते, ते व्यक्तिगत होते. त्यांच्या समाजात जे समाजवर्तन होते आणि जे सर्वमान्य होते, त्याच्या विपरीत वागून या तिघांनीही आपले स्थान निश्चित केले. त्यामुळे या तिघांच्याही मृत्यूनंतर मराठी समाज होता तिथेच गेला. मुळात तो इतका स्थितीवादी होता की, जागेवरून हललाच नव्हता. डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर मराठी समाज तर त्यांच्या लोकोत्तर कर्तृत्वाला पुढे नेऊ शकला नाहीच. मराठी दलित समाजही पुन्हा आपल्या सर्व दोषांकडे परतला. कांशीराम आणि मायावती आज देशातल्या दलितांना नेतृत्व देण्याची भाषा करतात. हे खरे तर डॉ. आंबेडकरांचा वारसा असलेल्या मराठी समाजाला शक्य होते. पण बीएस फोर आणि बामसेफ वगैरे सुरू करण्याची कल्पकता अखेर कुणाही मराठी माणसाने दाखविली नाही. त्यामुळे आपल्याविना राष्ट्रगाडा वगैरे काही अडणार नाही. किंवा नेहरूही सह्याद्री आपल्या मदतीला धावून कधी येणार या प्रतीक्षेत नव्हते. या कल्पना ऐकायला बऱ्या असतात, पण त्यातून समाजाचा विकास होत नाही. असाच एक भ्रम आपल्या मनात आपल्या प्रगतीशीलपणाविषयी आणि पायाभूत सुविधांच्या विकासाविषयी आहे. महाराष्ट्राचा जो काही विकास आहे त्यात मुंबई बंदराचा मोठा वाटा आहे आणि या मुंबई बंदराचा आणि सोबत मुंबई शहराचा जो काही विकास आहे आणि जो काही वैभवशाली इतिहास आहे तो ब्रिटिशांनी घडवलेला आहे. व्ही. टी. स्टेशनचे नामकरण छत्रपती शिवाजी टर्मिनस असे करण्याव्यतिरिक्त आपण मुंबईच्या स्थितीत काही फारसा बदल करू शकलो नाही. उलट आपण मुंबईचे शोषण करून ते जगातले भयानक आणि बकाल शहर करून सोडले. ब्रिटिश असताना सिमेंटचे रोज धुतले जाणारे रस्ते असणारे

हे शहरच आपण सर्वांनी मिळून धुण्याचे ठरविले आहे. मुंबईत चालता येणे मुश्कील आहे. गाडी चालविणे तर दूरच. 'पर्यावरण' हा शब्द तर उच्चारण्याची लाज वाटावी. परिस्थिती अशी आहे की, गवालिया टँकवरून उलट ब्रिटिशांना 'चले आव' अशी साद घालावी आणि 'चले आव'चे आंदोलन सुरू करावे. उर्वरित महाराष्ट्राचा जो विकास आहे तो कसला? महाराष्ट्रात उन्हाळ्यात भीषण वीज कपातीचे संकट असते. लोडशेडिंग आणि पाण्याचे टँकर याव्यतिरिक्त जनतेच्या काहीच नशिबी नसते. पश्चिम महाराष्ट्रात काही विकासक्षेत्रे उभी राहिली. त्यातली बरीच सहकार चळवळीतून व काही साखर व संत्री, द्राक्ष उद्योगातून उभी राहिली. पण हा विकास अत्यंत आत्मकेंद्री, विषमतेला वाढवणारा व अंतत: सरंजामदारीच वाढविणारा होता. त्याचे परिणाम सामाजिक होते, तसेच राजकीयही होते. जुन्या काळातल्या सरदाराप्रमाणे *(अधिक अचूक बोलायचे झाले तर पेंढाऱ्याप्रमाणे)* एरियाबरहुकूम राजकीय माफिया निर्माण झाले. त्यांनी महाराष्ट्र आपापसात वाटून घेतला. सर्वच्या सर्व राजकीय पक्षांनी त्याबाबत एकमेकांना सहमती देऊन आपण खऱ्या अर्थाने 'प्रगतिशील' आहोत हे सिद्ध केले. आज महाराष्ट्रातल्या कोणत्याही जिल्ह्यात, तालुक्यात जा. तिथे काय दिसते? तिथला कोणी ना कोणी राजकीय भाई वा दादा असतो. एका पक्षाकडे 'भाई' असेल तर दुसऱ्याकडे 'दादा' असतो. जिल्हा सुरू होताच त्यांची पोस्टर्स, होर्डिंग्ज दिसू लागतात. ही होर्डिंग्ज म्हणजे रयतेला सावधानतेचा इशाराच असतो. बाया-बापड्यांना सांभाळून राहण्याची ताकीदच असते. होर्डिंग्जवर जिल्ह्यापासून ते खुर्द - बुद्रुकपर्यंतच्या सर्व राजकीय सरंजामदारांचे फोटो, किमानपक्षी नावे तरी असतात. हे सारे त्यांच्या वर्चस्वक्षेत्राच्या व भयाच्या प्रमाणात असते. फोटोचे व नावांचे आकार त्याबरहुकूम लहान-मोठे होत जातात. या सर्व होर्डिंग्जवर महाराष्ट्रातल्या आपापल्या पक्षाच्या सर्वोच्च *(भय निर्माण करणाऱ्या)* नेत्याचा अशीर्वाद घेऊनच केले असल्याचे होर्डिंग्ज व पोस्टरवर नमूद केलेले असते. हा महाराष्ट्राचा राजकीय विकास आहे का? त्या नवसरंजामदारीत जनता कुठे आहे? त्यातून काही भीषण गमतीही घडतात. मुंबईत दादर भागात शिवसेनाभवनाच्या समोर स्वातंत्र्यदिनामित्त काही कापडी फलक झळकत होते. त्यात वर 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणार - लोकमान्य टिळक' असे लिहिलेले होते. आणि खाली 'स्वदेशी हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच - शरच्चंद्रजी पवार' असे लिहिलेले होते. आता यावर काही भाष्य करण्याची गरज आहे काय? पण फक्त राष्ट्रवादी काँग्रेस हा एकच पक्ष अपवादाने हे करीत नाही. काँग्रेस, भाजप, शिवसेना – सर्वच महाराष्ट्रातले

पक्ष महाराष्ट्र अशा तऱ्हेने 'प्रगतीकडे' वेगाने नेत आहेत. भाजपने याच चौकात वल्लभभाई पटेल आणि लालकृष्ण आडवाणींचे एकत्र चेहरे आणि खाली स्थानिक सरंजामदारांची नामावळ असणारे कापडी फलक लटकावले होते.

हा राजकीय सरंजामदारीचा विकास आणि त्यातून कल्पनाशक्तीचा ऱ्हास हा सर्व देशाचाच प्रश्न आहे, पण तो वेगळ्या लेखाचा विषय आहे. इथे नमूद हेच करायचे आहे की, देशातल्या दिवाळखोरीचे आपणही एक घटक असू तर दिल्लीत आणि इतरत्र आपल्याला खास वेगळे स्थान कशासाठी मिळावे? आपण एकेकाळी ज्या साम्राज्याची स्थापना तलवारीच्या बळावर केली होती ते साम्राज्य केवळ जमिनीवरचेच *(म्हणजे भूगोलाच्या कागदावरचे)* राहिले. त्याची कोणतीही निशाणी राहिली नाही. फक्त त्या त्या प्रांतातल्या जनतेच्या मनावर वतने व खंडण्यांसाठी आपण केलेल्या आक्रमणासाठीच्या आकसाच्या निशाण्या तेवढ्या राहिल्या. आज तलवारीच्या बळावर राज्य *(केवळ जमिनीवरचेसुद्धा)* करण्याचे दिवस गेले. अशा वेळी आपल्या राजकीय संस्कृतीचा भाग म्हणून 'सृजनशील' व्यक्ती न दिसता पुन्हा 'पैलवानच' दिसताहेत. या पैलवानांच्या संस्कृतीचे आपण धडे देशाला देणार असू तर महाराष्ट्रापेक्षा भारी पैलवान उत्तर हिंदुस्थानात *(आणि दक्षिण हिंदुस्थानातही)* आहेत. ते क्षणार्धात आपली पाठ जमिनीला टेकवतात. सर्वांत कळीचे म्हणजे ही पैलवानी सरंजामी संस्कृती संपूर्ण देशाला विनाशाकडे नेत असताना महाराष्ट्र अपवाद असणार नाही. उलट पहिल्यांदा लयाला जाणाऱ्यांत ही संस्कृती असेल.

आपल्या सभोवतालीच्या प्रांतांचे आपल्याला जसे आव्हान आहे, तसे बाहेर पसरलेल्या विस्तीर्ण जगाचेही एक आव्हान आपल्याला आहे. हे आव्हान पेलणे अहंगंडाने जमणार नाही, तसेच ते न्यूनगंडानेही जमणार नाही. खरे तर या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकेकटी गुणी मराठी माणसे परदेशी निघून जातात. *(आणि तिथे जाऊनही समाज म्हणून सांस्कृतिक दिवाळखोरी टिकवतातच)* किंवा जोरकस सांस्कृतिक प्रवाह निर्माण करण्यात अयशस्वी ठरतात. शेवटी इतर प्रांतांवर व जागतिक प्रवाहांवर मात करणे म्हणजे काय असते? मराठी माणूस न्यूनगंडात व अहंगंडात राहून दोनच गोष्टी करतो. एक तर परप्रांतीयांचा आणि जागतिक संस्कृत्यांचा द्वेष तरी करतो किंवा उगाचच सर्वसमावेशक असण्याकरिता सर्व प्रांतातल्या माणसांसोबत सामाजिक अभिसरण सुरू करतो. वास्तविक हे दोन्ही भित्याचे उपाय आहेत. कुठच्याही सांस्कृतिक संघर्षात तुम्हाला सामाजिक अभिसरण वाढवून ना त्या संस्कृतीवर मात करता येते, ना त्या संस्कृतीचा द्वेष करून. मग प्रश्न उरतो की काय

केले पाहिजे ?

गेल्या सात-आठशे वर्षांचा साचेबद्ध अशा स्थितीवादाचा असा हा मराठी इतिहास आहे. त्यामध्ये काही प्रकाशाचे पुंजके आहेत, पण ते अपवादानेच आणि मोजकेच. मराठी साम्राज्य ही एक असाधारण संधी होती. ती आपण गमावली. उलट त्याचे दूरगामी असे भयंकारी परिणाम निर्माण करून ठेवले. अनेक समाजसुधारकांनी, विचारवंतांनी आपापल्या परीने एकेकट्याने लढून प्रयत्न केले. परंतु त्यांच्या प्रयत्नांचा प्रवाह काही झाला नाही. त्यात महात्मा फुल्यांपासून, सावित्रीबाई फुले, धोंडो केशव कर्वे, र. धों. कर्वे वगैरे समाजसुधारकांपासून ते अनेक अप्रसिद्ध साहित्यिक, कवी, शिक्षणशास्त्रज्ञांपर्यंत सर्वचजण येतात. त्यांना परिस्थिती कळली होती. पण एकतर परदास्यामुळे त्यांचा इलाज नव्हता. किंवा स्वातंत्र्य मिळाले असले तरी आपल्या विचारांचा त्यांना जोरकस प्रवाह काही करता आला नाही.

मराठ्यांच्या शेकडो वर्षांच्या इतिहासात कधी नव्हे अशी संधी पुन्हा नव्या ज्ञानयुगात आलेली आहे. विभूतिपूजा आणि सरंजामीचा अंत आता कोणताही लढा न लढता होईलच. तसे न झाल्यास सर्वांचाच विनाश अटळ आहे. *(आणि हे चांगलेच आहे)* इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या क्रांतीबद्दल असे म्हटले जाते की, पहिली औद्योगिक क्रांती आपल्याला पकडता आली नाही. ती आपल्याला टाळून पुढे निघून गेली. परंतु ही दुसरी क्रांती आपण अंशत: का होईना पकडली आहे. या क्रांतीचे वैशिष्ट्य म्हणजे कल्पकतेचे आणि ज्ञानाचे माणूस सरळ संपत्तीत रूपांतरण करू शकतो. कायदा, सैन्य, न्याय आणि सरतेशेवटी सत्तेच्या व्याख्या क्षणाक्षणाला बदलत आहेत आणि त्यावरचे महासत्तांचे अधिपत्यसुद्धा ढिले पडत चाललेले आहे. *(मग गावठी राजकीय माफियांची काय कथा?)* अशा वेळी एक प्रचंड मोठे सांस्कृतिक आंदोलन होणे शक्य आणि गरजेचे आहे. खरे तर तिला सांस्कृतिक क्रांतीच म्हणायला हवे. ही क्रांती पुढची काही दशके - शतके चालू राहील. प्रश्न आहे हे कोण करणार याचा. उत्तर अर्थातच स्पष्ट आहे. असंख्य विपदांनी शेकडो वर्षे नाडली गेलेली मराठी जनताच हे करील. सांस्कृतिकचा अर्थ त्यात साहित्य, सामाजिक, कला आणि राजकीयसुद्धा येते. हे आंदोलन मराठी जनतेने तिच्याच नेत्यांविरुद्ध व धुरिणांविरुद्ध केलेले आंदोलन असेल. त्यातला राजकीय भाग इतका सोपा असेल की, त्या क्षणी त्याचा कोणी विचारही करू शकणार नाही. आज पन्नास टक्के जनताच मतदान करते. अत्यंत नजीकच्या भविष्यात निवडणुकीचे उमेदवार आणि ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत त्यांना वगळता मतदानाला मतदारच सापडणार नाही. मतदानावरचा जनतेचा ऐच्छिक बहिष्कारच

इतका कडकडीत असेल की राजकीय सरंजामदारांनी स्वत:चा, स्वत:साठी, स्वत:च्या माणसांमार्फत चालवलेला राजकीय सत्तेचा पोकळ डोलाराच कोसळून पडेल. लाभार्थींना व दलालांना आपण काय करावे हेच कळणार नाही. नवज्ञानयुगातही 'फोडला पाहिजे', 'कानफटवला पाहिजे', इतपतच राजकीय ज्ञान असणाऱ्यांच्या अस्तित्वाच्याच अंताचा तो प्रारंभ असेल.

खरे सांगायचे तर मराठी साम्राज्याच्या काळात, त्या अगोदर आणि त्यानंतर मराठ्यांनी *(म्हणजे आपणच)* केलेल्या ऐतिहासिक प्रमादांची स्वत:च्या आयुष्यांमधून किंमत देऊन भरपाई करण्याचाच तो क्षण असेल. या भरपाईतून कुणालाही स्वत:ला वगळता येणार नाही. *(अमेरिकेत आणि स्वित्झर्लंडमध्ये आधीच तरतूद करून ठेवणारे राजकीय नेते त्यातून वाचतील असा त्यांचा भ्रम आहे. बेनझीरचे उदाहरण ताजे आहे)* सर्वसंहारक अशा घडामोडीतून एक संधी तरारून वर येईल. ती संधी आपली संस्कृती बलिष्ठ आणि सर्वव्यापी बनवण्याची असेल. ती संधी आपण घेणार आहोत का? आणि ती कशी घेणार आहोत हाच खरा प्रश्न आहे.

इतिहासात असे क्षण काही भाग्यवंतांच्या आयुष्यात येतात की अगोदरचा सारा इतिहास त्या क्षणांची पूर्वतयारी असते.

आजपासूनच्या दहा वर्षांनंतर प्रत्येक मराठी माणसाला ही संधी मिळणार आहे. रयतेच्या आयुष्यात काडीचाही बदल आपण घडवू शकत नसताना हा एवढा खेळ आपण कशाला मांडला होता बरे? असा ढोंगपूर्ण प्रश्न समाजातल्या धुरिणांना व नेत्यांना तेव्हा पडेल. पण प्रश्न पडण्याची वेळ तेव्हा निघून गेलेली असेल. तेव्हा त्यांना उत्तरे द्यावी लागतील. ती देता न आल्याने त्यांचे जे होईल ते प्रत्यक्ष पाहण्यातच खरी मजा आहे.

■

सामना *(दसरा-दिवाळी)* २००३

# शिवसेना : भासमान आणि वास्तविक

## १. संदर्भ : शिवसेना

शिवसेनेबद्दल लिहिताना तीन भावना मनातून काढून टाकाव्या लागतात. भीती, ममत्व, आणि द्वेष. कारण आजवरचं शिवसेनेबद्दलचं बहुतेक लेखन त्या तीन भावनांच्यातील एका कुठच्यातरी भावनेच्या प्रभावाखाली झालेलं आहे. शिवसेनेचं आताचं वय सदतीस वर्षांचं आहे. शिवसेनेने आजवरच्या प्रवासात अनेक राजकीय श्रद्धांचा पराभव केलेला आहे. अनेक राजकीय मिथकं धुळीला मिळवलेली आहेत. शिवसेनेचा जन्म हाच मुळी काँग्रेसच्या आशीर्वादाने झाला, हे अत्यंत उघड गुपित आहे. वसंतराव नाईक, स. का. पाटील, रामराव आदिक वगैरेंच्या आशीर्वादानंतर शिवसेनेची सुरुवातीला वाढ होत गेली. त्या वेळी जोमात असणाऱ्या कम्युनिस्टांना, समाजवाद्यांना आणि शेवटी काँग्रेसजनांनाच शिवसेना ही आपलेच डोळे पांढरे करू शकण्याएवढी सशक्त होईल असं स्वप्नातही वाटलं नाही. त्या काळच्या अनेक डाव्या, पुरोगाभी विचारवंतांनी आणि स्वत:ला शहाणं समजणाऱ्यांनी शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरे हे

'चार दिन की चाँदनी' आहेत, असा गोड समज करून घेतला होता. आणि त्याच वेळी शिवसेनेला संकुचित, प्रांतीयवादी म्हणत शिवसेनेशी निवडणुकीतील फायद्यासाठी हातमिळवणी करण्याची संधीही त्यांनी सोडली नाही. त्याला फारच थोडे पुरोगामी अपवाद आहेत. त्यामुळे तथाकथित पुरागामी आणि डावे समाजवादी शिवसेनेबद्दल काय म्हणतात त्याला काडीइतकंही ऐतिहासिक महत्त्व नाही. कारण त्यांच्या श्रद्धांचा वास्तवात भीषण पराभव होण्याअगोदर त्यांच्याच कृतींनी त्यांच्या श्रद्धांचा पराभव केलेला आहे.

त्या साऱ्याहून वेगळा असा शिवसेनेच्या अस्तित्वाचा शोध घेणं गरजेचं आहे. कारण त्यातूनच महाराष्ट्राच्या मानसिकतेच्या आणि भविष्याच्या कडा अधोरेखित करण्याला मदत होणार आहे. आज शिवसेनेचं वय सदतीस आहे. तिच्या कार्यकारी अध्यक्षांहून ती पाच वर्षांनी लहान आहे. आजघडीला काँग्रेस, भा. ज. पा. पेक्षा महाराष्ट्राच्या जनतेच्या भवितव्यावर परिणाम घडवण्याची शक्यता शिवसेनेत सर्वात जास्त आहे. इथे राष्ट्रवादी काँग्रेसचा वेगळा उल्लेख करण्याची फारशी आवश्यकता नाही. कारण तो काही कारणाने रागावलेला काँग्रेसींचाच गट आहे. पक्ष म्हणून वेगळी संस्कृती आणि वेगळं घडत जाणं नसल्याने त्या पक्षाचा वेगळा उल्लेख करावा असं *(ऐतिहासिक)* काही नाही. शिवसेनेचे अस्तित्व घडत जाण्याच्या प्रक्रियेत शरद पवारांच्या अनुषंगाने त्या गटाचाही उल्लेख येईल तेवढाच.

जुन्या-जाणत्यांच्या गर्दीत प्रादेशिक म्हणून उभ्या राहिलेल्या आणि आज सदतीस वर्षांनी जुन्या-जाणत्या पक्षांना नाक घासायला लावणाऱ्या या पक्षाबद्दल स्वच्छपणे लिहिण्याची अशासाठीही गरज आहे की, त्यामुळे समाज म्हणून आपण कुठे उभे आहोत हे बरंचसं स्पष्ट होणार आहे.

१९९५ ते २००० या पाच वर्षात शिवसेना, भा. ज. पा. चं राज्य होतं. हा अपवाद वगळला तर पुलोदचा प्रयोग जमेला धरून महाराष्ट्रावर काँग्रेसने आणि डाव्या, समाजवादी वगैरेंनी मिळूनच राज्य केलं. हे राज्यकर्ते कसे होते, याचा विचार केला की लक्षात येतं की उत्तरोत्तर महाराष्ट्राचं संपूर्ण राजकारण हे जातीयवादी होत गेलं. यशवंतरावांच्या वेळी ते कमी असेल. पण वसंतदादांसारख्या लोकनेत्यालाही हा जातीयवाद कमी करता आला नाही. पुढे शरद पवारांपर्यंत तर जातीयवादाचं हे धोरण महाराष्ट्रात पद्धतशीरपणे राबवलं गेलं. निवडणुकांतील उमेदवारांची नावं आणि प्रोत्साहन मिळून उदय पावणारं नेतृत्व यांची यादी घेऊन बसल्यावर या साऱ्याचा अभ्यासही करण्याची गरज पडत नाही, इतकं ते ढळढळीत स्वच्छ आहे.

शहाण्णव कुळी देशस्थ मराठ्यांची (आणि त्यातलेही फक्त धनिक, – गरीब किंवा कुणबी नव्हेत.) सरंजामदारी महाराष्ट्रात निर्माण झाली. मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, मुसलमान, ख्रिश्चन वगैरे अल्पसंख्याकांसाठी चटणी, कोशिंबीर, पापड, वगैरे दाखवण्यापुरतं सोडलं की, मुख्य अन्न धनिक शहाण्णव कुळींसाठी मुक्त होतं. प्रत्येक जिल्ह्यात एक एक सरंजामदार निर्माण झाला. त्याला शह देऊ पाहणारा मग अजून एक सरंजामदार, मग एक दादा गटाचा असेल तर दुसरा पवार (म्हणजे ढोबळमानाने पूर्वी चव्हाण) गटाचा. हेच मित्र गावा-तालुक्यापर्यंत झिरपत होतं. एक सरंजामी दहशतवाद महाराष्ट्रात सर्वदूर पोहोचला होता. महाराष्ट्रात काहीतरी प्रचंड पुरोगामी आणि सामाजिक न्यायाचं काहीतरी घडतं आहे, असं शरद पवार आणि त्यांच्या काँग्रेसी पूर्वसूरींच्या तोंडी कायम असे. त्याचा वास्तविक अर्थ त्या सरंजामदारीला महाराष्ट्रातून इतर मागासवर्गीय आणि दलितांमधून कुणी आव्हान देणार नाही, एवढे चटणी, कोशिंबिरीचे वाटे त्यांच्या पदरात घातले आहेत, असा होता. यशवंतराव किंवा वसंतदादा ही मोठी माणसं होती. त्यांना महाराष्ट्र प्रगत अन् बलशाली बनवावा असं वाटत असे. ते त्यांचं स्वप्न होतं. त्यासाठी त्यांचे शक्य त्या तऱ्हेने अथक प्रयत्न चालू होते. परंतु जातींच्या राजकारणाचं हे गणित शरदरावांपर्यंत आले, तेव्हा ते फक्त निवडणुका जिंकण्याचं गिमिक उरलं होतं. गावागावातल्या या सरंजामदारीबद्दल आणि नवजातीवादाबद्दल कुणीही पुरोगामी *(म्हणवणारा)* समाजवादी, बुद्धिजीवी वा संपादक लिहित नव्हता. कारण त्यांच्या मनातही हे जातीयवादाचं भूत होतंच. समाजवाद्यांचे बहुतेक पुढारी, प्रमुख वृत्तापत्रांचे संपादक, लेखक, बुद्धिजीवी हे एक तर कायस्थ, ब्राह्मण वा सारस्वत या उच्चवर्णीय जातींचे होते. आपण महाराष्ट्र काँग्रेसप्रणित या नवजातीयवादाला जातीयवाद म्हटलं तर आपल्यावर प्रतिगामित्वाचा आणि ब्राह्मणवादाचा शिक्का बसेल, अशी भीती त्यांच्या मनात होती. त्यांच्या पंचाईतीमधून त्यांना सुटका नव्हती. या नवजातीयवादाच्या प्रयोगाला 'पुरोगामित्व' आणि 'सामाजिक न्याय' म्हणण्याची लबाडी सर्वच उच्चवर्णीय बुद्धिवंतांनी महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेत्यांच्या मांडीला मांडी लावून चालवलेली होती.

या साऱ्या विषारी काव्याला एक ब्राह्मणांचा बागुलबोवा उभा करण्यात आला होता. दलितांचे शत्रू कोण? तर ब्राह्मण. इतर मागासवर्गीयांचे शत्रू कोण? तर ब्राह्मण. प्रतिगामी कोण? तर ब्राह्मण. जातीयवादी कोण? तर ब्राह्मण. हा 'बागुलबोवा मंत्र' पुरोगामित्वाचा परवाना असल्याचा मास हिस्टेरिया राज्यात निर्माण झाला होता. हा मंत्रच खरा पुरोगामित्वाचा असल्याची हाकाटी चोहोकडून होत होती. अपवाद एकच.

साठ ते ऐंशीच्या दशकातले मराठी चित्रपट. त्यात बऱ्याचदा गावपातळीवर काय अत्याचार आणि काय जातीयवाद कुणाकडून घडताहेत त्यांचं चित्रण असे. काँग्रेसची पांढरी टोपी घातलेला पाटील हा काँग्रेसी सत्तेचं जिवंत प्रतीक बनला होता. बहुधा निळूभाऊ फुले त्या पाटलाची भूमिका वठवत असत.

या साऱ्याला अनेक पदर आहेत. पण तूर्तास हा पदर अत्यंत महत्त्वाचा असल्याने समजून घेणं अत्यावश्यक आहे. कारण हे विष आणि वेगळ्या बाजूने निर्माण झालेली विषमता मराठ्यांच्यासुद्धा राजकीय हिताची नव्हती. एकदा महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यावर खरं स्वप्न जातीयता नष्ट करण्याचं असायला हवं होतं. ब्राह्मणांच्या हातातून जी सत्ता इंग्रजांनी हिसकावून घेतली होती ती महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सर्व जाती-जमातीत *(जाती-जमातींची लेबलं न पाहता)* विखरून जायला हवी होती. तसं झालं नाही. हे नवं विषमतेचं विष महाराष्ट्रभर पसरत गेलं. साचून राहतं झालं.

हा सारा इतिहास आणि हे वर्तमान इतक्या विस्ताराने लक्षात घेण्याचं कारण, पुढे १९९० नंतर शिवसेना जेव्हा महाराष्ट्रभर पसरली तेव्हा त्याचा जो कार्यकारणभाव होता तो हिंदुत्वाशी जोडण्याची अनेकांनी गल्लत केली. १९९० मध्ये शिवसेना जेव्हा महाराष्ट्रभर निघाली तेव्हा पूर्ण महाराष्ट्रात शिवसेनेचं 'न भूतो' असं स्वागत झालं. 'घर तिथे सैनिक, गाव तिथे शाखा' हे अक्षरश: गावोगावच्या लोकांनी उचलून धरलं. त्याचं कारण हिंदुत्ववादाचा शिवसेनेने केलेला पुकारा असं मानलं तर जनसंघ आणि नंतर भा.ज.पा. हिंदुत्वाचे नारे देतच होता, त्यांना केडर तळागाळापर्यंत अशा रितीने नेण्यात यश का आलं नाही? हा प्रश्न उरतोच.

खरं कारण असं होतं की, काँग्रेस *(ज्यात आताची राष्ट्रवादीही येते)* जी सरंजामी आणि जातीयवादी धोरणं राबवत होती त्यामुळे संपूर्ण समाजगती अवरुद्ध झालेली होती. बहुजन समाजातल्या सामान्य तरुणाच्या लोकशाही प्रक्रियेतल्या राजकीय महत्त्वाकांक्षांची जी प्रचंड कोंडी झाली होती ती शिवसेनेने फोडली. नांदेड म्हटलं की, शंकरराव चव्हाण वा कमलकिशोर कदमांचं वा त्यांच्या वंशजांचं मांडलिकत्व पत्करायचं. सोलापूर म्हटलं की मोहिते-पाटील घराण्याचं मांडलिकत्व, सांगली म्हटलं की, पाटील नाही तर मोहित्यांचं, नगर म्हटलं की, विखे-पाटील नाहीतर गडाख-पाटील, बारामती म्हटली की, खुद्द पवार आणि त्यांचे वंशज... नव्या माणसांना, नव्या कल्पनांना, नव्या नेतृत्वाला धुमारे फुटूच नयेत अशी ही भीषण परिस्थिती होती. मराठ्यांमधले धनदांडगे सोडले तर शेतमजूर, कुणबी आणि गरीब मराठ्यांचीही अशीच पिळवणूक होत होती. एवढंच काय, तर कोकणातल्या शहाण्णव कुळीलाही त्या

सत्ताचौकटीत मानाने वाव नव्हता.

या सर्वांना शिवसेना वरदान वाटली. शिवसेनेने या सर्व माणसांना पर्याय दिला. हे सर्व शिवसेनेच्या बाजूने फार विचारपूर्वक झालं असंही नाही. पण एक गोष्ट खरी की, हे राज्य 'मराठी असावं - केवळ मराठा असू नये', असं जनतेला वाटतं याची नीट जाण बाळासाहेबांना होती. आणि सेनेत निवडणुकीसाठी तिकीटं देताना इतर चुका झाल्या असतीलही, पण बाळासाहेबांनी जातींच्या आधारावर माणसं निवडण्याचं पाप कधीही केलं नाही. अर्थात महाराष्ट्रानेही त्याच्या त्या ऋणाची परतफेड केली. कारण तुलना करताना असं दिसतं की, शरद पवारांनी त्यांची सर्व जातीयतेची विखारी गणितं वापरून स्वत:च्या बळावर निवडणुका लढवल्या तेव्हा दोनशे अठ्ठ्याऐंशीमधल्या पंचावन्न-छप्पन्नच्यापेक्षा जास्त जागा त्यांना कधीच मिळवता आल्या नाहीत. १९९० नंतर शिवसेना स्थानिक आंदोलनातून पक्षामध्ये *(अनेक अर्थाने)* परावर्तित झाली. तेव्हापासून ही पवारांची स्वबळावरची 'मॅजिकल फिगर' *(जादुई आकडा)* सेनेने सहजच पार केलेली दिसते.

या साऱ्याचा अर्थ शिवसेनेने 'हिंदुत्वाला' मिळालेला जनतेचा पाठिंबा असा लावला. एका स्थानिक पण शक्तिशाली आंदोलनाचं समर्थ पक्षामध्ये कोणालाही कल्पना नसताना परावर्तन झालं. या साऱ्याचा भा.ज.पा.ने अर्थ लावला तो काँग्रेसी पद्धतीने आणि त्यावर काँग्रेसी पद्धतीचेच उपाय केले. *(आत्ताच्या सोलापूर लोकसभा पोटनिवडणुकीत भा.ज.पा.चे उमेदवार पुन्हा मोहिते-पाटील घराण्यातलेच आहेत हे भा.ज.पा.ने विखारी जातीयवाद आणि सरंजामदारीची काँग्रेसी परंपरा किती वेगाने आत्मसात केली त्याचंच द्योतक आहे.)* धोरण म्हणून *(प्रेरणा म्हणून नव्हे)* भा.ज.पा.ने बहुजन जातींचं राजकारण करण्यात आपण मागे पडता कामा नये असं ठरवलं. मग अचानक भा.ज.पा.त बहुजन आणि मागासवर्गीय चेहरे गणिती हुशारीने दिसू लागले. तेही त्या त्या मतदारसंघ-बहुलतेनुसार... खरं तर शिवसेनेकडे बहुजन समाज आणि इतर मागासवर्गीय आकृष्ट झाले होते ते जातींचं राजकारण नसल्याने. पण काँग्रेसप्रमाणेच *(ज्यात राष्ट्रवादीही आली)* भा.ज.पा.ने अंत:स्फूर्तीचं राजकारण टाळून काँग्रेसचं विखारी जातीय राजकारण शिकून घेतलं. त्यामुळे आत्ताच्या परिस्थितीत भा.ज.पा.चा नैसर्गिक मित्रपक्ष शरद पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस असायला हवी होती. *(किंवा अगोदर काँग्रेस)* परंतु भा.ज.पा.चा पाया या एवढ्यावरच विस्तारणार नव्हता. कारण त्यांची खरी स्पर्धक होती शिवसेना. शिवसेनेने त्यांचं हिंदुत्वाचं लेबल पळवलं होतं. मग भा.ज.पा.ने शिवसेनेशी युती केली. प्रमुख

स्पर्धकांशी भा.ज.पा.ची युती तात्पुरती शिवसेनेला फळली, तरी दूरगामी भा.ज.पा.ला फळणार याची जबर खात्री भा.ज.पा.ला होती. हा डाव गणिती अचूकतेने मांडलेला आहे. पण राजकारण म्हणजे ढोबळ गणिती अचूकता नव्हे. तिथे कलाकाराप्रमाणेच अंत:स्फूर्तीला मोठं स्थान आहे.

शिवसेना आंदोलन म्हणून आणि नंतर पक्ष म्हणूनही बाळासाहेबांच्या अंत:स्फूर्तीवरच वाढत आलेली आहे. भा.ज.पा. बरोबरच्या युतीत शिवसेनेचे काय फायदे-तोटे होते हे जाणून घेण्याअगोदर शिवसेना नेमकी काय आहे हे जाणून घेणं आवश्यक आहे. कारण सदतीस वर्षांनंतर एक समर्थ आंदोलन पक्ष म्हणून उभं राहतं आणि गुंतागुंतीच्या परिस्थितीत गोंधळून एका मायावी सापळ्यात सापडतं याचं कारण सदतीस वर्षांत शिवसेनेने आणि बाळासाहेबांनी गुंतागुंतीच्या प्रश्नांकडे तेवढ्याच अभ्यासपूर्णपणे पाहून त्याचं विश्लेषण करून, यामधून मार्ग काढण्याचं नाकारलं. त्यामुळे शिवसेनेला आता जो धडा मिळणार आहे तो, ''प्रश्न गुंतागुंतीचे असतात. त्यांच्याकडे तेवढ्याच गुंतागुंतीने पाहावं लागतं. त्यांचा खोलवर अभ्यास करावा लागतो. तसे न केल्यास इतिहासाच्या कुठल्या ना कुठल्या खिंडीत ते आपल्याला त्यांच्या सर्वंकष जटिलतेसह गाठतातच,'' हा आहे.

हे सारं जाणून घेण्याआधी शिवसेनेची रचना आणि तिची ऊर्जा जाणून घेणं आवश्यक आहे.

शिवसेनेची आंदोलन म्हणून सुरुवात कशी झाली? त्यात ऊर्जा निर्माण कशी झाली? ती वाढत कशी गेली? हे नीट कळण्याकरता तीन बाबींचा नीट विचार करायला हवा.

१ – बाळासाहेब ठाकरेंची घडण.

२ – महाराष्ट्रातल्या मराठी मानसिकतेची घडण.

३ – शिवसैनिक आणि शिवसेनेची संघटनात्मक घडण.

या तीन बाबी एका संदर्भात तपासून पाहायला हव्यात. आणि तो संदर्भ आहे परिस्थितीचा. शिवसेना ही महाराष्ट्रात समाविष्ट झालेल्या मराठी माणसाने जीवाच्या कराराने मारलेली किंकाळी होती. या किंकाळीमागे स्वत:वर झालेल्या अन्यायाचं आक्रंदन होतं, भय होतं, क्रोध होता, दु:ख होतं, खंत होती.... लक्षात घ्या, या साऱ्या भावना मानवी आयुष्याला (मग ते वैयक्तिक असो वा सामाजिक) निर्णायक वळण लावू शकतात. पण या साऱ्या भावना मानवी आयुष्यात नकारात्मक मानल्या जातात; सकारात्मक नाही. कारण या भावनांचं सामर्थ्य हे विध्वंसात्मक असतं; सृजनात्मक

नसतं. हे कुणाला कितीही कटू वाटलं तरीही सत्य आहे.

वर उल्लेखिलेल्या तीन बाबींचा या परिस्थितीच्या संदर्भात विचार केला तर हाती काय लागतं?

बाळासाहेब ठाकरे हे सरळमार्गी मध्यमवर्गीय गृहस्थ होते. प्रतिभेची दैवी देणगी त्यांना होती आणि आहे. त्यांचा कुंचला अतिशय सफाईने चाले. त्यांचे वडील अत्यंत आग्रही असे पुरोगामी होते. महाराष्ट्रातल्या अव्वल समाजसुधारकांमध्ये 'प्रबोधन'कार ठाकरेंचा उल्लेख महाराष्ट्राचा इतिहास लिहिताना करावा लागेल. बाळासाहेबांचे वडिलांशी चांगले संबंध होते. बाळासाहेब आणि त्यांचे वडील 'प्रबोधन'कार ठाकरे हे 'प्रबोधन'कारांच्या मृत्यूपर्यंत एकत्र राहत. बाळासाहेबांचे नोकरीत झालेले (ऐतिहासिक) मतभेद वगळता अगोदर कुणाशी तीव्र मतभेद झाल्याचंही इतिहासात नमूदा नाही. बाळासाहेबांनी 'मार्मिक' सुरू केला तोही चांगलं मनोरंजन लोकांना देण्याच्या उद्देशाने. एवढंच नव्हे तर, 'मार्मिक'च्या सुरुवातीच्या काळात संपादकीय विभागात काम करत होतो ते विजय तेंडुलकर. तेंडुलकरांनीही 'मार्मिक' सोडलं ते काही मतभेद वगैरेंमुळे नव्हे तर त्यांना 'कंटाळा' आला (जो तेंडुलकरांना नंतर प्रत्येक नोकरीत आला.) हे उदाहरण, टोकाच्या वेगळ्या व्यक्तिमत्वाचं काचणं वगैरे बाळासाहेबांना नव्हतं हे दाखवण्यास पुरेसं आहे. संपादक - बाळ ठाकरे, संपादकीय विभागात - विजय तेंडुलकर. हे बऱ्याच जणांना आता अतर्क्य वाटलं तरी ते तसं तेव्हा होतं हे खरंय. हे सगळं इतक्या तपशिलात लिहिण्याचं कारण म्हणजे, प्रस्थापित व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणारे चार खांब मानले जातात; पिता, धर्म, सैन्य आणि सरकार. व्यवस्थेला मानणं अथवा व्यवस्थेविरुद्ध बंड करणं हे या चार निकषांवर तपासून पाहायला हवं. नमुन्यादाखल छत्रपती शिवाजी महाराजांचं आपण उदाहरण घेऊ. छत्रपती शिवाजी हे क्रांतदर्शी नेते होते. त्यांच्या आयुष्यात त्यांना या चारही निकषांवर प्रच्छन्न वा प्रगट संघर्ष करावा लागलेला आहे. लहानपणीच महाराजांना वडिलांपासून वेगळं व्हावं लागलं. पुढचं संपूर्ण आयुष्य महाराज, वडील जगत असलेल्या प्रस्थापित आयुष्याहून वेगळं असं विस्थापित आयुष्य जगले.

महाराजांनी हिंदवी स्वराज्याचा संकल्प सोडला तेव्हाची परिस्थिती ध्यानात घेण्याजोगी आहे. तेव्हा हिंदू धर्म हा शासनकर्त्यांचा धर्म नव्हता. संपूर्ण प्रस्थापित व्यवस्थेवर इस्लामची पकड होती. अशा वेळी एका विस्थापित धर्माची पाठराखण महाराजांनी केली.

तेव्हाची प्रस्थापित सरकारं म्हणजे, प्रस्थापित 'शाह्या'. निजामशाही,

आदिलशाही, कुतुबशाही आणि मोगल. छत्रपती शिवाजीमहाराजांनी या सर्वांविरुद्ध तलवार उपसलेली होती.

आणि तेव्हाची जी प्रस्थापित सैन्यं होती त्यांना तर छत्रपती शिवाजीमहाराजांनी त्यांच्या मूठभर मावळ्यांच्या जोरावर आव्हानच दिलेलं होतं. ही परिस्थितीच इतकी बोलकी आहे की, छत्रपतींना त्यांच्या मृत्यूनंतरही साडेतीनशे वर्षांनी देश का मानतो आणि महाकवी रवींद्रनाथ ठाकुरांनाही त्यांच्यावर कविता का करावीशी वाटली ते स्पष्ट आहे.

मराठी माणसांबद्दल विचार करताना असं दिसतं की पुढे तीन मराठी माणसांनी या चार व्यवस्थांतल्या एकेका व्यवस्थेशी प्रकट संघर्ष केले. लो. टिळकांनी सरकारशी, स्वा. सावरकरांनीही सरकारशी, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माशी. *(इथे धर्म याचा अर्थ प्रस्थापित - राज्यकर्त्यांचा धर्म असा आहे.)* या तिघांनीही या प्रकट बंडाचे परिणाम भोगले. किंमत चुकवली. वर उल्लेखिलेल्या चारांपैकी फक्त एका व्यवस्थेशी संघर्ष केल्यावर काय किंमत चुकवावी लागते हे या तिघांच्या *(लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर)* आयुष्याकडे नजर टाकल्यावर लक्षात येतं.

म्हणजे या चारही व्यवस्थांविरुद्ध बंड करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांना कोणत्या अग्निदिव्यातून आणि ताणांतून जावं लागलं असेल हे लक्षात येईल.

या पार्श्वभूमीवर बाळासाहेबांनी शिवसेना स्थापन केली तेव्हा आणि नंतरही यातल्या कुठल्याही व्यवस्थेविरुद्ध बंड त्याना अभिप्रेत नव्हतं. तत्त्वांमध्ये किंवा तपशिलांमध्येही बाळासाहेबांना क्रांती अपेक्षित नव्हती. सत्ता उलथून टाकण्याचं वगैरे स्वप्न नव्हतं किंवा व्यवस्थेतही आमूलाग्र परिवर्तनाचं आव्हान-आवाहन नव्हतं. सुरुवातीला बलशाली सरकारसोबत बाळासाहेबांनी जुळवून घेतलं. सरकार उलथवून शिवसेनेला सत्ता मिळवण्याची स्वप्नं कधी पडली नाहीत. *(जी हुकूमशाहा हिटलरला पडली होती.)* देशाच्या सैन्याबद्दल बाळासाहेबांच्या मनात आदरच होता. आणि ज्या धर्माचा पुकारा करून बाळासाहेब उभे राहिले तो बऱ्याच अर्थांनी देशातला प्रस्थापित आणि सत्ताधारी धर्मच होता. त्यामुळे शिवसेना त्या अर्थाने आक्रमक संघटना मानता येत नाही. हे कितीही धक्कादायक वाटलं तरी सत्य आहे. ज्याला आपण आक्रमक मानतो त्याला मूलभूत आणि आमूलाग्र परिवर्तन अभिप्रेत असावं लागतं. मग ते शुभंकर असो वा भयंकर: ते करण्यासाठी आक्रमक मग सर्वस्व पणाला लावत असतो. आपलं आणि आपल्या शत्रूचंही.

बाळासाहेबांनी जेव्हा 'मार्मिक' चालू केला तेव्हा वास्तव आणि योगायोगांच्या मिश्रणातून मराठी माणसांवर मुंबईतच होणाऱ्या अन्यायाचा प्रश्न त्यांनी हाती घेतला. 'मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी' अशीच शिवसेना नावाच्या आंदोलनाची घोषणा होती. या संपूर्ण कालखंडात शिवसेनेने तरुणांच्या झुंडी संघर्ष करण्याकरता उभ्या केल्या. पण मानवी इतिहासात विवक्षित कालखंडात विशिष्ट प्रश्न उभे का राहतात याचा खोलात जाऊन कधीही विचार केला नाही. मराठी माणसाला स्वत:च्याच भूमीवर स्वत:च्या न्याय्य हक्कांसाठी का उभं राहावं लागलं याची शिवसेनेने आणि मराठी माणसानेही नीटशी कारणमीमांसा केली नाही. त्यामुळे शिवसेनेच्या स्थापनेच्या वेळचे प्रश्न मुळातून सुटणं तर दूरच; पण होता होता ते इतके जटिल झाले की, शिवसेनेच्या आणि मराठी माणसाच्या ध्येयधोरणांवरच त्यांनी आक्रमण केलं.

या साऱ्याचं मोठं अपश्रेय खुद्द बाळासाहेबांकडेही जातं. शिवसेनेच्या अनेक विजयाचं श्रेय त्यांना द्यायचं झालं तर हे अपश्रेयही त्यांनाच द्यावं लागेल. बाळासाहेबांनी संपूर्ण संघटनेत, खोलवर जाऊन समस्येचा मुळापासून अभ्यास करण्याची परंपरा रुजूच दिली नाही उलटपक्षी समस्येचं विश्लेषण करणं, चर्चा करणं, त्यावर अभ्यास करणं, विचार करणं या साऱ्या प्रक्रियेची बाळासाहेबांनी वेळोवेळी टवाळीच केलेली आढळते. विचारवंतांची 'टाळकुटे' अशी वा अशासारखी मानखंडनाच शिवसेनेकडून केली गेली. ज्ञानमार्गाचं सेनेला वावडं होतं. 'लुंगी हटाव' आंदोलनापासून सुरुवात करायची झाली तर एक साधी वस्तुस्थिती ध्यानात घेतली पाहिजे की, १९७७ साली *(म्हणजे शिवसेना स्थापना आणि या आंदोलनाच्या दशकानंतर)* महाराष्ट्र सरकारने पहिल्यांदाच आणि एकदाच मुंबईतल्या झोपडपट्ट्यांची गुप्त गणना केली. त्यात दाक्षिणात्यांपेक्षा बिहारी आणि उत्तर प्रदेशी कितीतरी जास्त पटीने असल्याचं आढळून आलं. मूळ आजार न शोधता लक्षणांवर उपाय आणि तोही वरवरचा. या कार्यसंस्कृतीमुळे झालेले परिणाम आज आपण पाहातो आहोत. मुंबईवर परप्रांतियांचं आक्रमण का होतं आहे आणि त्याचा बंदोबस्त कसा करता येईल याचा शिवसेनेने सखोल अभ्यासच केला नव्हता. सर्वोच्च नेते म्हणून बाळासाहेबांनी कायम समस्यांचं सोपेकरण केलं. बाळासाहेबांनी अशा प्रकारचं समस्याचं सोपेकरण करणं पहिल्या सभेपासून सुरू केलं. मद्राशांना हाकललं की नोकऱ्यांचं प्रश्न सुटतील, उद्योगपतींना पाठिंबा दिला आणि संप न केले की सुबत्ता येऊन रोजगार वाढेल, वडापावच्या गाड्या टाकल्या की मराठी तरुण आत्मनिर्भर होईल, ॲम्ब्युलन्सचं जाळं उभं राहिलं की, आरोग्य सेवेतील व्यवस्थिय *(Systemic)* प्रश्न सुटतील, बिल्डर्सच्या

सहकार्याने मुंबईच्या झोपडपट्टांच्या जागी इमारती उभ्या राहून झोपडपट्टीवासियांना घरं मिळतील, रेशनिंगवरच्या वस्तू वाजवी दराने वितरित केल्या की, जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईचे प्रश्न सुटतील, 'व्हॅलेंटाइन डे' वर बहिष्कार म्हणजे परकीय संस्कृतीच्या आक्रमणाला उत्तर.. शिवसेना समर्थकांना, शिवसैनिकांना बाळासाहेब बोलले की, ''अरेच्या, समस्या इतकी सोपी होती तर!'' असं वाटतं. हे बाळासाहेबांचं समस्येचं सोपेकरण शिवसेनेचं एक मोठं बलस्थान आहे. मोठं पण अत्यंत दुर्दैवी बलस्थान!

कारण अशा प्रकारचं समस्यांचं सोपेकरण सामान्य माणूस करतोच. 'वाजपेयी कुठे चुकले'पासून ते 'बुश कसं गंडवणार आहे' पर्यंत किरकोळीनं बोलणाऱ्या सामान्य माणसांशी शिवसेना एकदम जोडली जाते. पण शिवसेनेत त्यामुळे समस्येची गुंतागुंत समजून घेण्याची आस्था आणि क्षमताच नष्ट झालेली आहे. दुसरं म्हणजे बाळासाहेबांच्या सार्वजनिक जीवनात विचारवंतांचा मानभंग करण्याने *(वैयक्तिक आयुष्यात ते त्यांच्याशी मैत्रीचं नातं ठेवून असले तरीही)* शिवसैनिकांसाठी समस्येच्या मुळाशी जाऊन उकल करणारे लोक हे 'वायफळ चर्चा करणारे लोक' ठरतात. त्यातून सदतीस वर्षानंतर शिवसेनेची अशी शोकांतिका झालेली आहे की, शिवसेनेकडे जेव्हा जेव्हा आणि जिथे जिथे सत्ता आली तिथे तिथे शिवसेना साधी नोकरशाहीही पकडीत घेऊन हलवण्यात संपूर्ण अपयशी ठरली. शिवसेनेचे नगरसेवक ते मंत्री 'सरकार' नावाची व्यवस्था राबवताना अक्षरश: रडकुंडीला येतात. अरेच्चा, हे व्यवस्थेचं चाक हलतं कसं? समस्या कुठच्या चावीने सुटतात? असा भाव आणि भय त्यांच्या मनात असतं. शिवसेनेची सत्ता जेव्हा राज्यात आली तेव्हा, ''मला आऊटपुट आणि रिझल्ट देणारी मंत्री 'आवडतात''' असं ऐकण्याची पाळी खुद्द शिवसेनाप्रमुखांवरच आली.

*(दुसऱ्या बाजूला विचारवंत आणि शहाण्यासुरत्या म्हणवणाऱ्या माणसांनी आणि इतर पक्षांनी मराठी माणसावर काही अन्याय होतो आहे त्याचा विचार करणंच थांबवलेलं होतं आणि आहे. याबद्दल खूप लिहिता येईल. पण तो वेगळ्या लेखाचा विषय आहे. हा प्रश्न तेव्हा फक्त शिवसेनेने उचलला हे मात्र खरं.)* शिवसेनेची म्हणून आता प्रसिद्ध असलेली कार्यपद्धती त्या सोपेकरणातून जन्माला आलेले सेवाभावी उपाय आणि दुसरीकडे भासमान आक्रमकता!

शिवसेनेच्या सुरुवातीच्या काळापासून शिवसेनेने जो दरारा आणि भय निर्माण केलं, ती शिवसेनेची आक्रमकता ही मूलभूत आक्रमकता नव्हती. ज्या आक्रमकतेला व्यवस्थाच उलथवून टाकून क्रांती करायची असते ती ही आक्रमकता नव्हती तर ही

आक्रमकता भासमय आक्रमकता होती. ज्या आक्रमकतेमुळे व्यक्ती घाबरते, व्यवस्था नव्हे. व्यवस्था फारतर स्थितीवादी होते. हलेनाशी होते. पण तिच्यात काहीही गुणात्मक बदल होत नाही.

शिवसेनेच्या या भासमान आक्रमकतेबद्दल जाणून घेण्याकरता दुसरी बाब म्हणजे महाराष्ट्रातल्या मनाची घडण जाणून घेतली पाहिजे. कारण त्यातूनच शिवसेनेचा चाहता आणि पाठिराखा वर्ग निर्माण झाला. या मराठी मानसिकतेला जाणून घेण्याकरता एक समर्पक किस्सा वाचण्यासारखा आहे. १९४६ साली कृष्ण मेनन यांनी २६ जानेवारीला एक सभा बोलावली होती. त्या सभेत अनेक ब्रिटिश मंत्री-खासदार हजर होते. *(या सभेचा उल्लेख प्रभाकर कुंटेंच्या आत्मचरित्रात आलेला आहे. कारण ते या सभेला हजर होते.)* त्या सभेत कृष्ण मेनन यांनी अत्यंत आक्रमकपणे ब्रिटिशांना तुम्ही साम्राज्यवादी, रक्तशोषक आहात वगैरे सुनावलं... वर माझ्या देशाला पाच हजार वर्षांचा इतिहास आहे, वगैरेही सुनावलं. हे सगळं झाल्यावर त्या सभेचं अध्यक्षस्थान ज्यांनी भूषवलं होतं ते राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक आणि जागतिक कीर्तीचे तज्ज्ञ प्रो. हॅरॉल्ड लास्की बोलायला उभे राहिले. त्यांनी जणू त्या भाषणात भारताचं भवितव्यच काळाच्या भिंतीवर त्या संध्याकाळी लिहिलं. मूळ भाषण खूप मोठं आहे. पण त्यातला जो त्यांचा सर्वात मोठा धोक्याचा इशारा होता तो महाराष्ट्राच्या *(खरं तर भारताच्याच)* मानसिक जडणघडणीत समूर्त साकार झाला. ते म्हणाले होते,

"You may have and undoubtedly you have a great past. But in the present days please have in mind that you are no where in comparison with the other nations. Therefore do not develop this psychology of **arrogance of inferiority.**"

शिवसेनेच्या उदयाला कारणीभूत झालेला मराठी माणसाचा हा "Arrogance of Inferiority' शिवसेनेचाही स्वभाव बनला. उद्दामपणाने माणसं आपल्याला घाबरतात. पण अखेर न्यूनगंडातून फक्त पराभव नशिबी येतो. प्रा. हॅरॉल्ड लास्कींनी १९४६ साली भारतात न्यूनगंडातून उद्दामतेची राजकीय संस्कृती ठिकठिकाणी उदयाला येऊ शकेल हे नि:संदिग्ध भाष्य करून ठेवलेलं होतं. उगाच नाही ब्रिटिशांनी भारतावर राज्य केलं. त्यामुळे जी भासमान आक्रमकता शिवसेनेची संस्कृती बनली ती आपणा मराठी माणसाच्या न्यूनगंडातून येणाऱ्या मुद्दामपणाची होती. त्यामुळेच मराठी माणूस परप्रांतीयांची समस्या मुळातून सोडवू शकला नाहीच. उलट मराठी माणसाचा मुंबईतच परप्रांतीयांनी नि:संदिग्ध पराभव केला. मुंबईत फक्त अठ्ठावीस टक्के मराठी माणूस उरला आणि आज शिवसेनेलाही मुंबईत परप्रांतीयांचं संरक्षण करण्यासाठी उभं

राहावं लागलं.

शिवसेनेची आणि मराठी माणसाची ही मोठीच शोकांतिका आहे. पण दुर्दैवाने सदाफुलीच्या झाडाला निसर्गत:च गुलाबाची फुलं येणाची जशी सोय नाही, तसंच ही समस्या नीट समजून घेतल्याशिवाय ती सोडवण्याचा कोणताही उपाय नाही. आज 'बंद'च्या दिवशी रस्त्यावर उतरणारा 'कडवा', 'मिलिटंट', 'राष्ट्रभक्त' शिवसैनिक आपली भासमान आक्रमकता दाखवतो किंवा कुणाला तरी कानफटवतो तेव्हा त्याला हे सारं कॅमेऱ्यात चित्रबद्ध करायचं असतं. कारण आपल्या 'शौर्याचं' बक्षिस आपल्याला मिळावं अशीच त्याची इच्छा असते. मराठी मनात कायम धगधगणारा हा न्यूनगंड उद्दामपणाच्या रूपात उफाळतो तेव्हा आपल्याच समाजात भीती निर्माण करणारा, आपल्याच देशातल्या गाड्या, दुकानं, विरोधकांना हानी पोहोचवून आपण राष्ट्रभक्त कसे ठरू अशी शंकाही त्याला येत नाही. कारण सर्वसामान्य शिवसैनिकाने उत्तरं देण्याची जबाबदारी कधीच स्वत:वर घेतलेली नसते. ती जबाबदारी बाळासाहेबांवर. हे नेमकं काय आहे? हे जाणून घेण्याकरता शिवसेना या संघटनेच्या मानसिक घडणीकडे नीट पाहायला हवं.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वा शिवसेना या दोन्ही संघटना मध्यमवर्गीय मूल्यं मानणाऱ्या माणसांनी आपल्यासारख्याच माणसांना बरोबर घेऊन उभ्या केल्या. सर्व माणसं मध्यमवर्गीय असल्याने या दोन्ही संघटना फार वाढणार नाहीत, असं त्या त्या वेळच्या शहाण्या माणसांचा अंदाज होता. 'शहाण्या' माणसांचे अंदाज त्या त्या वेळी चुकतात तसे या दोन्ही संघटनांबाबतही चुकलं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये व्यक्तीपेक्षा ध्वज मोठा, संघटना मोठी मानली गेली वगैरे. तो एक स्वतंत्रपणे हाताळण्याचा विषय आहे. परंतु शिवसेनेच्या एकचालकानुवर्तित्वामध्ये बाळासाहेब ठाकरे हेच सर्वेसर्वा आहेत. सरसेनापती, शिवसेनाप्रमुख, हिंदुहृदयसम्राट असा त्यांचा प्रवास होत गेलेला आहे. त्यांच्या आदेशाला शिवसेनेत अंतिम स्थान आहे. अनेकांना शिवसेनेच्या या वाढीचं, बाळासाहेबांच्या आदेशाचं आणि त्याचं निष्ठेने पालन करणाऱ्याचंही आश्चर्य वाटतं. पण हे नीट समजून घेण्याकरता मध्यमवर्गाची मानसिकता आपण नीट समजून घेतली पाहिजे. आपण सर्वच *(म्हणजे उच्च आणि निम्नमध्यमवर्गीयही त्यात येतो.)* सर्वात जास्त भय बाळगतो ते एकटेपणातून येणाऱ्या स्वातंत्र्याचं. एकंदरीतच मध्यमवर्गाला *(उच्च, मध्यम, निम्न)* सर्वात जास्त भय त्याच्या स्वातंत्र्याचं असतं. कारण स्वातंत्र्यात एकटेपणा असतो. आणि एकटेपणात स्वातंत्र्य असतं. आपल्याला नेमकं हेच नको असतं. आपल्या कृतीची जबाबदारी कुणीतरी दुसऱ्याने घ्यावी, आपण

आपल्यासारख्याच अनेक माणसांच्या समुदायात असावं. आपल्याला ते सुरक्षित वाटतं. या आपल्यासारख्यांच्या संघटनाचं उत्तरदायित्व कुणीतरी प्रेषितासारखा घेतो आहे, तोच आपल्याला आदेश देतो आहे, हवं-नको ते पाहतो आहे, भिऊ नकोस, मी आहे असं सांगतो आहे; ही मध्यमवर्गीय माणसाची सुखकल्पना असते. खरं तर मनुष्य म्हणून एकटं असण्यात आणि स्वतंत्र असण्यात सर्वात गौरवशालित्व आहे. मनुष्य आपल्या प्रतिभेचा, सृजनाचा, सत्याचा शोध एकटेपणात आणि स्वातंत्र्यातच घेऊ शकतो. पण मध्यमवर्गाला त्याचीच सर्वात जास्त भीती वाटते. संघटना खूप असतात. पण त्या व्यवस्था म्हणून असतात. रेशनिंग ऑफीस, फिलिप्स कंपनी किंवा कॉंग्रेस हीसुद्धा संघटनाच आहे. पण ती तुमच्या व्यक्तिमत्वाचा विलय मागत नाही. त्या फक्त सोयीच्या व्यवस्था असतात.

एकचालकानुवर्तित्व असणारी संघटना तुमच्या व्यक्तिमत्वाचा विलय मागते. कधी कळत, कधी नकळत. प्रेषितावर संपूर्ण श्रद्धा आणि विनाअट शरणागती मागते. लक्षात घ्या, हे सारं आपणा सर्वांना खूप सुखाचं असतं, हवं असतं. अशा वेळी माणसं स्वत:च्या 'इगो'चा विलय प्रेषिताच्या 'इगो'त करतात. त्याला शरण जातात. विनाअट आणि विनासंकोच. मग त्यांची 'स्व' विषयीची जबाबदारी संपते. बरोबर-चूक, नैतिक-अनैतिक असा विचार करण्याची जबाबदारी संपते. ज्यांची आपल्याच एरियात प्रचंड दहशत-भीती आहे अशी माणसंसुद्धा या प्रेषितत्व अर्पण केलेल्या माणसासमोर मेणासारखी मऊ होतात तेव्हा त्रयस्थाला आश्चर्य वाटतं. पण त्याचं रहस्य यामधेच आहे. एकदा त्या प्रोषितामध्ये स्वत:चा 'अहं' विलयाला नेल्यावर स्वत:च्या विवेकाची वा अपराधबोधाची टोचणी त्यांना छळत नाही. मग प्रेषिताचा 'इगो' हा त्यांचा इगो बनतो. त्याला धक्का लागणार नाही याची त्यांच्याकडून काळजी घेतली जाते. प्रेषिताचे आदेश अत्यंत समरसतेने पाळले जातात. कारण त्या आदेशांनीच त्यांची स्वतंत्रपणे विचार करण्याची आणि नैतिक-अनैतिक स्वतंत्रपणे ठरवण्याची मानवी आयुष्यातील सर्वात कठीण जबाबदारी संपवलेली असते. माणसांना मग अशा प्रेषितत्वाने चालणाऱ्या संघटनेचे आपण भाग आहोत ही संकल्पनाच उन्मादक, अर्थपूर्ण आणि आयुष्याला अर्थ प्राप्त करून देणारी वाटते. मानवाच्या इतिहासात मध्यमवर्गाच्या बाबतीत असं पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या तऱ्हेने झालेलं आहे. जर्मनीत हिटलर हा नाझी नक्षाचा प्रेषित होता. तर जगभर कम्युनिस्ट पक्ष आणि त्याचं तत्त्वज्ञान हेच प्रेषित म्हणून बराच काळ वावरत होतं. बाकी वर्ग गोष्टी वर वर्णन केल्याप्रमाणेच कम्युनिस्टांबाबत असत. प्रेषित फक्त व्यक्तीऐवजी पार्टी आणि तिचं

तत्त्वज्ञान असे. त्यावर आर्थर कोस्लरने 'डार्कनेस ॲट नून' नावाची अप्रतिम कादंबरीही लिहिलेली आहे. (त्या वेळच्या सोविएत रशियात त्यावर बंदीही घालण्यात आली होती.) तर सांगायचा मुद्दा हा की, बाळासाहेब ठाकरे हे शिवसेनेचे प्रेषित आहे. आणि त्यांचं हे स्थान नि:संदिग्ध आणि निर्विवाद आहे आणि असणार आहे. हे असं आहे आणि ते आपण नीट समजून घेतलं पाहिजे. आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे, प्रेषित ठरवतील ती आणि तीच व्यक्ती प्रेषिताची वारस ठरणार. त्यात बदल होणार नाही. कारण अनुयायांच्या दृष्टीने आपल्या वारसाची प्रेषिताने निवड करणं म्हणजे परस्पर आपापल्या 'अहं'चा वारसामध्ये विलय करणं. अनुयायांची मानसिक सुरक्षितता यामुळंच कायम राहते. या प्रक्रियेत काहीही बदल होणार नाही. यापुढचा एक मुद्दा फार बारकाईने लक्षात घेण्यासारखा आहे.

इस्लाम हा धर्मच 'स्वातंत्र्याच्या भया' वर उभा आहे. त्यामुळे कुणाही सश्रद्ध कडव्या मुसलमानाला तुम्ही बाकी काही सांगू शकता, पण पैगंबर हेसुद्धा माणूस होते, त्यांच्या गुणदोषांची चर्चा करू या, असं सांगितलं की तो बिथरेल. आणि तरीही तुम्ही ती चर्चा कराल आणि माणूस म्हणून पैगंबरांचे दोष सांगायला जाल, तर तो तुमचा तिरस्कार करेल, हिंसक बनेल आणि शक्यतोवर तुमचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न करेल.

सश्रद्ध आणि कडव्या शिवसैनिकासमोर बाळासाहेबांच्या माणूस म्हणून गुणदोषांची चर्चा करण्याचा प्रयत्न केला तर काही वेगळा अनुभव येईल काय?

आपण ज्याचा द्वेष करतो त्याच्यासारखंच आपल्याला आधी बनावं लागतं त्याचं हे उत्तम उदाहरण आहे.

कुराणातच एक छान प्रश्न आलेला आहे.

लोकांनी पैगंबरांना विचारलं, ''हे महंमदा, परमेश्वराने तुलाच काय म्हणून प्रेषित निवडलं? आणि तू प्रेषित आहेस, हे तरी कशावरून?''

त्याचं उत्तर असं दिलेलं आहे. ''जा, त्यांना सांग, मी परमेश्वराचा प्रेषित आहे कारण परमेश्वराची इच्छा तशी आहे. प्रेषित कोण हे ठरवणारा परमेश्वर आहे, तुम्ही नाही. आणि त्यांना सांग, प्रेषित असल्याचा पुरावा मागणारे तुम्ही कोण? तुम्ही विश्वास ठेवा आणि शरण या. शरण न आलात तर परमेश्वराचं काही बिघडत नाही. घोर नरक यातना तुमच्यासाठीच आहेत. आणि परमेश्वर महान सामर्थ्यशाली आहे.''

हे सारं स्वत:मध्येच पुरेसं स्पष्ट आहे.

सर्वच काळात अनुयायांना 'प्रेषितां'ची गरज ही 'प्रेषिताला' असलेल्या

अनुयायांच्या गरजेपेक्षा जास्त होती. आणि समानता आणि व्यक्तिस्वातंत्र्य नाकारून शरणागत सुरक्षिततताही इथून-तिथून सारखीच नसते काय?

डॉ. सर्वापल्ली राधाकृष्णन यांनी ईश्वर, प्रेषित आणि अनुयायी यांच्यातल्या द्वैताबद्दल लिहिलं होतं, ''या प्रकारची द्वैतवादी विचारसरणी ही समाजाला गुलामगिरीशिवाय काहीही देऊ शकत नाही. कारण कुणीतरी सर्वश्रेष्ठ असतो. तुम्ही शरण जायचं असतं. ही विचारसरणी मानवाच्या आतल्या विवेकाचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या नीतीमत्तेचा पायाच उद्‌ध्वस्त करते. मग माणसात स्वयंसिद्ध चांगुलपणा म्हणून काही उरतच नाही.''

तर या एका सर्वोच्च सर्वश्रेष्ठामध्ये आपल्या 'अहं' च्या विलयातच एकाच वेळी सेवाभावी आणि त्याच वेळी विध्वंसक असण्याच्या कोड्याचंही उत्तर आहे. एकाच वेळी ॲम्ब्युलन्सचं जाळं उभारणारे, रक्तदानाला धावणारे, सामान्यांच्या नोकऱ्यांसाठी लढणारे हात इतके विध्वंसक कसे होतात? हे कळण्याकरता हे समजून घेतलं पाहिजे की, या साऱ्या बाबी स्वत:च्या विवेकाने घेतलेल्या निर्णयावर उभ्या नसतात, तर प्रेषिताच्या आणि संघटनेच्या अस्तित्वात 'अहं'चा विलय केलेल्या दुसऱ्या एकाद्या व्यक्तींची सेवा किंवा त्या व्यक्तीच्या आयुष्याचा विध्वंस ही तेवढीच पुण्यप्रद असते. त्याच्या दृष्टीने या दोन्हीही फक्त कृती असतात. प्रेषिताचा आदेश वा संघटनेची गरज त्या कृतींना अर्थ प्राप्त करून देतात. जसा अनुयायांच्या आयुष्याला संघटना अर्थ प्राप्त करून देते.

या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर, शिवसेनेसारख्या संघटनेत आपापसातल्या गटबाजीला, हेव्यादाव्यांना आणि आपापल्या शाखांवर वा प्रभागात आपण 'मिनी बाळासाहेब' बनवण्याच्या कृतीचा अर्थ कसा लावायचा हा प्रश्न असतो.

गटबाजी हा अनुयायांचा आपआपसातला व्यवहार असतो. तो कुठच्याही अशा एकचालकानुवर्ती संघटनेत असतो. पण फक्त फरक एवढाच की, ही गटबाजी व्यक्त करण्याचं मोकळं स्वातंत्र नसल्याने, प्रश्न खालून वर फार क्वचित जातात. त्यामुळे हे सारं आतल्याआत चिघळत जाऊन जाहीर संधी मिळाल्यावर रडू कोसळणं वा हताशता अनावर होणं अशा रितीने बाहेर येतं.

वर उल्लेख केलेल्या 'मिनी बाळासाहेब' बनण्याच्या वृत्तीला पण एक मानसिक अर्थ आहे. प्रत्येक अनुयायाच्या अबोध मनात प्रेषिताचं स्वप्न लपलेलं असतंच. संधी मिळताच, मूळ प्रेषिताचा अनादर न करता *(किंबहुना त्याला वंदन करून)* जसे पोप जिझसला वा खलिफा पैगंबरांना वंदन करून आपणच आपल्याकडे त्यांची भूमिका

घेतात, तसं हे आहे.

प्रश्न हा आहे की, जनतेचं किती भलं करण्याची क्षमता या साऱ्यात आहे?

## २. बकरी लावलेला सापळा : हिंदुत्वाचा

शेवटी कोणत्याही राजकीय संघटनेचं मानसिक आणि अंतर्गत स्वरूप एकदा लक्षात घेतलं की त्यानंतर सर्वात महत्त्वाची लक्षात घ्यायची गोष्ट असते ती, या संघटनेने अनुयायी जनतेचं किती कल्याण केलं? शेवटी शिवसेनेबद्दलही हा सगळा ऊहापोह करण्याचं एकमेव कारण म्हणजे महाराष्ट्रातल्या जनतेच्या भवितव्यावर परिणाम घडवण्याची क्षमता शिवसेनेमध्ये काँग्रेस, भा. ज. पा., राष्ट्रवादी काँग्रेसपेक्षा किती तरी जास्त आहे. आणि शिवसेना अवघी सदतीस वर्षांची आहे. म्हणजे तिच्या कार्यकारी अध्यक्षांहून ती पाच वर्षांनी लहान आहे.

शिवसेनेच्या संघटनावाढीचे चार टप्पे पडतात. १९६६ ते ७५ हा पहिला टप्पा, ७५ ते ८७ दुसरा टप्पा, ८७ ते ९५ तिसरा टप्पा आणि ९५ ते पुढे हा चौथा टप्पा.

पहिल्या टप्प्यात शिवसेनेची स्थापना आणि शिवसेनेचा भारलेला काळ होता. बाळासाहेबांना त्यांच्या आयुष्यात झालेली एकमेव अटक याच काळातली. तेव्हा मुंबईत पेटलेल्या दंगलीनंतर बाळासाहेबांना हात लावण्याची हिंमत कुठल्याच सरकारने केली नाही. या भारलेल्या नऊ वर्षांनंतर दुसरा टप्पा हा शिवसेनेच्या आयुष्यातील सर्वात कसोटीचा कालखंड. आणिबाणीत शिवसेनेने इंदिराजींना पाठिंबा दिल्यानंतर शिवसेनेच्या लोकप्रियतेला ग्रहण लागलं. या कालखंडातच लागोपाठच्या पराभवांपाठोपाठ कामगार क्षेत्रात दत्ता सामंतांच्या वर्णनविलक्षण लोकप्रियतेचा सामना शिवसेनेला करावा लागला. काही काळ शिवसेना तिथेही निष्प्रभ झालेली होती. या काळात अत्यंत निष्ठावान, कडवे असे शिवसैनिकच शिवसेनेसोबत राहिले. पालिका निवडणुकीतला वगळता अनेक पराभव शिवसेनेला पचवावे लागले. तिसऱ्या टप्प्यात १९८७ मध्ये या मलूलपणाला संजीवनी देण्यासाठी बाळासाहेबांनी 'गर्व से कहो हम हिंदू है' च्या घोषणेसह विलेपार्ल्याची विधानसभेची निवडणूक लढवली. *(रमेश प्रभू त्या निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार होते.)* ती निवडणूक नंतर कोर्टात हरावी लागली तरी पराभवाची छाया असलेल्या दुसऱ्या टप्प्यातून शिवसेना त्याद्वारेच बाहेर पडली. वास्तविक शिवसेनेच्या त्या विजयीने पर्वाला हिंदुत्वापेक्षाही इतर अधिक महत्त्वाची कारणं होती. त्याबद्दल पुढे येईलच. तिसऱ्या टप्प्यात शिवसेना व्यापक रूपात पक्ष म्हणून महाराष्ट्रभर दौडू लागली. याच तिसऱ्या टप्प्यात सेना-भा. ज. पा. युती झाली. ती पुढे १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत सत्तेवर येण्याची सर्व चिन्हे दिसत

असताना शरद पवारांच्या नेतृत्त्वाखालील कॉंग्रेसने त्यांना अस्मान दाखवलं. शरद पवारांचं आजवरचं ते सर्वात दैदिप्यमान यश मानता येईल. चौथ्या टप्प्यात शिवसेनेने भा. ज. पा.च्या सहकार्याने निवडणूक जिंकली. शिवसेनेत खऱ्या अर्थाने सत्ता-संस्कृतीचा शिरकाव याच काळात झाला. पाच वर्ष सेनेने राज्य भा. ज. पा. च्या साथीने उपभोगलं. मग सत्ता गमावली. आमदार फोडून 'चमत्कार' घडवून सत्ताप्राप्तीची स्वप्नं पाहिली. याच काळात उद्धव ठाकरे शिवसेनेचे कार्याध्यक्ष झाले. शिवसेनेने 'मुंबई सर्वांची' असं म्हणायला याच काळात सुरुवात केली. संजय निरूपम हे शिवसेनेचे मुंबईलॉजिस्ट आणि महाराष्ट्रलॉजिस्ट याच काळात बनू लागले. आणि त्यांच्याच हुशारीने मुंबईत शिवसेनेच्या पाठिंब्यावर बिहारी छठ-पूजा होऊ लागल्या...

या चारही टप्प्यात शिवसेनेतल्या काही बाबी तशाच राहिल्या, काही आमूलाग्र बदलल्या.

सुरुवातीपासून शिवसेनेत विचार म्हणजे, बाळासाहेब जो म्हणतात तो. त्या पलिकडे जग बदलतं आहे, नवनवीन विचार येत आहेत, ते आत्मसात करावेत, शिकून घ्यावेत, याकडे शिवसैनिकांनी अनास्थेने पाहिलं. याचे घातक परिणाम शिवसैनिकांवर झाले, तसेच ते शिवसेनेवरही झाले. उदाहरण द्यायचं तर, सत्ता आल्यावर शिवसैनिकांमधून योग्य त्या पदासाठी योग्य ती अर्हता आणि योग्य ती कार्यक्षमता असलेली माणसं मिळेनात. अशी क्षमता नसल्यामुळे नेतृत्वाला योग्य ती तयारी आणि क्षमता नसलेली माणसं पदावर नेमावी लागली. वेळोवेळी त्यांची अवहेलनाही करावी लागली. दुसरीकडे शिवसैनिकांनाही मोठ्या कळीच्या पदावर आपल्यातल्याच एकाची नेमणूक होण्याऐवजी बाहेरून माणूस आयात होऊन त्याची प्रतिष्ठापना होताना उघड्या डोळ्यांनी बघावं लागलं. ही अवनती टाळता आली असती. पण संघटनेच्या घडणीच्या काळात बाळासाहेबांनी बौद्धिक सामर्थ्याची टवाळी केली आणि फक्त आदेशपालनाच्या कृतीचं हिरीरीने समर्थन केलं.

सुरुवातीला शिवसेना शाखांद्वारे पसरत गेली. गावागावात, गल्लीगल्लीत, वाडीवाडीत शिवसेनेच्या शाखा उभ्या राहिल्या. बँकात, सरकारी वा खाजगी कार्यालयात नोकरी करणारे अनेक जण या शाखा चालवत असत. शाखांमधून मराठी माणसाचे प्रश्न तत्काळ सोडवण्याची संस्कृती आली. वेगाने शाखा ही सामर्थ्यकेंद्रं बनली. त्या काळात मराठी माणसाला नोकरीत सामावून घेण्याचा प्रश्न उग्र होता. एअर इंडियापासून ते इतर अनेक सरकारी, निमसरकारी, खाजगी कार्यालयात मराठी माणसांना ऐंशी टक्केपर्यंत राखीव जागा ठेवण्याची मागणी घेऊन स्थानीय लोकाधिकार

समिती उभी राहिली. सुधीर जोशींच्या नेतृत्वाखाली स्थानीय लोकाधिकार समितीने अभूतपूर्व असं यश मिळवलं. स्थानीय लोकाधिकार समितीच्या माध्यमातून अनेक मराठी तरुण अन्नाला लागले. अनेक मराठी घरं उभी राहिली. त्या कुटुंबांच्या कृतज्ञतेच्या भावनेतून शिवसेना फोफावत गेली. शिवसेनेच्या शाखाशाखांवर गर्दी वाढत गेली. दुसरीकडे कामगारक्षेत्रातही हा 'मराठी'चा नारा बुलंद ठरला. कित्येकदा मालककेंद्री धोरण स्वीकारूनही शिवसेनाप्रणित कामगार संघटना कामगार क्षेत्रात *(मधल्या काही काळाचा अपवाद वगळता)* फोफावत गेल्या. यातून शिवसेनेला कार्यकर्ते तर मिळालेच. पण संघटनेचा आर्थिक पायाही मजबूत झाला.

वास्तविक कामगार क्षेत्रापासून ते पोलीस दलापर्यंत शिवसेनेची खरी शक्ती स्थानीय लोकाधिकार समितीच होती. पण कामगार क्षेत्रात 'मालक जगला तर कामगार जगेल,' असं विचित्र न्यूनगंडात्मक धोरण शिवसेनेने राबवलं. वास्तविक या धोरणाला अर्थशास्त्रीय वा समाजशास्त्रीय अशा कुठच्याही सिद्धांताचा पाठिंबा नव्हता. मालकांना कुठलीही कटकट न होता उत्पादन काढून हवं होतं. शिवसेनेला आपल्या युनियनचा कामगार बेकार व्हायला नको होता. शिवाय मालकांशीही चांगले संबंध ठेवून अधिक व्यापक हितसंबंध बळकट करायचे होते. 'वस्तुस्थितीचं सोपेकरण' करण्याचं तत्त्व इथेही पाळलं गेलं. त्याचे परिणाम भयानक झाले. हे भयानक परिणाम मुंबईतल्या मराठी माणसांवर झाले. गिरणी आणि इतर औद्योगिक कामगारांवर झाले. शिवसैनिकांवर झाले, अन् शेवटी शिवसेनेवरती झाले. त्याचे खरे भीषण परिणाम शिवसेनेला आता यापुढे भोगावे लागणार आहेत.

डाव्यांच्या कामगार संघटनांनी *(आणि दत्ता सामंतांनी)* उठसूठ संप घडवून आणि पुन्हा कामगारांची अरेरावी आणून वेगळ्या मार्गाने Arrogance of Inferiority चंच तत्त्व राबवलं. त्यामुळे संप, बहिष्कार ही शस्त्रं निकामीच झाली. शिवसेनेने कामगाराच्या बाबतीत 'अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत' कधी समजूनच घेतला नाही. त्यामुळे औद्योगिक चक्र जागतिकीकरणानंतर *(१९९१ नंतर)* बदलू लागलं, तेव्हा औद्योगिक घराण्यांनी आणि धनिकांनी आपलं हित बरोबर साधलं आणि संपूर्ण औद्योगिक जगात कामगाराला वालीच राहिला नाही. नव्या नोकऱ्या निर्माण होणं बंद झालं. गिरणीकामगार देशोधडीला लागला. तेव्हा शिवसेना आपल्या या पाठीराख्या वर्गासाठी रस्त्यावर उतरू शकली नाही. परळ-लालबागमधला कामगार अक्षरश: उद्ध्वस्त झाला. तिथे 'बोलिंग ॲली' उभ्या राहिल्या. एका गिरणीमालकिणीने तर मुख्यमंत्री मनोहर जोशींची विनंतीसुद्धा उडवून लावली. हे बळ शिवसेनेनेच

मालकवर्गाला दिलं होतं. आजघडीला कामगार-मालक आणि एकंदरीतच औद्योगिक जगाबाबत पक्ष म्हणून आपण नेमकं काय धोरण राबवायचं याबाबत शिवसेनेकडे विचारपूर्वक आखलेलं धोरणच नाही असं लक्षात येतं.

उद्धव ठाकरेंनी मध्यंतरी 'केंद्र सरकारची कामगारविरोधी धोरणं सहन करणार नाही' असा इशारा दिला, तेव्हा याचा नेमका अर्थ काय? याचं कोणतंही स्पष्टीकरण शिवसेनेकडून कधीच आलं नाही. १९९५ साली सत्ता आल्यानंतर जी धोरणं सेनेकडे असायला हवी होती, ती कधी बनलीच नाहीत.

वास्तविक सत्तेवर येणाऱ्या आणि सत्ताधारी होऊ पाहणाऱ्या पक्षाकडे इतर अनेक धोरणांप्रमाणेच कामगार आणि शेतकऱ्यांसंबंधी धोरणं असायला लागतात. ज्या धोरणांमुळे औद्योगिक घराण्यांवर आणि उद्योगपतींवर पक्षाचा काही प्रमाणात वचक रहातो, शिवाय बदलणाऱ्या जगाचाही पक्षाला आपल्या धोरणांच्या संदर्भात विचार करता येतो, कामगार आणि शेतकरी हे निर्माण होणाऱ्या अर्थशक्तीचे कृतिशील घटक असतात. ज्या पक्षाकडे त्यांच्यासंबंधी *(बरोबर वा चूक)* धोरण नसतं त्या पक्षाला इतर अनेक आनुषंगिक विषयांवरची धोरणं ठरवता येत नाहीत. स्वतःचे निकड-तक्ते *(Priority-List)* बनवता येत नाहीत. आणि सर्वात दुर्दैवाचं म्हणजे, *(पर्यायाने)* स्वतःच्या यशापयशाचे अंदाजही बांधता येत नाहीत.

औद्योगिक कामगार आत्महत्या करताहेत तसंच शेतकरी-शेतमजूरही आत्महत्या करताहेत. यावर कोणत्या पर्यायी धोरणांनी आपण त्यांची स्थिती जगण्यास सुसह्य करणार आहोत याचा नकाशा राज्यातल्या सर्वात बलवान पक्षाकडे असायला नको?

१९९५ साली भा.ज.पा.च्या साथीने शिवसेनेकडे सत्ता आली. तो शिवसेनेच्या आयुष्यात घडलेला एक चांगला अपघात होता. पण ते का घडलं याचा अन्वयार्थ लावण्यात शिवसेना अपयशी ठरली. त्याचा नीट उलगडा केला म्हणजे शिवसेनेच्या संदर्भातल्या अनेक गुंतागुंतीच्या प्रक्रियांचा उलगडा होतो.

१९८७ साली हिंदुत्वाचा पुकारा शिवसेनेने सुरू केला. त्या अगोदर शिवसेनेने मराठी भूमिपुत्रांच्या मुद्द्यावर मुंबई-ठाणे परिसरात आंदोलन केलं होतं. महापालिकाही जिंकल्या होत्या. ''महाराष्ट्र हे आम्हाला आमचं राज्य म्हणून हवं आहे. ते आम्ही आम्हाला हवं तसं घडवू. उत्तर प्रदेश, बिहार, तामिळनाडू वगैरे सर्वांबरोबर आम्ही आनंदात राहू. पण आम्ही कष्टाने निर्माण केलेल्या पायाभूत सुविधांमध्ये ते भागीदार म्हणून नको आहेत. आणि या पायाभूत सुविधा निर्माण करण्यात त्यांचाही वाटा आहे

असा त्यांचा दावा असेल, तर त्यांनी या सुविधा त्यांच्या प्रदेशात का निर्माण केल्या नाहीत? हा आमचा त्यांना प्रश्न आहे.'' ही पाच वाक्यं हीच शिवसेनेची महाराष्ट्राबाबतची भूमिका ठरली असती. शिवसेनेचा स्वभाव हा मराठी माणसाचा होता. महाराष्ट्र प्रदेश हे शिवसेनेचं कार्यक्षेत्र या मुद्द्यावर व्हायला हरकत नव्हती. पण मुंबई, ठाणे सोडून उर्वरित महाराष्ट्राला मराठी माणसाचा मुद्दा भिडत नाही असा समज शिवसेनेने करून घेतला. त्यामुळे हिंदुत्वाचा मुद्दा घेऊन भा.ज.पा. बरोबर युती करणं शिवसेनेला भाग पडलं. दुसरं म्हणजे, एकदा ही युती केल्यावर शिवसेनेला सत्तेची बकरी मटकवण्याकरता हिंदुत्वाच्या वृथा *(स्यूडो)* व्यापकतेच्या सापळ्यात जाणं भागच होतं. अन्यथा शिवसेनेच्या जोरावर भा.ज.पा.चा पाया विस्तारत गेला असता आणि अंतत: शिवसेनेला भा.ज.पा.ने शोषून घेतलं असतं. आणि तिसरं म्हणजे, शिवसेनेच्या या बदललेल्या स्वरूपात शिवसेनेत अर्थकारणाला प्रचंड मोठी गती आली आहे. आज शिवसेनेची अर्थसत्ता प्रामुख्याने परप्रांतीयांच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. पक्षाचा डोलारा चालवण्याकरता जो प्रचंड पैसा लागतो तो आता परप्रांतियांना दुखावून उभा करणं शिवसेनेला शक्य नाही. या तीन परस्परावलंबी कारणांमुळे 'मराठी माणसा'ची शिवसेनेच्या केंद्रस्थानावरून हळुहळू गच्छन्ति होत आहे, होणार आहे.

वास्तवात या कारणांकडे पाहिल्यावर काय दिसतं?

हिंदुत्वाच्या मुद्द्यावर भा.ज.पा.ने शिवसेनेशी केलेली युती ही शिवसेनेला तात्पुरत्या फायद्याची ठरली, तरीही अंतिमत: तिचा फायदा भा.ज.प.लाच होणार आहे. कारण सेनेसोबत युती करण्याअगोदर भा.ज.पा.ला महाराष्ट्रात चेहराच नव्हता, आयडेन्टिटी नव्हती, गुडविल नव्हतं, ते सारं शिवसेनेने भा.ज.पा. ला दिलं. बदल्यात शिवसेनेला स्वत:चा जो चेहरा होता तो हळुहळू गमवावा लागणार आहे.

वास्तविक हिंदुत्वाच्या मुद्द्यावर शिवसेना महाराष्ट्रभर पसरली हा यातला एक मोठा भ्रम आहे. हिंदुत्व या साऱ्यातला फक्त एक छोटासा मुद्दा आहे. *(त्यावर मी येणारच आहे.)* मराठी भूमिपुत्राचा मुद्दा शिवसेनेने उचलला तेव्हा तसा मुद्दा उचलणारी शिवसेना ही एक आणि एकमात्र संघटना होती. हिंदुत्वाचं तसं नव्हतं. या देशात धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली मुसलमानांचे लाड केले जातात, हिंदूंवर अन्याय केला जातो, असं मानणारा एक मोठा गट होता. या मुद्द्याच्या आधारावरच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झालेली होती. जनसंघ आणि नंतर भा.ज.पा.च्या अजेंड्याचा मोठा भाग याच मुद्द्यावर उभा होता. शिवसेनाही मलंग गडाबाबत वगैरे हे मुद्दे उचलतच असे. तरीही शिवसेनेने हा मुद्दा उचलल्यावर त्यांना निवडणुकात आश्चर्यकारक यश मिळालं.

कारण महाराष्ट्रात *(पश्चिम महाराष्ट्रातील विकासक्षेत्र वगळता काँग्रेसच्या आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुद्धा)* विषम विकासतंत्राविरुद्ध, सरंजामदारीविरुद्ध आणि नवजातीयवादा-विरुद्ध जनतेच्या मनात आग खदखदत होती. त्या आगीला शिवसेनेने वाव दिला. आता शिवसेना फक्त मुंबईतल्या परप्रांतीयांविरुद्ध न लढता सर्व महाराष्ट्रातल्या मराठी माणसावरच्या अन्यायाविरुद्ध लढणार असल्याचा त्यांचा लेखी अर्थ होता. महाराष्ट्रभर काँग्रेस *(आणि राष्ट्रवादीच्या)* एकतंत्री सरंजामशाहीविरुद्ध लढण्याचा *(दलित आणि ब्राह्मण वगळून)* सर्वांना मार्गच सापडला होता. त्या मार्गाला बाळासाहेब 'हिंदुत्व' म्हणत असतील तर त्यांची त्याला हरकत नव्हती. पुन्हा शिवसेनेत अजिबात जातीयवाद नव्हता. पुढे निवडणुकांमध्ये शिवसेनेचं लोण महाराष्ट्रभर पसरण्यामध्ये बाळासाहेबांनी हिंदुत्वाच्या घेतलेल्या व्यापक भूमिकेचा मतदारांनी लावलेला सोयीस्कर *(आणि अचूक)* अर्थच कारणीभूत होता. पुढे महाराष्ट्रभर शिवसेना पसरत होती. पण 'हिंदुत्व' हा शिवसेनेसाठी बकरी लावलेला सापळा होता. बकरी मटकावल्यावर परतीचा मार्गच नव्हता. जो शिवसेनेसाठी सापळा होता ती भा.ज.पा.साठी संधी होती.

हिंदुत्वाच्या मुद्द्यावर लोक एकत्र येते तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आणि भारतीय जनता पक्षाने तसा बराच कंठशोष चालवला होता. त्यांना लोक अजिबात बधले नव्हते. शिवसेनेमध्ये स्थानिक काँग्रेसच्या सरंजामदारांना आव्हान देण्याचं सामर्थ्य आहे हे लोकांना मनापासून वाटलं. म्हणून लोकांनी शिवसेनेला डोक्यावर घेतलं. सामान्य सेनानेते प्रस्थापितांच्या लाठ्याकाठ्या खाऊन पारावर ज्या बैठका घेत होते त्यात लोकांच्या दैनंदिन प्रश्नांची तड लावण्याचे प्रयत्न जीवाच्या कराराने चालवले होते. मुस्लिमांच्या मूलतत्त्ववादी नेतृत्वाशी संघर्षाच्या ठिणग्या उडत असतीलही. पण मुख्य लढा काँग्रेसच्या अजगराशीच होता. शिवसेनेत जी प्रचंड ऊर्जा निर्माण झाली ती प्रस्थापित काँग्रेसच्या सरंजामशाही आणि नवजातीयतेविरुद्ध निर्माण झालेल्या लोकभावनेतूनच. मग त्याला लेबल हिंदुत्वाचं असण्याला लोकांचा विरोध नव्हता...

खरे पेच वेगळ्याच ठिकाणी निर्माण झाले होते. भा.ज.पा.चं हिंदुत्वाचं लेबल चोरीला गेलं होतं. त्यावर त्यांनी युतीची सुवर्णसंधी साधली. पण त्यामुळे सेनेलाच मोठा पेच येणार होता.

शिवसेना 'मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी' या मुद्द्यावर मुंबई-ठाण्याबाहेर पसरू शकत नाही या सेनेच्या बाजूने झालेल्या विश्लेषणात एक मोठी चूक आहे. जे प्रादेशिक पक्ष शिवसेनेच्या मागाहून जन्माला येऊन इतर प्रांतात सत्ताधीश झाले त्यांच्या यशासाठी त्यांना इतर कुठल्याही धार्मिक मुद्द्याचा आश्रय घ्यावा लागला

नाही. तेलगू देसम, ए आय डी एम के, डी एम के वगैरेसारखे पक्ष प्रादेशिक अस्मितेवरच उभे राहिले, पसरले, राज्यकर्ते झाले. याची दोन कारणं होती. एक तर जनतेच्या मनात आपण चांगले शासक होऊ असा विश्वास त्यांनी निर्माण केला. दुसरं म्हणजे, राज्यकर्त्या काँग्रेसला आव्हान देणारा कार्यक्रम त्यांनी लोकांसमोर ठेवला.

याउलट, एक आंदोलन आणि एक राजकीय पक्ष यांच्यात फरक असतो, याचं भानच शिवसेनेला फार उशीरा आलं. सुरुवातीला शिवसेनेच्या शाखांचा जो उल्लेख केलेला आहे तिथे स्थानिक पातळीवर एक प्रकारचं समांतर सरकारच चालवलं जात असे. हे व्यवस्थेचं सुलभीकरण भविष्यात राज्यकर्ता बनू पाहाणाऱ्या पक्षाला सूक्ष्म पातळीवर खूपच महागात पडतं. पक्षातल्या कार्यकर्त्याला व्यवस्थेच्या जगड्व्याळ-पणाची जाणीवच होत नाही आणि लोकही तुम्हाला स्थानिक पातळीवर प्रश्न जिथल्या तिथे सोडवणारी संघटना या स्वरूपात घ्यायला लागतात. दुसरीकडे शिवसेनेने शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नांवर सखोल समज दाखवली नाही. धोरणांमध्येही सातत्य ठेवलं नाही. शिवाय लोकशाही व्यवस्थेत राजकीय विरोध, नेतृत्वावर टीका, धोरणांवर हल्ला हा होणारच. अशा प्रकारची टीका इंग्लंडच्या व्हिक्टोरिया राणीनेही *(तीही व्यक्तिगत)* सहन केलेली आहे. ही टीका सहन करून त्याला आत्मपरीक्षणाकरता वापरण्याची प्रगल्भता शिवसेनेने दाखवली नाही.

बाळासाहेबांनी अनेकदा 'माझा या लोकशाहीवर विश्वास नाही,' असं सांगितलेलं आहे. ठीक आहे. मग शिवसेनेने भासमान आक्रमकतेत गुंतून पडता कामा नये होतं. खऱ्याखुऱ्या आक्रमकपणे व्यवस्था मुळातून बदलून टाकण्याकरता उभं राहायला हवं होतं. निवडणुका न लढवता त्यांच्यावर बहिष्कार टाकून किंवा त्या लढवून मुळातून व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न करायला हवा होता. म्हणजे क्रांती. अशी क्रांतिकारकता ॲडॉल्फ हिटलरने दाखवली होती. *(ती बरोबर वा चूक हा मुद्दा वगळून)* असं काहीही न करता सेनेने टीकेबाबत फक्त अतिरेकी हळवेपणा दाखवला. शेवटी या सर्व कारणांनी राजकीय पक्ष म्हणून जो आत्मविश्वास, सक्षमता, प्रगल्भता मिळवायला हवी होती ती गमावली.

भविष्यात अखेर ती कसर शिवसेनेने भा.ज.पा.बरोबर राज्यात युती करून भरून काढली. शिवसेनेने आपल्या दुर्लक्षित अंगासाठी अशा अशक्तपणासाठी जबर किंमत मोजली, अशीच याची *(या युतीची)* इतिहासात नोंद होईल.

कारण शिवसेनेने कितीही 'हिंदुत्व' म्हटलं तरी शिवसेनेच्या हिंदुत्वासाठी लढणारा माणूस मराठीच होता. भा.ज.पा.चं त्या माणसाशी काही देणं-घेणं नव्हतं.

बाळासाहेबांनी म्हटल्यावर बरोबर-चूक, खरं-खोटं, वास्तव-अवास्तव, शक्य-अशक्य असा विचारही न करता सर्व निष्ठा आणि श्रद्धा शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरेंना अर्पण करणारा माणूस मराठीच होता. न जाणो, या निष्ठा आणि श्रद्धांसाठी त्याने स्वत:चं आणि इतरांचं किती रक्त आणि अश्रू वाहवले होते. शिवसेनेच्या 'व्यापक' हिंदुत्वासाठी कोणत्याही अमराठी माणसाने कधीही रक्त, अश्रू वाहवले नाहीत की लाठ्या खाल्ल्या नाहीत. परंतु हिंदुत्वाच्या या व्यापक सापळ्यामुळे 'अमराठी' माणसांना शिवसेनेत 'न भूतो' अशी प्रतिष्ठा मिळाली. त्याच वेळेला 'मराठी माणसा'चा मुद्दा उपरा ठरला. संघटना म्हणून शिवसेनेला हिंदुत्वाच्या व्यापकपणापायी जे तडे जाताहेत ते आत्ता दिसणार नाहीत. पण काही काळ गेल्यावर त्याची व्याप्ती लक्षात येईल. मुंबईत शाकाहारी विरुद्ध मांसाहारी असा वाद झाला तेव्हा त्याची चुणूक मिळालेली आहे. मांसाहारी असलेल्या मराठी माणसांना आजही जैन सोसायट्यात घरं दिली जात नाहीत. पण शिवसेनेने त्यांच्या विरुद्धच्या आंदोलनावर 'पडदा' टाकलेला आहे. म्हणजे जैनांनी आपल्या हिंसक शाकाहारी तत्त्वज्ञानाची दंडेली चालू ठेवलेली आहे. पण मराठी माणसांनी त्यांच्याविरुद्ध आवाज उठवून 'आपआपसात' लढू नये अशी सेनानेतृत्वाची अपेक्षा आहे. व्यापक हिंदुत्वाचा भा.ज.पा. प्रणित सापळा शिवसेनेच्या आणि मराठी माणसाच्या कसा मुळावर येणार आहे त्याची ही फक्त चुणूक आहे.

शिवसेनेच्या निकड-तक्त्यामध्ये परप्रांतीय वर येऊन मराठी माणसाचं स्थान खाली घसरलं त्याला शिवसेनेची युतीमुळे वाढलेली राजकीय शक्ती कारणीभूत आहे. हिंदुत्वाचं लेबल जर आता भा.ज.पा.ला हिसकावू द्यायचं नसेल तर या सापळ्यात सेनेला हा सारा आटापिटा करणं भाग आहे. वाढत जाणाऱ्या पक्षाला अर्थकारणाचा डोलारा सांभाळावा लागतो. तो डोलारा मराठी माणसापेक्षा परप्रांतीय चांगला सांभाळू शकतात असं सेनानेतृत्वाला वाटत असलं, तरी परप्रांतीय हा डोलारा का सांभाळतात? बहुसंख्य मराठी माणसांनी आपल्या सर्व निष्ठा एकवटून जी राजकीय ऊर्जा निर्माण केली त्या ऊर्जेचा आपल्याला(च) उपयोग व्हावा म्हणून परप्रांतीय आपलं अर्थकारण शिवसेनेच्या मागे उभं करत आहेत. पण या अर्थकारणासाठी राजकीय ऊर्जेचा वापर करणं शिवसेनेला प्रचंड आत्मघाताचं ठरणार आहे. कारण राजकीय उर्जा निर्माण करणारा *(मराठी)* आणि अर्थकारण उभं करणारा गट *(परप्रांतीय)* यांचे हितसंबंधच नेमके परस्परविरोधी आहेत. आणि व्यवहारातल्या स्वच्छ, नागड्या स्वार्थांना हिंदुत्वाच्या *(व्याख्यासुद्धा न करता येण्याजोग्या)* धेडगुजरी मुद्द्याद्वारे झाकून ठेवणं फार

काळ शक्य नाही.

शेवटी भारतात हिंदुत्व मानलं की, 'जय महाराष्ट्र' म्हणून आपल्या न्याय हक्कांना मुंबईतच मागण्याची चोरी होते. कारण मग मुंबईतल्या उत्तर प्रदेशी भैय्यांना त्यांचे हितसंबंध दुखावले जातात हे दिसल्यावर व्यापक हिंदुत्ववादी उत्तर प्रदेशी शिवसैनिक वाराणसीत 'जय उत्तर प्रदेश' म्हणून तिथल्या मराठी माणसांना ऐरणीवरच घेतो, तेव्हा जो निर्माण होतो त्यालाच 'बकरी लावलेला सापळा' असं म्हटलं पाहिजे.

या संदर्भातला अखेरचा मुद्दा म्हणजे *(ज्याचा उल्लेख वर आलेलाच आहे)* हे सारं जनतेमधून येतं आणि जनतेमध्येच जायला हवं याचा विसर आपण पडू द्यायचा नसेल तर, जॅकी श्रॉफ, मार्कंड अधिकारी, दीपक पारीख, सुनील शेट्टी, उदय कोटक, जावेद अख्तर हे सगळे जेवढे मुंबईचे नागरिक 'मुंबईकर' आहेत, तेवढंच रोजच्या रोज व्ही.आर.एस., सी.आर.एस. घेत देशोधडीला लागणारे मराठी औद्योगिक कामगार हे सुद्धा 'मुंबईकर' आहेतच. शिवाय देशोधडीला लागून उद्ध्वस्त झालेला गिरणी कामगार, त्याची पोरंबाळं हेसुद्धा मुंबईकरच आहेत. याचा धोरणात्मक विचार शिवसेना कधी करणार आहे? कामगार क्षेत्राबद्दल आणि एकंदरीतच औद्योगिक क्षेत्राबाबत शिवसेनेचं दूरगामी धोरण काय राहणार आहे याबाबत काहीही हालचाल शिवसेनेकडून होत नसेल, तर त्याला अनास्था म्हणावं की असंवेदनशीलता?

शिवसेनेत उदयाला आलेल्या नव्या नेतृत्वाला, शिवसेनेच्या पायाचे दगड याच लालबाग-परळच्या आणि भांडुपच्या कामगारांनी घातलेत हे कोण सांगणार? की अमराठी धनिक?

## ३. पर्याय दोनच : आत्मपरीक्षण वा आत्मनाश

शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरेंची शिवसेनेच्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्यामुळे शिवसेनेतले काही गुंते सुटले, काही अधिक जटिल झाले.

उद्धव ठाकरे यांच्या हातात आलेली शिवसेना एक शक्तिमान राजकीय पक्ष असली, तरी तिचे अंतर्गत पेच विलक्षण होते.

एकेकाळी मुंबईचे म्हणून जे काही प्रश्न आहेत ते एक तर परप्रांतीयांनी निर्माण केलेले मराठी माणसाचेच प्रश्न आहेत याची जाणीव शिवसेनेनेच मुंबईला करून दिलेली होती.

उद्धव ठाकरेंना मुंबईत फक्त अठ्ठावीस टक्के मराठी राहतात आणि बहात्तर टक्के अमराठी परप्रांतीय, याची जाणीव तीव्र होती. कारण त्यांना राजकारण करताना बऱ्याचदा यातल्या एकाची निवड करायची होती. परिस्थितीनेच त्यांच्यावर ही निवड

करण्याची जबाबदारी टाकली होती. त्यांनी बहात्तर टक्क्यांची निवड केली. अनुनय करायचाच तर तो बहात्तर टक्क्यांचा करावा हा विचार त्यामागे होता. अचानक शिवसेनेच्या फर्स्ट-सर्कलमध्ये जे चेहरे दिसू लागले तेच अमराठी होते. उद्धव ठाकरेंनी जी 'मी मुंबईकर' नावाची मोहीम सुरू केली, तिच्या ध्येयधोरणातच एक तत्त्व परप्रांतीयांचं मुंबईत रक्षण करणं आणि पर्यायाने मुंबईचं रक्षण करणं हेच होतं. शिवसेनेने एक वर्तुळ पूर्ण केलं होतं! यामागे मराठी मानसिकतेचाही भाग मोठा आहे. शिवसेनेची सर्व घडण मध्यमवर्गीय मराठी मानसिक मूल्यांवर आधारलेली आहे. मूल्यांमध्ये माणूस मोठा झाला, नावलौकिकाला पोहोचला की, त्याला अमराठी माणसांशी, त्यांच्या संस्कृतीशी उगीचच *(कारणाने करायला काहीच हरकत नाही. किंबहुना तेच नैसर्गिकही आहे.)* जवळीक करणं हे 'स्टेटस् सिम्बॉल' सारखं वाटू लागतं. याउलट मराठी माणसं, मराठी भाषा, मराठी संस्कृती त्याला अचानक 'बॅकवर्ड' वाटू लागतात. त्यांची टवाळी करावी *(आणि त्यातून आपला सर्वसमावेशकपणा सिद्ध करावा)* असं त्याला वाटू लागतं...

शिवसेनेच्या नव नेतृत्वाला त्यांच्या समोरच्या ज्या पेचांची जाणीव आहे त्यापेक्षाही अधिक गंभीर असे पेच त्यांच्यासमोर *(खरं तर सर्वच राजकीय पक्षांसमोर)* वाढून ठेवलेले आहेत. मराठी माणूस असो वा परप्रांतीय, केवळ अनुनय करून त्याचं समाधान होण्याचा काळ आता मागे पडलेला आहे. तो अजून अजून मागत राहील. इतकं मागेल की, नेतृत्वाची विश्वासार्हता धोक्यात येईल. त्याचा दोष केवळ शिवसेनेकडे जात नाही तर देशातील सर्वच राजकीय पक्षांकडे जातो. शिवसेनेबाबत असं म्हणता येईल की, अपेक्षा ठेवूनही शिवसेना त्याला अपवाद ठरली नाही.

आज स्वातंत्र्यानंतरच्या छप्पन वर्षात, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतरच्या त्रेचाळीस वर्षात आणि शिवसेना स्थापनेनंतर सदतीस वर्षात *(शिवसेनेसहित)* राजकीय व्यवस्थेवरचा लोकांचा विश्वास पूर्णपणे उडालेला आहे. हे एका रात्रीत झालेलं नाही. टप्प्याटप्प्याने झालेलं आहे.

शिवसेनेच्या सुरुवातीला शिवसेनेत राजकारणाला गजकरण म्हणण्याची फॅशन होती. लोकांचा या बाबीला मोठा पाठिंबा मिळाला होता. मग वीस टक्के राजकारण आणि ऐंशी टक्के समाजकारण करण्याचं आश्वासन शिवसेनेने दिलं होतं. लोकांचा त्यालाही प्रचंड पाठिंबा मिळाला होता. आज क्रमाक्रमाने जनतेला कुठलंही सरकार वा विरोधी पक्ष आपला वाटेनासा झालेला आहे. लोकशाहीचा प्रयोग हा जनतेच्या आंतरिक सामर्थ्याशिवाय निष्प्राण होत चाललेला आहे. शिवसेना आज राजकीय शक्ती

म्हणून अस्तित्वात आहे. पण आजही जर गुप्त मतदान घेतलं तर *(शिवसेनेसकट)* कुठल्याही राजकीय पक्षाविना राजकीय व्यवस्था जनता पसंत करेल. आज प्रत्यक्ष हितसंबंध गुंतलेल्यांपलीकडे राजकीय पक्षांचा लोकांशी संबंधच उरलेला नाही. त्यामुळेच शिवसेनेसकट सर्व राजकीय पक्षांना अण्णा हजारे किंवा गो. रा. खैरनार धडकी भरवू शकतात. हे सगळं असलं तरीही महाराष्ट्रात आजही जी राजकीय शक्ती आहे ती शिवसेनेकडेच आहे हे मान्य केलंच पाहिजे. राजकीय शक्ती याचा अर्थ निवडणुका जिंकण्याची गणितं वा कला नव्हे. *(पक्षी : शरद पवार).* राजकीय शक्ती म्हणजे संघटनेतील माणसांचा लोकांशी असलेला सरळ संपर्क आणि त्यातून संघटनेत निर्माण होत असलेली ऊर्जा. ही ऊर्जा आजघडीला शिवसेनेकडे सर्वात जास्त आहे. भाग्ययोगाने ही सर्व ऊर्जा आज उद्धव ठाकरेंच्या हातात एकवटलेली आहे.

या ऊर्जेचं वैशिष्ट्य म्हणजे एकतर तिचा विकास होतो, नाहीतर तिचा लय होतो. आहे त्या स्थितीत ती टिकून कधीच राहात नाही. चंद्राच्या कलांप्रमाणे ती असते.

आज शिवसेनेतल्या अंतर्गत सत्तासंघर्षात उद्धव ठाकरे यशस्वी झाल्याचं चित्र आहे. तरीपण हे यश टिकवण्यासाठी या ऊर्जेचा त्यांना सतत विकास करत राहावा लागेल. त्यासाठी प्रचंड बदललेल्या सामाजिक परिस्थितीला सामोरं जाण्यासाठी क्रांतिकारक बदल संघटनेतच करावे लागतील. आणि त्या बदलांचे परिणाम समोर येण्याअगोदर बराच काळ अस्वस्थतेत आणि तणावात काढावा लागेल.

प्रश्न मुळात असा बदल करण्याची इच्छा असण्याचाही आहे. इथे ज्या बदलाचा उल्लेख आहे तो आत्मिक बदल आहे. असा बदल करण्याकरता नेत्याला आपलं नेतृत्व पणाला लावावं लागतं.

उद्धव ठाकरेंनी शिवसेनेत काम करणं सुरू केलं तेव्हा सुभाष देसाईंना आपल्यासाठी बाळासाहेबांकडून मागून घेतलं. त्यानंतर ते बदल करायला निघाले. पण असा बदल करणे तेव्हाच शक्य असते, जेव्हा स्वत:च्या ऐतिहासिक भूमिकेविषयी स्वत:ला प्रचंड समज असते. ती नसेल तर बदल न करणे हेच उचित ठरते. कारण अशा बदलानंतर अनुयायांना तुम्ही जे हवं ते देत नाही, तर त्यांच्या हिताचं जे आहे ते देता. त्यात लोकानुनय नसतो. आणि लोकानुनय न करण्याची परंपरा शिवसेनेत नाही. केवळ चांगली इच्छा असून चालत नाही. एक तर बंडखोर परंपरा तरी पाठीशी लागते किंवा चुकीच्या परंपरा तोडण्याचं बंडखोर धैर्य तरी दाखवावं लागतं. हे धैर्य उद्धव ठाकरे दाखवणार का? हाच खरा प्रश्न आहे.

या व्यतिरिक्त राज्य करण्याची इच्छा असलेल्या संघटनेला जी प्रशासकीय कार्यक्षमता लागते त्यात शिवसेना मुळातच अति अशक्त आहे.

उद्धव ठाकरेंच्या खूप अगोदर राज ठाकरेंचा शिवसेनेत प्रवेश झाला होता. ते बाळासाहेबांप्रमाणेच चालतात, बोलतात, यांचं शिवसैनिकांना फार कौतुक होतं. उद्धव ठाकरेंचा राजकारणप्रवेश त्या मानाने उशिरा झाला. त्यांचं व्यक्तिमत्त्व अजिबात बाळासाहेबांसारखं नाही. त्यांचं जे काही आहे ते त्यांचं स्वत:चं आहे. त्यांचे पेचही.

आज घडीला राज ठाकरेंचे पेच जरा जास्त आहेत. तरीही ते ज्या ठिकाणी उभे आहोत. तिथून संघटनेची नस सहजपणे दाबू शकतात. फक्त योग्य वेळ साधणं त्यांना अवश्य असेल. आणि ती वेळ त्यांना फक्त एकदाच मिळेल. ते ती साधू शकतात वा नाही, कोण बरोबर- कोण चूक ठरेल, या साऱ्याचा फैसला इतिहास करेलच. इतिहास हा सर्वसाक्षी असतो आणि महत्त्वाकांक्षी माणसं सहजासहजी स्वस्थ बसत नाहीत, हा इतिहासाचाच धडा आहे.

शेवटी या Arrogance of inferiority ने बद्ध असणाऱ्या या समाजात थेट प्रतिनिधित्व करताना गर्व वाटावं असं सृजनशील काहीतरी करावं की, जे आहेच त्याचा गर्व बाळगत राहावा, हे ठरवण्याच्या टप्प्यावर शिवसेना येऊन ठेपलेली आहे. नव्या नेतृत्वाला शिवसेनेची आणि स्वत:ची दिशा ठरवताना अगोदर याचा निर्णय करावा लागेल. आणि या निर्णयातच परंप्रातीय × मराठी कामगार × मालक वगैरेंसारख्या अनेक गोष्टींचे निर्णय होऊन जातील.

ज्या हिंदुत्वाचा 'गर्व' बाळगण्याची हाक बाळासाहेबांनी दिली होती ते हिंदुत्व आणि त्याचे मुस्लिम मनाशी असलेले संदर्भ यांचा एक वेध घेतल्याशिवाय या साऱ्या विश्लेषणाला नेमकेपणा येणार नाही. कारण एकचालकानुवर्तित्व हेच मुळात हिंदू नाही. नराला नारायण होण्याची संधी आहे, नव्हे तो नारायणच आहे हे त्याला कळलेलं नाही फक्त. त्याच्या जागृतीसाठी तेवढा धर्म आहे. हिंदूच्या धर्माचं आणि वेगवेगळ्या पद्धतीने वेगवेगळ्या पंथांचं हेच सार आहे.

एक नारायण आणि बाकी सारे नर हे तत्त्व इस्लामच्या जवळ जाणारं आहे. आपण इस्लामचं हिंदुकरण इच्छितो की हिंदूंचंच इस्लामीकरण करतोय याचा वेध घेणं हे थोडंसं आत्मबोधाचंच ठरेल.

कारण आपण काय करतोय आणि त्याचे परिणाम काय होतील याचा सखोल विचार करण्याची इथल्या राजकीय पक्षांची *(शिवसेनेसकट)* परंपराच नाही.

इतिहासात राजकीय ऊर्जेला जशा फक्त दोन गती असतात – विकास किंवा लय;

तसेच राजकीय पक्षांना दोनच पर्याय असतात– आत्मपरीक्षण किंवा आत्मनाश. त्यातल्या कोणत्याही एकाची निवड केली की दुसऱ्या पर्यायाला आपोआप नकार जातो.

आपण कुणाचे हे ज्याचं त्याने ठरवावं.

## ४. प्रबोधनयुगातून मागे?

मुळात 'हिंदुत्व' हा एका वेगळ्या लेखाचा विषय आहे. पण शिवसेनेने 'हिंदुत्व' हा विषय स्वत:च्या राजकीय अस्तित्वासाठी प्रमाण मानला आणि बाळासाहेब ठाकरेंना त्यांचे अनुयायी 'हिंदुहृदयसम्राट' म्हणतात. त्यामुळे या 'हिंदुत्वा'वर लिहिणं क्रमप्राप्त आहे. सध्या आणि कायमच शिवसेनेला जे हिंदुत्व अभिप्रेत आहे ते राजकीय आहे. म्हणजे त्यात धर्माने हिंदू असणाऱ्या माणसाची आत्मिक उन्नती किंवा धर्मातील अमानवी सामाजिक रुढींविरुद्ध लढा किंवा बंड अपेक्षित नाही, तर तुम्ही हिंदू असाल तर या झेंड्याखाली एकत्र का या? तर मुसलमानांचं तुम्हाला भय आहे म्हणून किंवा तुम्ही हिंदुत्ववाद्यांना मत दिलं पाहिजे, कारण नाहीतर मुसलमान तुमचा खात्मा करतील. तुम्हाला या झेंड्याचा, हिंदुत्वाचा आणि आमचा गर्व वाटला पाहिजे. कारण नाहीतर मुसलमानांचं हिरवं संकट तुम्हाला नष्ट करेल. हाच सेना - भा.ज.पा.च्या हिंदुत्वाचा अर्थ आहे. त्यात बाळासाहेब मधून मधून राष्ट्रप्रेमी मुसलमान आणि गद्दार राष्ट्रद्रोही मुसलमान असा भेद करून राष्ट्रवादी मुसलमानाबद्दल त्यांच्या हिंदुत्वाच्या कल्पनेत प्रेमच असल्याचं जाहीर करतात. आता कोण राष्ट्रप्रेमी, कोण राष्ट्रद्रोही मुसलमान? ते शोधायचं कसं? याबद्दल कोणतीही व्याख्या नाही. पण सर्वसाधारणपणे पाकिस्तान भारताच्या *(हिंदुस्तानच्या)* मॅचच्या वेळी भारताच्या बाजूने फटाके फोडतो तो राष्ट्रभक्त आणि पाकिस्तानच्या बाजूने फटाके फोडतो तो राष्ट्रद्रोही. हे एक उदाहरण म्हणून उपरोधिक, गमतीशीर आणि खूपच उथळ वाटलं तरीही या उदाहरणापासून सुरुवात करून आपण या प्रश्नाचा तळ गाठू शकतो. पहिली गोष्ट म्हणजे हे हिंदुत्व– हिंदुहृदयसम्राट वगैरे उपाधी वगैरे सगळं काही आहे ते मुस्लिमकेंद्री आहे आणि ते राजकीय आहे. त्याव्यतिरिक्त त्याला काहीही अर्थ नाही. म्हणजे शिवसेनेलाच तसा काही अर्थ अभिप्रेत नाही. ठीक आहे. प्रश्न भारतामध्ये असलेल्या मुसलमानांचा आहे आणि पुरोगामी म्हणवणाऱ्यांनी कितीही नाकारला तरी तो प्रश्न आहेत. फक्त त्या प्रश्नाची नीट समज जशी स्वत:ला पुरोगामी म्हणवणाऱ्या कम्युनिस्ट वा समाजवाद्यांना नाही, तशीच ती शिवसेनेलाही नाही. *(भा. ज. पा. लाही. पण त्याबाबत स्वतंत्र लिहावं लागेल.)* मुस्लिमांच्या प्रश्नावरचं ''तशी काही समस्याच

नाही. त्यांच्या धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप करता कामा नये. त्यांच्याशी प्रेमाने वागल्यावर हळुहळू त्यांच्यात धार्मिक सुधारणा होत जातील,'' हे पुरोगामी उत्तर जसं खरं नाही, तसंच हिंदू समाजाचं पुन्हा रेजिमेंटेशन करत त्याला परत आदिमयुगाकडे नेणं हेही त्याचं उत्तर नाही.

बाळासाहेबांनी 'हिंदुत्वा'ची जी घोषणा केली आहे ती राजकीय आहे. वास्तविक या देशात आधुनिक काळात खरी हिंदुत्ववादी व्यक्ती एकच होऊन गेलेली आहे. ती म्हणजे महात्मा गांधी. स्वत: महात्मा गांधींनी कधीही हिंदुत्ववाद वगैरे असले शब्द वापरले नाहीत. पण ते हिंदुत्ववादीच होते आणि हे दोनच माणसांना नीट कळलेलं होतं. ते म्हणजे बॅ. महंमद अली जीना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर. योगायोगाने ही तीनही माणसं वकील होती.

या देशातील मुस्लिम समुदायाचा जो प्रश्न स्वातंत्र्यपूर्व काळात होता तोच प्रश्न स्वातंत्र्योत्तर काळातही आहे. मुसलमान हे स्वत:ला देशातल्या मुख्य राजकीय प्रवाहापासून वेगळे ठेवू पाहतात. काँग्रेस स्थापनेनंतरही अधिवेशनात येण्याकरता जेवू-खाऊ घालून, वरती जाण्यायेण्याचे पैसे देऊनही मुस्लिम अधिवेशनात येत नसत. एवढंच नव्हे तर हीच बातमी लंडन टाइम्सने दिली तर तिचा इन्कार करताना तेलंग, सुरेंद्रनाथ बॅनर्जी प्रभृतींच्या नाकी नऊ आले होते. हिंदूंसाठी मुस्लिम शासक जाऊन इंग्रज आले होते. पुण्यात पेशव्यांचं राज्य जाऊन इंग्रजांचं राज्य आलं याचा अर्थ मराठी हिंदूंसाठी पराभवाचा तडाखा बसण्याएवढं काहीतरी चुकलं होतं. मुसलमान आपल्या राजकारणाला आणि धर्माला वेगळं ठेवू शकतच नाहीत. आणि त्यांचा धर्मग्रंथ चुकूच शकत नाही. कारण धर्मग्रंथ त्याची परवानगी देत नाही. मुसलमानांचा धर्मग्रंथ कुराण हा दोन प्रकारे सांगितला जातो. एक मुसलमानांसाठी आणि दुसरा मुसलमानेतरांसाठी. त्यानुसार आपल्याला जेव्हा एखादा मुसलमान कुराणाबद्दल सांगतो तेव्हा तो, परमेश्वर न्यायी आहे असंच आपल्याला सांगतो. पण प्रत्यक्षात त्यात ज्या खाचाखोचा आहेत त्यासहित कुराण मुसलमान माणसाला शिकवलं जातं. त्या खाचाखोचाच आजच्या आपल्या दुरवस्थेला कारणीभूत आहेत. उदाहरणार्थ, कुराणात परमेश्वर न्यायी असतो असं म्हटलेलंच नाहीए. तर परमेश्वर करतो तोच न्याय असतो. त्याला 'कादिरे मुतलक' म्हणतात. न्याय म्हणजे धर्म आणि धर्म एकच – इस्लाम. इस्लामच्या चौदाव्या शतकातल्या कुराणातल्या आज्ञा याच मुसलमानासाठी धर्माज्ञा. या सर्वामध्ये शब्दाचाही बदल करणं, शब्द तेच ठेवून त्याचा अर्थ बदलणं व धर्म बदलणं याला अनुक्रमे 'इर्तकाम' 'बहद' आणि 'जिन्दीक' असं म्हणतात. या कृत्यांना जमिनीत

पुरुन दगडांनी ठेचून ठार करण्याची आज्ञा आहे. हा झाला इस्लाममधल्या *(म्हणजे स्वधर्मातील)* अश्रद्धांविरुद्धचा जिहाद. दुसरा भाग 'जिहाद-बा-सैफ' म्हणजे तलवारीच्या जोरावर बिगर इस्लामी प्रदेश इस्लाममय करणं. म्हणजे आजही कुणाही मुसलमानाने श्रद्धाशील व्हायचं ठरवलं की 'जिहाद-बा-सैफ'ला तो तयार होतोच. कारण 'तबलीग' आणि 'तरदीद' *(म्हणजे अनुक्रमे 'स्वधर्मप्रचार' आणि 'परधर्मखंडन')* हे इस्लामच्या प्रत्येक उपासकाला बंधनकारक आहे आणि इस्लाम हा 'दीने कामील' आहे. म्हणजे जगाच्या अंतापर्यंत त्यात कोणताही बदल होणार नाही. तसा बदल म्हणजे मृत्युदंडास पात्र. काफीर म्हणजेही खरं तर मृत्युदंडाला पात्र. *(म्हणजे हिंदू)* हे सारं इस्लामचं अपरिवर्तनीय आणि स्वत:ला मुसलमान म्हणवणाऱ्यास बंधनकारक असणारं धर्मशास्त्र आहे. त्यात एक भयानक तोडही आहे. जेव्हा एखाद्या देशात बिगरमुसलमानांची सत्ता असते तेव्हा हेच इस्लामचं धर्मशास्त्र मुसलमानांना मनात वर उल्लेखिलेल्या श्रद्धा तशाच ठेवून बाहेर तपशिलातल्या सर्व तडजोडी करून टिकून राहण्याची आज्ञा देतं. त्याला 'सबर' म्हणतात. त्यानुसार मुसलमानास बिगरमुस्लिम राष्ट्रात प्राणरक्षणार्थ आणि हितासाठी खोटे करार करता येतात, खोटी आश्वासनं देता येतात, धर्मविरोधी तडजोडी करता येतात, धर्मविरोधी भाषणं, व्याख्यानं देता येतात. हे सारं फसवण्याकरता. इस्लामच्या धर्मशास्त्राप्रमाणे बिगरमुसलमानांशी मुसलमानांनी केलेले करार आणि शपथप्रमाण मुसलमानांवर बंधनकारक नाही. मुस्लिम माणूस रोज रोज जे शिकतो त्या धर्मशास्त्रातील हा छोटासा अंश आहे. मुस्लिम मनाचा जो गुंता आहे तो इथे आहे.

आता आपल्या मूळ विषयाशी त्याचा सांधा जोडताना हे लक्षात घेतलं पाहिजे की, जवळजवळ ९०० वर्षं अशा कडव्या श्रद्धांच्या अनुयायांनी तलवारींच्या जोरावर भारतभर अक्षरश: धुडगूस घालूनही *(अगदी त्यातून मोगल सत्तेची काही शेकडा वर्षं वजा केली तरी त्यातलीही औरंगजेबाची धरून काही शेकडा उरतातच)* भारत हा इस्लाममय करणं इस्लामच्या कडव्या, मिलिटंट उपासकांना जमलं नाही. इथे हिंदूंचं रक्षण करण्याकरता कुणीही हेडगेवार, गुरुजी किंवा बाळासाहेब ठाकरे नव्हते. तरीही हा प्रदेश इस्लाममय झाला नाही. छ० शिवाजी महाराजांचा जन्मच मुळात सतराव्या शतकातला. म्हणजे अकबर वगैरे जाऊन काही वर्षं झाल्यावर. शहाजहान आणि औरंगजेबाच्या उच्छादकाळातला. याचा अर्थ स्पष्ट आहे की, शेकडो वर्षं हिंदू स्वत:ला एका अशा कडव्या, चिवट, राज्यकर्त्या, मिलिटंट धर्मापासून वाचवण्यात पूर्णत: यशस्वी झाले होते. इस्लामला जगभर जे दैदीप्यमान विजय मिळाले त्यापुढे हा जबर

धक्काच होता. हिंदूंच्या या टिकावाचं खरं कारण होतं ते म्हणजे, त्यांच्या धर्माचं संघटन नव्हतं. जे नष्ट केल्यावर हिंदू धर्म नष्ट करता येईल किंवा हिंदू धर्म हा इतका स्थितिशील आणि त्याचवेळी इतका लवचिक आहे की तो तलवारीच्या जोरावर मोडताच आला नाही. वेळ आल्यावर तो वृक्षाच्या ऐवजी लव्हाळं होऊन राहिला आणि महापुरातही वाचला.

हे नेमकं गांधीजींना कळलं होतं. गांधीजी 'ईश्वर अल्ला तेरो नाम' म्हणत तेव्हा ते मुत्सद्दीपणे मुस्लिमांना लवचिक बनवत होते. मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करत होते. मुस्लिम प्रश्नाबाबत हाच एकमेव मार्ग होता. अर्थात हे एक प्रतिकात्मक उदाहरण आहे. पण त्याचा खरा अर्थ हा की, इंग्रजांकडून झालेल्या पराभवामुळे प्रबोधनयुगात आलेल्या हिंदूंना तसंच पुढे प्रबोधनयुगात वाटचाल करू देणं आणि त्याच वेळी मुसलमानांना चिवटपणे, मुत्सद्दीपणे प्रबोधन युगात आणणं हाच त्यावरचा उपाय होता. गांधीजींच्या हिंदू अनुयायांमध्ये जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, आचार्य कृपलानी, विनोबा भावे, सुभाषचंद्र बोस, सरोजिनी नायडू... असे हिंदू या शब्दाच्या कक्षा अत्यंत विस्तारणारे अनुयायी होते. आणि मौलाना अबुल कलाम आझादांसारखे मुस्लिम प्रकांडपंडित, जे मुस्लिम जनसमुदाय जर प्रबोधनयुगात जाईल तर त्याचं काय रूप असेल याचे सार्थ प्रतिनिधी होते.

पुढे खूप इतिहास आहे आणि त्याचं विश्लेषणही करता येईल. पण ते टाळून हे म्हणता येईल की आज शिवसेना जेव्हा राजकीय हिंदुत्व असं म्हणते तेव्हा मुसलमानांबाबत काय करायचं याचं धोरण तिच्याकडे असत नाही. असणं शक्यच नाही. तर मग त्यातून एकच कार्यक्रम उरतो, तो म्हणजे हिंदूंना परत मागे आणणं. म्हणजे चौदाव्या शतकात लिहिलेल्या इस्लामच्या धर्मग्रंथातल्यासारखे बनवणं. कडव्या हिंदुत्वाला काही विकासाचा अर्थच असत नाही. कारण कडव्या हिंदुत्ववादी संघटना मुळात इस्लामकेंद्री होतात असा इतिहास आहे. एकचालकानुवर्तित्व हे त्याचं वैशिष्ट्य बनतं. मग हिंदू समाजाला कडवं करण्याचे आणि चौदाव्या शतकात नेण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू होतात. 'हातात शस्त्रं घ्या,' येथपासून ते कशाकशावर सांस्कृतिक बंदी घाला त्यापर्यंतच्या याद्या तयार होता. आज जर बाळासाहेब ठाकरेंच्या कडवट हिंदुत्वाच्या भूमिकेला पूर्ण पाठिंबा देण्याचं ठरवलं आणि त्यांना प्रश्न केला की, चौदा कोटी मुसलमानांचं आपण काय करायचं? राष्ट्रभक्त आणि राष्ट्रद्रोही वगैरेंचा घोळ न घालता उत्तर द्या. कारण वर उल्लेखिलेल्या सगळ्या गोष्टी त्यांच्या धर्मग्रंथात आहे आणि त्याच अपरिवर्तनीय धर्मग्रंथांवर आणि त्यातल्या तत्त्वांवर त्यांची श्रद्धा आहे. तर

मग त्यांचं काय करायचं? माझ्यावर विश्वास ठेवा, या प्रश्नाचं कोणतही व्यावहारिक उत्तर त्यांच्याकडे असणार नाही. *(संघाबाबतही हेच आहे.)* त्यांच्याकडे जे काही कार्यक्रम आहेत ते हिंदूंना आधुनिक जगातून परत उलट्या दिशेने नेणारे आहेत. खरं तर या समस्येवरचा जो एकमेव उपाय आहे तो म्हणजे ज्ञानयुगात या देशातला बहुसंख्य समाज अधिकाधिक पुढे जाणं हाच आहे. साधा पेट्रोलला पर्यायाचा शोध आपण *(म्हणजे भारत)* लावू शकलो तर आपलं मध्य-पूर्वेवरचं अवलंबित्वच संपेल. हे एक काल्पनिक उदाहरण आहे, पण या समस्येतून आधुनिक ज्ञानयुगच आपल्याला वाचवू शकतं, हे कळण्यासाठी हे उपयुक्त आहे. त्यासाठी हिंदू समाज खरं तर अधिकाधिक मुक्त, स्वतंत्र आणि खुळचट धार्मिक कल्पनांपासून दूर जाणं गरजेचं आहे. याउलट झालं तर ते मूलतत्त्ववादी इस्लामपूरकच ठरेल. 'स्वातंत्र्याचं भय' हे इस्लामचं वैशिष्ट्य आहे. तेच नेमकं हिंदूंमध्ये शिरलं तर हिंदूंचाच विनाश अटळ आहे, इस्लाममध्ये स्वत:चं राष्ट्र म्हणून कुठल्याच बिगर इस्लामी राष्ट्रावर निष्ठा ठेवण्यास परवानगीच नाही, ही मुसलमानांची खरी समस्या आहे. खलिस्तानी अतिरेक्यांच्या समस्येहून मुस्लिम अतिरेक्याची समस्या नेमकी इथेच वेगळी ठरते. के. पी. एस. गिल जे पंजाबमध्ये करू शकले तेच ते काश्मीरमध्ये करू शकणार नाहीत, त्याचं कारणही हेच आहे. हा श्रद्धांचा आणि संस्कृतीचा संघर्ष आहेच पण द्वैताचं आणि गुलामगिरीचं घट्ट झालेलं तत्त्वज्ञानही त्यात आहे. ते कठोर उपायांनी बदलता येत नाही. हजार वर्षांच्या गुलामगिरीने जी लाचारी आपल्या समाजात निर्माण झाली ती तरी स्वातंत्र्यानंतर कुठे बदललीय? अपरिमित विकास, जोडीला कायद्यांमध्ये बदल आणि प्रबोधन हाच या समस्येवरचा खरा उपाय आहे. बाकी पोलिसांना आणि लष्कराला त्यांचं काम करू द्यावं. राष्ट्रातल्या बहुसंख्याकांनी भौतिक जगात अधिकाधिक स्वातंत्र्यप्रियता दाखवणं आणि प्रगती करणं हाच त्यावर वास्तविक इलाज आहे. प्रगत पाश्चात्त्य राष्ट्रांत मुस्लिमांची समस्या अंशत: वा पूर्णत: निकालात निघाली ती त्याच एकमेव मार्गाने.

हिंदूंनीही आता कडवं व्हावं, हातात शस्त्रं घ्यावीत, असं म्हणणं म्हणजे वेड्याचा वेडेपणा जात नाही म्हणून समाजातल्या बहुसंख्य शहाण्यांनी वेडेपणा पत्करण्यासारखं आहे. तोगडियांसारख्या आततायी माणसांच्या हातात हिंदू समाजाची सूत्रं गेली तर हिंदूंचे मदरसे निघून हिंदू स्त्रियाही काही काळात बुरखे घालताना दिसतील. हा तर हजार वर्षांत तलवारीच्या आक्रमणाला शक्य न झालेला विजय इस्लामला मिळेल. हे वेगळ्या प्रकारे हिंदूंचंच इस्लामीकरण असेल. बाळासाहेबांना हे कडवं हिंदुत्व अभिप्रेत आहे

काय? आपण कोणत्या युगात राहतो आहोत हे सदतीस वर्षांनी तरी एकदा शिवसेनेने स्वच्छपणे पाहायला हवं. अन्यथा एक भीषण शोकांतिका जन्म घेईल. चौदा कोटी मुस्लिमांना आपण या देशातून हाकलून देऊ शकतो काय? त्यांच्यासाठी आपण विषारी गॅस चेंबर देणार आहोत काय? इथे रक्ताचे पाट वाहवणार आहोत काय? की 'आपले' शस्त्रधारी, कडवे, मिलिटंट अतिरेकी तरुण 'त्यांच्या' भेंडीबाजार, बेहरामपाडा, भिवंडी, मुंब्रा वगैरे ठाण्यावर घोड्यांवर बसून हल्ला करत फिरणार आहेत? इस्लामी दहशतवादाचा धोका आज जगभर आहेत. जगात अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट होताहेत. पण बॉम्बस्फोटाला उत्तर म्हणून 'बंद' फक्त आपल्याकडेच होतात. कुणीतरी आपल्या कानफटात मारल्यावर स्वत:लाच बुक्के मारण्याचा हा प्रकार आहे. अतिरेकी साहसवादामुळे असा हल्ला झाल्यावर, 'आपण आता असेच हात बांधून मरायचं' असं उपरोधाने म्हणणं म्हणजे समस्या नीट समजून न घेण्याचा प्रकार आहे. समस्या सोडवण्याचा एक आणि एकच मार्ग असतो. आणि तो दोन भागांत विभागलेला असतो. समस्या नीट, खोलात जाऊन समजून घेण्याचा पहिला भाग, आणि त्यावर परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या शक्याशक्यतांचा अचूक अंदाज घेऊन उपाय करण्याचा दुसरा भाग.

इस्लामी दहशतवादी मूठभर आहेत. आणि गतानुगतिक अशा मुस्लिम समाजाला त्यांच्या धर्मग्रंथानेच 'स्वातंत्र्याचं भय' घातल्याने तो या अतिरेकाच्या विरुद्ध उठाव करू शकतच नाही. अशा वेळी आपणच एक वेगळं 'स्वातंत्र्याचं भय' निर्माण करणं म्हणजे झोपेमध्ये आगीत उडी घेण्यासारखं आहे. त्यामुळेच शिवसेनेच्या *(आणि भा. ज. पा. च्याही)* हिंदुत्वाचा एक सापळा जसा स्वत: शिवसेनेसाठी आहे, तसाच एक सापळा हिंदू समाजासाठीसुद्धा आहे. त्याचं नीट आकलन करणं हे दोघांच्याही हिताचं आहे.

'अतिरेकी आणि असंस्कृत साहसवाद्यांनी आपल्या सुसंस्कृत संस्कृतीवर हल्ला केलेला आहे' हे म्हणण्याकरता आपली संस्कृती सुसंस्कृत आणि स्वातंत्र्यप्रिय बनवणं आवश्यक असतं. तरच या म्हणण्याला नैतिक बळ मिळतं. अन्यथा आपणच या मानसिक आणि नैतिकही लढाईत दुबळं बनतो. मुस्लिम समाजाच्या या पेचातूनच काश्मीरसारखे प्रश्न निर्माण झालेले आहेत. हे प्रश्न सोडवणे किचकट आणि गुंतागुंतीचं आहे. अशा वेळी त्याचं सोपेकरण करून बाळासाहेब नेहमीच सांगतात, 'माझ्या हातात द्या. मी माझ्या पद्धतीने प्रश्न सोडवतो.' किंवा ''रणगाडे घुसवून काश्मीरची सफाई करून टाका. चर्चा कसल्या करता?'' प्रश्नाचे अशा प्रकारे नीट आकलन न

करून घेता त्याचं सोपेकरण करून त्यातून रंजन होऊ शकतं. आणि मध्यवर्गीय मानसिकतेतून मोठा पाठिंबाही मिळू शकतो. पण आपल्याहून चांगले रणगाडे आणि शस्त्रास्त्रं असलेल्या व ती घुसवण्याची सुरसुरी असलेल्या इस्राइललासुद्धा *(अमेरिकेचा भक्कम पाठिंबा असूनही)* पॅलेस्टाइनचं किंचितही दमन करता येत नाहीए. श्रद्धांचा पराभव करणं एवढं सोपं नसतं. शिवाय त्या मूलतत्त्ववादी श्रद्धांशी विकासाचे प्रश्न जोडले गेले की, अत्यंत कुशल माणसंही प्रश्न सोडवू शकत नाहीत. आज जे महाराष्ट्रात चाललेलं आहे; उदा. राजकीय हितसंबंधितांची घरं भरणं, भ्रष्टाचार, जनतेची यत्किंचित फिकीर नसणं, आलटून-पालटून विधानसभा जिंकणं आणि पुन्हा पुन्हा तेच करणं, राज्यात वीज नसणं, उदरनिर्वाहाची साधनं नसणं, मुंडे-राणेंनी भुजबळांवर आरोप करणं, मग भुजबळांनी राणे-मुंडेंवर तसेच आरोप करणं... हे नेमकं असंच नावं, व्यक्ती, तपशील बदलून रसभरीतपणे काश्मीरात चालू होतं. हिंदी चित्रपटात काश्मीर नंदनवन वाटत होतं तेवढंच. बाकी ठप्प. जनतेत प्रचंड अस्वस्थता होती. सामान्य माणूस मरत होता. वीज, दळणवळण, आरोग्याच्या सुविधाच नव्हत्या. शेकडो कोटी रुपये विकासासाठी येत होते. आणि ते ठराविक राजकीय सरंजामदारांच्या घरात आणि फार्महाऊसात जात होते. बढत्या-बदल्यात प्रचंड भ्रष्टाचार होता. गेले काही वर्षं महाराष्ट्राची जी वाटचाल चाललेली आहे हुबेहुब तसंच काश्मीरात होत होतं. फक्त फरक एवढाच की, काश्मीरात मुस्लिम बहुसंख्य होते. आणि शेजारी पाकिस्तान होता. भौतिक आयुष्य सुखाचं तर सोडाच पण विपदांनी भरलेलं असलं की, माणसाला धर्मग्रंथ आठवतात. काश्मीरींच्या आयुष्यात जो धर्मग्रंथ होता तो इस्लामचा होता. जोडीला पाकिस्तान. परिणाम स्पष्ट होते. यावर रणगाडे घुसवणं हा उपाय असू शकतो का ? कुणावर रणगाडे घुसवायचे ? आणि मग महाराष्ट्रात काय घुसवायचे ? काश्मीरचं जाऊ दे. महाराष्ट्र तुमच्या हातात आहे. बदला त्याची ललाटरेखा विनाशाकडे चाललेली. खास तुमच्या पद्धतीने. महाराष्ट्राचंही जाऊ दे. मुंबईचं काय ? मुंबईच्या रस्त्यांचा, झोपड्यांचा प्रश्न तरी सोडवा. इथल्या माणसांनी केवळ सहकार्यच नव्हे तर निष्ठा, श्रद्धा, पाठिंबा, रक्त, अश्रू, घाम सगळं तुम्हाला दिलंय. तुमची अडचण काय आहे ? पण कृपया लक्षात घ्या. इथल्या माणसाच्या हातात पुन्हा हिंदूंचे धर्मग्रंथ कोंबणे हे इतिहासाचं चाक उलटं फिरवणारं आहे. इस्लामच्या अनुयायांमध्ये संघटना आहे कारण त्यांच्यात 'स्वातंत्र्याचं भय' आहे. हिंदूमध्येही तेच 'स्वातंत्र्याचं भय' निर्माण करणं म्हणजे महाराष्ट्राच्या ललाटावर अधोगतीचा इतिहासच लिहिणं आहे. संपूर्ण

भारतात तोगडिया-सिंघल वगैरे हे कार्यच कोणताही कार्यकारणभाव न ठेवता आणि विवेक न बाळगता करत आहेत. मध्ययुगीन अंध:काराची ही लाट महाराष्ट्रात आपण थोपवायची की या लाटेच्या पालखीचे आपण भोई व्हायचं हे शिवसेनेने ठरवायचं आहे. शिवसेनेच्या या निर्णयावरच इतिहासात त्यांच्याबद्दल काय लिहिलं जाणार हे ठरणार आहे.

उत्तर भारताप्रमाणे इस्लामीकरण झालेल्या महाराष्ट्रातील स्त्रिया पुन्हा तोंडावरून पदर घेऊन चुलीपाशी (आणि मुलीपाशी) बसलेल्या दिसतील. हे तथाकथित मिलिटंट हिंदुत्वाचं खरं चित्र असणार आहे. हे करण्याला हातभार लावायचा तर कर्वे, फुले, आंबेडकर, सावरकर, प्रबोधनकार ठाकरेंचं महाराष्ट्राच्या प्रबोधनासाठी, अधिक कर्मकांडमुक्त आणि स्त्री-पुरुष समानता मानणाऱ्या समाजासाठीचं बेंबीच्या देठापासून ओरडणं वायाच गेलं म्हणायचं.

या पापाचे धनी आपण व्हायचं की नाही हे ठरवण्याच्या टप्प्यावर आज शिवसेना उभी आहे.

## प्रकरण ५ : 'पक्षपाती फुटपट्टी'

आज भारतातल्या कोणत्याच राजकीय संघटनेला समोर रसरसलेपणा दिसत नाहीए. मग संघटना राष्ट्रीय असो वा प्रादेशिक. कारण जनता निराश आहे. प्रश्न सुटत नाहीएत. कोणतंही नेतृत्व आपल्या जीवनात सुख आणू शकतं यावरचा लोकांचा विश्वासच उडालाय. अशा वेळी महाराष्ट्रात शिवसेनेसारखी राजकीय ऊर्जा असलेली संघटना काय करू शकते, यावर केवळ शिवसेनाच नव्हे तर महाराष्ट्र आणि देशाचं भवितव्यही अंशत: अवलंबून आहे.

प्रश्न फक्त भविष्याच्या गर्भात जे दडलेलं आहे ते शुभंकर आहे, की भयंकर हे जाणून घेण्याचा आहे. आणि जे जाणून घेण्याची विश्लेषणाव्यतिरिक्त कोणतीही फुटपट्टी नाही. आणि विश्लेषणातूनही एकच एक निष्कर्ष निघत नाही.

तरीही एक फूटपट्टी अटळ आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतातली प्रत्येक संघटना आणि प्रत्येक नेता हा एका फुटपट्टीवर मोजला/मोजली जाणार होता/होती. ती फूटपट्टी होती मोहनदास करमचंद गांधी.

या संपूर्ण लेखनात अजिबात पक्षपात न करण्याची दक्षता मी घेतलेली आहे. अपवाद एकच - शेवटी ही एक फूटपट्टी लावण्याचा.

हा पक्षपात अशासाठी म्हटला की, कुणाच्या संदर्भात कुणाला मोजू नये म्हणतात.

तरीही हा पक्षपात अटळ आहे. अशासाठी की, अशा पक्षपातानेच विपदांनी आणि भ्रष्टाचाराने भरलेल्या या समाजात जगणं सुसह्य होतं.

महात्मा गांधींनी १९२० साली खऱ्या अर्थाने नेतृत्व हातात घेतलं.

१९४८ साली नथुराम गोडसेने त्यांचा खून केला.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळालं.

गांधीजींना परतंत्र भारतात फक्त २७ वर्ष मिळाली.

या सत्तावीस वर्षांत त्यांनी असहकार, उपोषण, आत्मक्लेश, स्वावलंबन, अहिंसा ही शस्त्रं निर्बल माणसांना दिली.

याच्या बळावर या निर्बल माणसांचं कडव्या, मिलिटंट माणसांत रूपांतर झालं.

त्यांनी रक्तबंबाळ होईस्तोवर लाठ्या खाल्या, पण स्वातंत्र्याचा हट्ट ब्रिटिश व्यवस्था उलथवून टाकेस्तोवर सोडला नाही.

या सत्तावीस वर्षांत त्यांनी जे अनुयायी निर्माण केले त्यांनी पुढे काही काळ भारत आणि भारतीयाचं मन घडवलं.

जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल, चक्रवर्ती राजगोपालचारी, मौलाना अबुल कलाम आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस, सरोजिनी नायडू, जयप्रकाश नारायण....

या सत्तावीस वर्षांत 'सत्य' या मूल्याला त्यांनी भारतीय (आणि एकंदरीतच जागतिक) राजकारणात असाधारण महत्त्व आणलं. ते अगोदर आणि नंतर इथल्या राजकारणात कधीच मूल्य म्हणून प्रस्थापित झालंच नाही. उलट घसरतच गेलं.

त्या सत्तावीस वर्षांत त्यांनी भारतीय सामान्य माणसाला इतकं निर्भय केलं की, तो बलाढ्य इंग्रज सत्तेला घाबरेनासा झाला.

त्या सत्तावीस वर्षांत त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिलं. तेही स्वातंत्यलढ्याच्या या अगोदरच्या सर्व मार्गांविरुद्ध बंड करून.

आणि पाकिस्तान निर्मितीतून जो रोष निर्माण झाला त्याच्या बदल्यात त्यांनी 'हे राम' म्हणत प्राणांची आहुती दिली.

ही सत्तावीस वर्षं कॉंग्रेसचे सभासद नसतानाही त्यांची कॉंग्रेसवर पोलादी पकड होती.

ते प्रखर हिंदुत्ववादी होते; पराकोटीचे आक्रमक बंडखोर होते, हुकूमशहा होते;

कडव्या, मिलिटंट अनुयायांचे नेते होते.

हे सारं शिवसेनेसंदर्भात लिहिण्याचं कारण म्हणजे,

बाळासाहेबांनाही प्रखर हिंदुत्ववादी, बंडखोर, हुकूमशहा आणि कडव्या: मिलिटंट अनुयायांचे नेते मानलं जातं.

फक्त वरची पक्षपाती फूटपट्टी वापरली नाही तर लिहिण्यासारखं खूप आहे.

पण ती फूटपट्टी वापरली तर जगण्यासारखं खूप उरतं, त्याचं काय?

■

अक्षर *(दिवाळी)* २००३

# आयडियाज् आर् डेंजरस

माझ्यासमोर 'टेन डेज दॅट शुक द वर्ल्ड' या पुस्तकाची एक जुनी प्रत पडली आहे. ती किमान पन्नास वर्षे जुनी असावी. हे मी इतक्या ठामपणे लिहितोय, याचं आवृत्तीची तारीख वगळता दुसरं एक कारण आहे. त्या पुस्तकाच्या पहिल्याच पानावर कुणा शेखरने कुणा अज्ञात नंदिताला तिच्या चोविसाव्या वाढदिवशी लाल पेनाने भावनावेगात संदेश लिहून ते पुस्तक भेट दिलंय. जेव्हा हे पुस्तक भेट देण्यात आलं, तेव्हाचं जुनं जग आज पार बदलून गेलंय. शेखर आज किती वर्षांचा असेल हे सांगता येत नसलं, तरी तो किमान नंदिताएवढा आहे असं आपण गृहीत धरलं, तर ते दोघेही *(हयात असले तर)* आज चौऱ्याहत्तर वर्षांचे असतील.

'टेन डेज दॅट शुक द वर्ल्ड' हा प्रत्यक्ष रशियन राज्यक्रांती घडताना पाहून जॉन रीड या अमेरिकन पत्रकाराने लिहिलेला रिपोर्ताज आहे. या पुस्तकात प्रत्यक्षात क्रांती घडते तेव्हा मुक्तीची कल्पना *(Idea)* आणि तिच्यातून निर्माण होणारा झंझावात किती जबरदस्त असतो, याचं अतिशय परिणामकारक दर्शन घडतं. जॉन रीडनं लिहिलेल्या या क्रांतीमागची कल्पना

*(Idea)* हळूहळू संकुचित होत गेली. तरीही या क्रांतीने पुढे अनके दशकं जगभरातल्या तरुणांच्या मनावर अधिराज्य गाजवलं.

''तू जर हे पुस्तक वाचशील तर तुला एका नव्या जगाचं स्वप्न पडेल, जे जग आपलं असेल. लव यू.'' असं एकोणीसशे चोपन्नमध्ये शेखरनं झोकदार इंग्रजीत नंदिताला वाढदिवशी लिहिलंय. क्रांती 'रोमँटिक' असल्याचं म्हटलं जातं. पण तिचं इतकं रोमँटिक वर्णन क्वचितच इतर कुठे असेल!

जगभर सर्वच युगांत क्रांतीमध्ये परावर्तित होणाऱ्या 'आयडियाज' तरुण-तरुणींना कमालीच्या रोमँटिक वाटतात. नव्हे, त्या तशा असतातच. काही क्रांतिकारक कल्पनांमधला युटोपिया नंतर उघड होतो. काहींचा अगोदर. आपल्या आयुष्याच्या कालावधीतच जुन्या जगाचा अंत व्हावा, असे तरुण पिढीला वाटते. शास्त्रीय संकल्पनांच्या नावे कितीही लेखन आणि भाषणे झाली तरी मूलत: जुन्या जगाचा अंत हा नेहमी रोमँटिक अशा कल्पनांनीच भारलेला असतो. तो घडवून आणण्याची 'आयडिया' त्याच्या निर्मात्यापेक्षाही त्याच्या मागून येणाऱ्या तरुण पिढ्यांना किती मुक्तिदात्या वाटतात त्यावरच त्या कल्पनांची क्रांतिकारकता ठरते. ज्यांच्यामागे आयुष्य झोकून देता येईल अशी स्वप्नं त्या त्या काळात या कल्पना, या आयडियाज तरुणांना दाखवतात. या कल्पनांना Ideology चं स्वरूप येतं ते नंतर. त्या अगोदर या नुसत्या कल्पना असतात. त्यांची ताकद जेवढी असेल तेवढ्या तरुण पिढ्या त्यांवर पोसल्या जातात. या कल्पनांची ताकद ही मूलत: तीन तत्त्वांमध्ये बांधली गेलेली असते. Ideas are young. Ideas are universal. Ideas are dangerous.

हीच ती तीन तत्त्वं. खिश्चॅनिटी, इस्लाम, फ्रेंच राज्यक्रांती, मार्क्सवाद या साऱ्या कल्पनांमध्ये हीच तत्त्वं दिसतात. त्यातलं कोणतंही एक कमजोर व्हायला लागलं की, इतर दोन आपोआपच दुबळी होत जातात.

तरुण वर्गाला आकर्षित करणारी 'आयडिया' झंझावातासारखी रोरावू लागते ती राजसत्ता आणि तिच्याशी संबंधित असणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थांशी तिचा संघर्ष सुरू झाल्यावर. हा संघर्ष ती क्रांतिकारक 'कल्पना' बनून स्वत:च प्रस्थापित सत्ता बनेस्तोवर चालू राहतो. कल्पनेतलं वैश्विकत्व, तारुण्य आणि धोकादायकता या तिन्ही गोष्टी तुफानासारख्या उसळत राहतात. तोवर कल्पनेचा राजसत्तेपर्यंतचा प्रवास चालू राहतो. नेमक्या याच तीन गोष्टी तरुण पिढीला हाकारे घालत राहतात. हाकारे घालण्याची ही क्षमता एखाद्या 'आयडिया'मध्ये जेव्हा या पद्धतीनं निर्माण होते, तेव्हा जगातली सारी सैन्यं मिळूनही त्या 'कल्पने'चा बंदोबस्त करू शकत नाहीत.

वास्तविक खिश्चॅनिटी आणि इस्लाम यासुद्धा 'आयडिया'च होत्या; ज्यांच्यामध्ये हीच मूलभूतता होती. इस्लाम किंवा खिश्चॅनिटीचा विचार धार्मिक अर्थानं करण्याऐवजी या अंगानं केल्यावर त्यातली सार्थकता आणि निरर्थकता तर लक्षात येतेच; शिवाय मार्क्सवाद हासुद्धा नवा धर्म आणि मार्क्स हा प्रेषित का वाटत होता हेही ध्यानात येते. सोविएत युनियनची स्थापना ज्या रशियन राज्यक्रांतीनंतर झाली आणि मागोमाग जगभरच्या अनेक देशांत कम्युनिस्ट क्रांत्या झाल्या, त्या सर्व क्रांत्या आणि व्यवस्था सोविएतच्या पतनानंतर संपल्या. हे युग आता End of Ideology चं युग आहे असं मानणं हास्यास्पद असलं, तरी जगभरचे अनेक विश्लेषक आणि विचारवंत असं मानतात.

कोणतीही Idea जेव्हा जगभर पसरत जाते आणि राजसत्ता कोसळवण्याचं सामर्थ्य तिच्या ठायी असतं, तेव्हा त्या कल्पनेपेक्षा राजसत्ता आणि प्रस्थापित व्यवस्था निश्चितच खूप सामर्थ्यशाली असतात. आज जगाची घडी ज्या तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या पायावर उभी आहे. तिथे अशा प्रकारच्या जगाला व्यापून टाकणाऱ्या कल्पनेची निर्मिती होणं अशक्य आहे. असं मानणं खूपच अशास्त्रीय आहे. कारण अशा कल्पना अस्तित्वात आल्या तेव्हाचं जग हे त्या अगोदरच्या जगापेक्षा प्रगत होतं आणि राजसत्ता बलवान.

सत्तेची *(Power)* कल्पनाही मानवी उत्क्रांतीसोबत बदलत गेलेली आढळते. सत्ता अगदी अलीकडेपर्यंत धार्मिक होती. आजही पूर्णपणे ती धर्मापासून वेगळी होऊ शकलेली नाही. इथे धर्म या शब्दाचा अर्थ त्याच्या मानसिक अर्थानं घ्यावा लागतो; धर्माचे संघटन या अर्थाने नव्हे. धर्मसंघटनाचाही संबंध इथे येतो. परंतु तो नंतर. जीझसनं देवळातली दुकानं नष्ट करणं हे राजसत्तेला आव्हान देणंच होतं. त्याच्या कळत नकळत. मुहम्मदानं मक्का-मदिनेच्या परिसरात दैवी तत्त्वाचा-दैवी कल्पनांचा प्रेषित म्हणून बोलायला सुरुवात केली, तेव्हाही तो राजसत्तेलाच आव्हान देत होता. नंतरच्या लढायांनी ते सिद्धच केलं. स्वत:ला शेवटचा प्रेषित करण्याची त्याची कृती आणि मार्क्सवाद हेच जग आणि जगातली सगळी गुंतागुंत समजून घेण्याचं तत्त्वज्ञान आहे, असं मानणं यात तत्त्वत: फारसा फरक नव्हताच. फरक पडतो तो समजून घेताना झालेल्या घोटाळ्यांमुळे.

यातल्या कुठल्याही क्रांतिकारक कल्पनेत मानवाच्या मुक्तीचं आश्वासन आणि आवाहन असतं. ''जगभरचा माणूस आपल्यासारखीच मुक्तीची आशेनं वाट पाहतोय... त्याच्या पायातल्या बद्धतेच्या श्रृंखला तोडण्यासाठी उठा!'' हे आवाहन जी कल्पना,

जी आयडिया अत्यंत परिणामकारक रीतीनं करते ती त्या काळाची कल्पना बनते. रशियन राज्यक्रांती आणि त्यामागे उभी असलेली मार्क्सवादाची कल्पना, मानवी इतिहासातील त्या अगोदरच्या मुक्तीच्या कुठच्याही कल्पनेहून वेगळी होती. तिच्या वेगळेपणाची सुरुवात मार्क्सच्या भाषेपासून होते. कार्ल मार्क्स हा खरं तर हेगेलचा शिष्य. हेगेलनं जे तत्त्व डोक्यावर उभं केलं होतं ते मार्क्सने पायावर उभं केलं, असं म्हटलं जातं. यातला महत्त्वाचा भाग हाच की तोवर तत्त्वज्ञानातल्या कल्पना या अमूर्त, गूढ अशा धाग्यांनी जोडलेल्या असत. मार्क्सने या धाग्यांना 'शास्त्रीय' कार्यकारणभावाने जोडले. त्यापूर्वीही राजसत्तेला धक्का देणाऱ्या कल्पना अर्थकारण, समाजकारण, विज्ञान, धर्म, तत्त्वज्ञान, राजकारण यावर भाष्य करतच असत. हदीस आणि कुराणाचं उत्तम उदाहरण आहेच. मात्र, मार्क्सने 'शास्त्रीय' पद्धतीनं जोडलेले बरेच धागे आज काळाच्या ओघात 'अशास्त्रीय' ठरलेले आहेत.

कम्युनिस्ट क्रांतीचं सर्वात महत्त्वाचं तत्त्व होतं ते आंतरराष्ट्रीयत्वाचं. मुळात जगभरच्या अनेकजणांना आपल्या 'देश' या संकल्पनेशी नातं तोडून 'कम्युनिझम' या संकल्पनेशी जोडून घ्यावंसं वाटलं तेच त्याच्या आंतरराष्ट्रीयवादामुळे. 'टेन डेज दॅट शुक द वर्ल्ड'चा लेखक जॉन रीड हा स्वत: त्याचा देश अमेरिका सोडून सोविएत युनियनमध्ये येऊन राहिला. १९२० मध्ये टायफसने त्याचा रशियातच मृत्यू झाला. रीड हा सुरुवातीच्या काहीजणांपैकी होता. नंतर जगभरच्या अनेकांनी त्याचा कित्ता गिरवला. कित्येकांनी तर कम्युनिझमसाठी स्वत:च्याच देशाविरुद्ध हेरगिरी केली. पुढे कम्युनिझममधला आंतरराष्ट्रीयवाद संपू लागला तेव्ह त्या कल्पनेतलं *(Idea)* तारुण्यही लयास जाऊ लागलं. तिचा धोकादायकपणाही संपला. इस्लाम किंवा ख्रिश्चॅनिटीचंही वेगळ्या प्रकारानं हेच झालेलं दिसतं. एक इस्लामी देश आज दुसऱ्या इस्लामिक देशावर राष्ट्रीय स्वामित्वाच्या भावनेने हल्ला करतो तेव्हा 'इस्लाम'च्या कल्पनेतील आंतरराष्ट्रीयत्व संपतं. ते एकदा संपलं की संपतं ते त्या कल्पनेतलं तारुण्य. मग संपते ती धोकादायकता. अमेरिकन इंटेलिजन्सपासून जे जे कुणी आज 'इस्लाम'ची धोकादायकता म्हणून सांगतात, ती इस्लामच्या कल्पनेतील धोकादायकता राहिलेली नसून काही इस्लामिक अतिरेकी गटांनी निर्माण केलेली कृत्रिम धोकादायकता आहे. अशीच धोकादायकता काही वर्षांपूर्वी जगभर काही कम्युनिस्ट अतिरेकी गटांनी निर्माण केलेली होती. या धोकादायकतेत Ideas are dangerous हे तत्त्व नसतं; कारण ती कृत्रिम धोकादायकता असते. त्यातून जुनं जग कोसळणार नसतं. तर तिच्यात केवळ काही हॉलिवूडपटांना प्रेरणा देण्याएवढीच ताकद असते. इस्लाम असो, ख्रिश्चॅनिटी

असतो वा कम्युनिझम किंवा मानवी जग हलवणारी त्याअगोदरची शेकडो तत्त्वं वा कल्पना असोत, त्यांच्यामध्ये जगभरच्या हालअपेष्टांत बुडून गेलेल्या बांधवांची मुक्ती हेच ध्येय सांगितलेलं आहे. असं असूनही पुढे या कल्पना संघटनांमध्ये परावर्तित झाल्यावर त्यांचे गट, पंथ यांचं विभाजन होत होत त्यांच्यातला संघर्ष हाच तेवढा त्या कल्पनेचा आधार बनला. आपणच खरे 'डावे कम्युनिस्ट' आहोत वा 'शिया' हेच खरे मुस्लिम आहेत, यासारखी व्यावहारिक ओळख या तुकड्यांच्या वाट्याला येते.

या साऱ्याच्या पाठीमागे माणसाच्या मनाची उत्क्रांती आणि तिचा इतिहास आहे. मुळात 'स्वातंत्र्य' या कल्पनेचा भ्रम, तिचे आकर्षण, आणि तिचे भय याच्या जुन्या जगाचा शेवट करणाऱ्या आणि नवीन जगाची निर्मिती करणाऱ्या कल्पनांचा जन्म, वाढ आणि शेवट याच्याशी थेट संबंध आहे. एका अगदी वेगळ्या उदाहरणानं हे स्पष्ट करता येतं! कम्युनिझमच्या कल्पनेवर उभी असलेली व्यवस्था लेनिनच्या मृत्यूनंतर सोविएत युनियनमध्ये स्थिरस्थावर झाली. स्टॅलिन रशियात सर्वेसर्वा असतानाच युरोपात फॅसिझमचा उदय झाला. त्यापुढच्या पायरीवर नाझीझमचाही जर्मनीत उदय झाला. या दोन्हीही तत्त्वप्रणाली विस्तारवादी होत्या. त्या अर्थाने आंतरराष्ट्रीयवादीच! वरवर पाहता सोविएत युनियनचा विस्तारवाद आणि फॅसिझम - नाझीझमचा विस्तारवाद फार वेगळा नव्हता. पण नाझीझमचा पाया हा वंशवादाचा होता. हिटलरने साठ लक्ष ज्यूंचा अक्षरश: नरमेध केला. वंशवाद आणि वंशश्रेष्ठत्वाच्या अतिमानुष कल्पना नाझीझम-फॅसिझमच्या पाया होत्या. त्यापायी अगणित निरपराध व्यक्तींना मृत्युमुखी पडावं लागलं. नेमकं त्याच वेळी सोविएत रशियात काय चाललं होतं? स्वातंत्र्य, जगातल्या दबल्या गेलेल्या बांधवांच्या मुक्तीसाठी जी क्रांती झालेली होती, तिच्या 'रक्षणासाठी' स्टॅलिनप्रणीत नरमेध चालला होता! माणसांना मारण्याच्या पद्धती वेगवेगळ्या असल्या तरीही नरमेध तितकाच भीषण संहारक होता. मरणाऱ्या माणसांची संख्याही जवळपास तेवढीच होती. पण स्टॅलिनचा नरसंहार जगभरच्या कष्टकऱ्यांच्या मुक्ततेशी संबंधित होता. फार पुढे माओ त्से तुंग याने चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या नावावर नेमका हाच आणि असाच नरसंहार घडवून आणला. पुढे जगभर हिटलरच्या, वंशवादातून केलेल्या ज्यूंच्या नरसंहाराचा सर्वत्र धिक्कार झाला. मानवी इतिहासातील ही भयानक काळी घटना मानली जाते. नाझींनी आधुनिक तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या सहाय्याने संपूर्ण माणूसपणालाच काळीमा फासला, यात शंकाच नाही. याचा परिणाम म्हणून जगभरच नाझीझम-फॅसिझमला कोणतीही नैतिक प्रतिष्ठा राहिली नाही. परंतु स्टॅलिनच्या नरमेधाचे किंवा नंतर माओ

त्से तुंगच्या नरसंहाराचे मोठे समर्थन जरी झाले नसले, तरी त्याचा मोठ्या प्रमाणावर निषेध झाला, नैतिकतेच्या पातळीवर धिक्कार झाला, असेही झाले नाही. सूक्ष्म पातळीवर का होईना, मानवी स्वातंत्र्याच्या नावावर झालेल्या त्या नरमेधाला मानवी इतिहासात एक सामाजिक प्रतिष्ठा होतीच. शिवाय लाल सेनेने नाझींचा जो पराभव केला तो असंस्कृततेचा सुसंस्कृततेने केलेला पराभव मानला जातो. असंस्कृततेचा असंस्कृततेनेच केलेला पराभव नाही! वास्तविक कम्युनिझमची कल्पना रशियात तेवढ्याच नृशंसपणे राबवली जात होती. आजही इतिहासात स्टॅलिनला जी प्रतिष्ठा आहे. हिटलरला नाही. या साऱ्याकडे माणसाच्या सामुदायिक मनाच्या उत्क्रांतीच्या दृष्टिकोनातून पाहिलं पाहिजे. मानवाच्या सामुदायिक मनाला अपार मुक्तीचं एक आकर्षण असतं. त्याच वेळी अशा अपार मुक्तीतून येणाऱ्या स्वातंत्र्याचं भयही असतं. कारण असं स्वातंत्र्य अनेक गुंतागुंतीच्या जबाबदाऱ्या घेऊन येतं. त्या जबाबदाऱ्या, सामुदायिक मन, मुक्तीचं आश्वासन देणाऱ्या कल्पनेला शरण जाऊन टाळतं. अखेर ज्या स्वातंत्र्यासाठी किंवा ज्या मुक्तीसाठी कल्पना जन्म घेते ते स्वातंत्र्यच किंवा ती मुक्तीच त्याच कल्पनेच्या आवरणाखाली बंदिस्त होते.

नोॲम चॉम्स्कींनी मध्यंतरी बीबीसीवर बोलताना एक छान विधान केलं होतं. ते म्हणाले होते, ''न्युरेंबर्ग कटाच्या खटल्याचे नियम जसेच्या तसे लावायचे झाले, तर जिमी कार्टरसहित सर्वच्या सर्व अमेरिकन अध्यक्षांना तात्काळ फासावर लटकवावं लागेल.'' *(न्युरेंबर्ग खटला दुसऱ्या महायुद्धानंतर दोस्त राष्ट्रांकडून नाझींवर चालवण्यात आलेला अभियोग)* आता चॉम्स्कींचं विधान पुरसं स्पष्ट आहे. परंतु मानवी इतिहासात या सर्व अध्यक्षांची नावे काही फारशा काळ्या अक्षरात असणार नाहीत; कारण त्याचे सर्व रक्तपात हे 'स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी' केले गेलेले आहेत!

जी कल्पना *(Idea)* वैश्विक असते, तरुण असते, धोकादायक असते तिचा तिच्या काळातल्या राजसत्तांशी संघर्ष अटळ असतो. हा संघर्ष विषम असतो. पण अशा स्वरूपातल्या नव्या कल्पनेचा पराभव करणे केवळ अशक्यच असते. जुनी सत्ता पाहता पाहता आपल्या सर्व सामर्थ्यांसह कोसळते. ज्या समस्या पुढे निर्माण होतात त्या युटोपिया आणि वास्तव यांच्यातल्या आंतरिक संघर्षातून निर्माण होणाऱ्या असतात. मानवाची मुक्ती प्रत्यक्षात येण्यासाठी एका सत्तेची निर्मिती होणं हेच मुळात विसंगत असतं. वास्तविक सत्ता ही व्यवस्था म्हणून कायम भयावर उभी असते. मानवाचं भय हेच तिचं बळ असतं. त्यामुळे सत्तेच्या व्यवस्थेतून मानवी मुक्तीची स्वप्नं बघणं हे अत्यंत अशास्त्रीय ठरतं. ख्रिश्चॅनिटीची जी संघटना उभी राहिली तिने ते सर्व

अपराध केले. ज्यांच्याविरुद्ध येशुचं बंड होतं! लेनिनचा भाऊ अलेक्झांडर याला झारच्या खुनाच्या कटात सामील असणारा अन् राज्यव्यवस्थेला धोकादायक बंडखोर म्हणून फासावर चढवण्यात आलं होतं. अशा प्रतिगामी झारच्या राजसत्तेविरुद्ध क्रांती यशस्वी झाल्यावर सुरुवातीला झारच्या राजवटीची कोणती गोष्ट नव्या राजवटीने उचलली असेल, तर ती म्हणजे क्रांतीला धोकादायक म्हणून माणसांना फाशी देण्याची!

कल्पनांसंबंधी लिहिताना भारतीय वास्तवाचा उल्लेख आणि विचार अत्यंत वेगळ्या पद्धतीने करावा लागतो. गौतम बुद्धाची मानवी मुक्तीची कल्पना ही भारतातली अलीकडची सर्वात बंडखोर कल्पना. ती कल्पना वैश्विक होती. तरुण होती. धोकादायक होती. दु:ख आहे. दु:खाचं कारण आहे. दु:खापासून मुक्तीचा मार्ग आहे. दु:खापासून मुक्ती आहे. असा एकदम उलट्या बाजूने मानवाच्या अस्तित्वाचा विचार त्यात होता. भारतात सर्वत्र धार्मिक दारं उघडण्याच्या बदल्यात शोषण चाललेलं होतं. परंतु सुख आणि दु:ख यांच्या बाबतीत वेगळं असं काहीच असत नाही. अस्तित्व केवळ दु:खाला असतं; सुख म्हणजे दु:खाचा अभाव, दुसरंतिसरं काहीच नाही; असा वेगळाच विचार बुद्धाने पुढे आणला. हा विचार प्रचंड क्रांतिकारक होता. सत्तेचं म्हणून एक तत्त्व असतं. संपूर्ण समाजमनाचा डोलारा त्यावर उभा असतो. सत्तातत्त्व हे त्या टेकूवर तरत राहतं. बुद्धाने आपल्या नवीन कल्पनेने इथल्या राजसत्तेलाच आव्हान दिलं. तेव्हाच नव्हे तर आजही भारतीय सत्तातत्त्वं तीच आहेत. उद्याच्या स्वर्गाचं आश्वासन! आजच्या दु:खांचं उद्या निराकरण! दु:खांपासून पलायन! दु:खांवर मलम! या साऱ्या तत्त्वांना समाजमनात मान्यता होती. शेकडो-हजारो वर्षं ही तत्त्वं, इथल्या समाजमनात मुरलेली होती. परंतु दु:खाचा स्वीकार करणे हीच दु:खावर मात करण्याची एकमेव गुरुकिल्ली आहे; असे सांगणे ही संपूर्ण सत्तासमीकरणासंबंधीची समाजमनाची घडवणूक बदलवून टाकणारी घटना होती. पण खरी आश्चर्याची गोष्ट पुढेच आहे. या कल्पनेचा जन्म हा विश्वातल्या मानवाला मुक्त करण्याकरिता झाला असला तरीही ही मुक्ती बरीचशी आत्मिक होती. तरीही बुद्धाने पुढे ''बुद्धं सरणं गच्छामि, धम्मं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि'' असं म्हटलंच! पुढे दोन हजार वर्षांनी जन्माला आलेल्या कम्युनिस्ट पार्टीच्या घोषणांचं आश्चर्यकारक साम्य लपवता येऊ शकेल?

भारतात दोन्ही कल्पना रुजल्या नाहीत. ना बुद्ध ना कम्युनिझम. चीनमध्ये बुद्ध रुजला. कम्युनिझमही रुजला. अर्थात इथे रुजणे याचा अर्थ त्यातल्या मानवी मुक्तीची आश्वासने प्रत्यक्षात आली असा नाही. तर कल्पनांची संघटना झाली. आणि संघटनांची

व्यवस्था प्रत्यक्षात आली असा आहे. कोणत्याही बऱ्यावाईट व्यवस्थेत असतो, तेवढा दोष याही व्यवस्थेत आहेच. आणि मूळ कल्पनेतल्या महान क्रांतिकारक शक्यता, ती व्यवस्थेत परिवर्तित होतानाच अपरिहार्यपणे बाजूला काढून टाकण्यात आलेल्या आहेतच. इथे प्रश्न एवढाच उभा राहतो की, मानवी समाजाला हलवून टाकणाऱ्या आणि बऱ्याच प्रमाणात जुनं जग कोसळवून टाकणाऱ्या कल्पना केवळ धार्मिक किंवा केवळ राजकीय अशा असू शकतात का? आतापर्यंत झालेल्या मानवी उत्क्रांतीच्या वाटचालीत अशा सर्वच कल्पना धार्मिकच राहत आलेल्या आहेत. हे नीट कळण्याकरता धर्म या संकल्पनेकडे जरा नीटपणे आणि अधिक व्यापकपणे पाहायला हवं. धर्म म्हणजे केवळ देवपूजा आणि मूर्तिपूजा नव्हे. याची नीट जाणीव, अशा क्रांतिकारक कल्पनांची उत्क्रांती होते, तेव्हा तेव्हा, उत्क्रांत मानवी मनाला होत असते. पण मानवी मुक्तता, मग ती आत्मिक असो वा राजकीय. ती धार्मिकच असते. या समजातून आपण अजूनही बाहेर येऊ शकलो नाही. त्यामुळे होतं काय की, कल्पनेचं क्रांतिकारकत्व आणि त्यातला झंझावात हा प्रतीक, संघटना, व्यक्तिपूजा, मूर्तिपूजा आणि पोथीपूजेत बंदिस्त होतो. हेच ते धार्मिकत्व! आणि ते अटळ आहे. कल्पनेचा खरा पराभव इथूनच व्हायला लागतो.

दोन हजार वर्षांपूर्वी बुद्ध मूर्तिपूजेविरुद्ध होता. माझे पुतळे उभारू नका, असे त्याने म्हटलं होतं. आज जगात सर्वात जास्त पुतळे बुद्धाचेच आहेत. इस्लामला मूर्तिपूजा मान्य नव्हती. मानवाची मुक्ती परमेश्वराच्या *(म्हणजे एका अर्थाने स्वत: मानवाच्या)* अस्तित्वातच सामावलेली आहे, असं इस्लाम मानतो. पण लोक घरात काबाचे फोटो लावतात आणि काबाची मूर्तीसारखीच पूजा होते. कम्युनिस्ट तर संपूर्ण धर्मविरोधीच. *(इथे त्यांचा संदर्भबिंदू धर्म हाच होता हे लक्षात घ्यायला पाहिजे)* पण पुतळे, मूर्तिपूजा, लेनिन, स्टॅलिन, मार्क्सचे फोटो, पुस्तकाची पोथीनिष्ठता हे सारं आलंच. या साऱ्याचा दुसरा अर्थ असा की, कल्पना ही शुद्ध असताना अत्यंत धोकादायकपणे क्रांतिकारक असते. परंतु ती जेव्हा प्रस्थापित सत्तेला टकरा द्यायला लागते, तेव्हा तिला सहजसोप्या अशा कर्मकांडांची गरज लागते, ती धोकादायक कल्पना स्वत:च प्रस्थापित होते. तेव्हा ही कर्मकांडं अधिकच गुंतागुंतीची आणि जटील बनत जातात. याचा उगम आपल्याला मुळातून शोधायचा असेल तर मानववंशशास्त्राचा आधार घ्यायला पाहिजे!

परंतु सत्तेने आपल्या स्वातंत्र्याचं हरण केलेलं आहे, याची जाणीव ठराविक काळानंतर मानववंशाला होतच असते. आणि मग नवीन धोकादायक, तरुण, वैश्विक

कल्पनेचा जन्म होतच असतो. मानववंश आपल्या सामाजिक, राजकीय, आत्मिक आयुष्याकडे किती तऱ्हांनी पाहू शकतो याचंच हे उदाहरण आहे.

सोविएत युनियनच्या पतनानंतर पूर्वेकडचे अनेक देश कोसळले. या घटनेचे जगाच्या इतिहासावर खूप खोल परिणाम झाले. जे कम्युनिस्ट देश उरले होते, त्यांनी आपल्या पोथ्या बदलून घेतल्या. पण तो जुन्या जगाचा पुन्हा एकदा अंत मानला गेला. आताच्या आणि येणाऱ्या जगातही कम्युनिझम राहीलच. जसे इतर अनेक धर्म आहेत, तसेच त्याचे स्वरूप राहील. पुढच्या काळात कम्युनिस्ट मूलतत्त्ववाद उफाळूनही येईल; जसा आता इस्लामिक मूलतत्त्ववाद उफाळलाय. परंतु इथे हे लक्षात ठेवलं पाहिजे की, तो नवीन कल्पनेचा जन्म नसेल. त्यामुळे त्याचा झंझावात होणार नाही. जगभरच्या अनेक तरुण मनांना लपेटून घेण्याचं त्याचं सामर्थ्य संपलं आहे.

तरुण व्यक्ती धार्मिक असली आणि बंडखोर नसली की तिच्यात काही मूलभूत गडबड आहे असं मानलं जातं. आज इस्लाम, खिश्चॅनिटी वा कम्युनिझम वा तत्सम एकेकाळच्या बंडखोर कल्पनांवर श्रद्धा ठेवणारी व्यक्ती ही धार्मिक मानली जाईल; बंडखोर नव्हे. बंडखोर तरुण घडवण्याकरता नव्या कल्पनेलाच जन्म घ्यावा लागेल! प्रश्न हा आहे की, अशी कल्पना पुन्हा जन्माला येईल का? हा प्रश्न मिलियन डॉलर्सचा आहे. जगभर या प्रश्नावर चर्चा सुरू आहे. जगातली गरिबी, दैन्य, शोषण, भूक, मानवी पतन वगैरे आता नष्ट झालेलं आहे का? तर नाही. अशा परिस्थितीत नव्या झंझावाती कल्पनेचा जन्म होणं हे मानववंशाचा आजवरचा अनुभव पाहता संयुक्तिक नाही का? इथे जगभरचे तज्ज्ञ विचारवंत 'नाही' असं उत्तर देतात. यातही काही अपवाद आहेत. परंतु या अपवादांपैकी बऱ्याचजणांना गृहीत धरता येतच नाही. कारण त्यातले बरेचसे पूर्वाश्रमीचे कम्युनिस्ट आहेत. ज्यांच्या नव्या झंझावाताची कल्पना जुनीच आहे!

आणि उरलेल्यांचा 'हो' हा क्लॅश ऑफ सिविलायझेशनसारख्या मूलमतत्त्ववादी पूर्वकल्पनांनी भारलेला आहे. ऑल्विन टॉफलरसारखा 'क' दर्जाच्या लेखकांना अव्वल दर्जाचे विचारवंत असल्यासारखे डोक्यावर घेऊन नाचताना, त्याच्या लेखनामध्ये एक झंझावाती कल्पना नसून नुसता हुलुडबाज कल्पनाविलास आहे. हे आज कुणी नीट लक्षात घेत नाही.

मुळात कोणतीही कल्पना *(वैश्विक, तरुण आणि धोकादायक)* जेव्हा जन्म घेते, तेव्हा तिची कारणे ही जगण्यातल्या दु:खात लपलेली असतात. जगण्यातल्या दु:खाचं एक महत्त्वाचं कारण आर्थिक असतं. परंतु तेच एक कारण असत नाही. अन्यथा अमेरिका अस्वस्थपणे जगाचा नरक करायला निघाली नसती! आर्थिक बाबतीत

जागतिकीकरणाचा विचार हा नवीन वैश्विक कल्पना असल्यासारखा नाचवणे हे हास्यास्पद आहे. आधीच्या सत्ता कोसळवणाऱ्या झंझावाती कल्पनांच्या कुलाशीसुद्धा या 'ग्लोबलायझेशन' चा संबंध नाही. कारण हे 'ग्लोबलायझेशन' एक व्यापारी तत्त्व आहे. मानवी दु:खांचं व्यापक निराकरण करण्याची घोषणा नव्हे. किंवा गमतीने असंही म्हणता येईल की, मानवजातीला नवी व्यापक दु:खं देण्याची क्षमता या विचारात आहे. २००१ साली अर्थशास्त्राचं नोबेल पारितोषिक ज्यांना देण्यात आलं होतं, ते जोसेफ स्टीग्लिट्झ हे वर्ल्ड बँकेचे मुख्य अर्थशास्त्रज्ञही होते. अमेरिकन सरकारमध्ये बिल क्लिंटन यांच्या काळात त्यांनी 'कौन्सिल ऑफ इकॉनिमिक ॲडव्हायझर्स' या धोरणं ठरवणाऱ्या व्यवस्थेचं प्रमुखपद भूषविलेलं आहे. त्यांनी आपल्या 'ग्लोबलायझेशन अँड इट्स डिसकन्टेन्ट्स' या पुस्तकात फार मार्मिकपणे या व्यापारी ग्लोबलायझेशनच्या दु:ख निर्माण करण्याच्या शक्तीविषयी लिहिलेलं आहे: "The French intellectual Pierre Bourdieu has written about the need for politicians to behave more like scholars and to engage in scientific debate, based on hard facts and evidence. Regrettably, the opposite happens too often, when academics involved in making policy recommendations become politicized and start to bend the evidence to fit the ideas of those in charge."

जोसेफ स्टीग्लिट्झ यांचं हे प्रतिपादन, जागतिकीकरणाच्या व्यापारी संकल्पनांतून संपूर्ण मानवजातीच्या आर्थिक दु:खांचं निराकरण करण्यात येणाऱ्या दारुण, अंतिम अपयशासंबंधीच्या कारणांवर आहे. यातल्या सत्ताचा जो उल्लेख आहे. त्यांच्याकडून जी अपेक्षा आहे, *(जी पुरी होणारी नाहीच)* ती मानवी इतिहासातल्या पूर्वसूरी सत्तांप्रमाणेच आहे. विनाशकारी आणि धोकादायक अशा मानवमुक्तीच्या कल्पनांनी जगाला वेढून टाकण्याअगोदर त्या त्या काळच्या जोसेफ स्टीग्लिटझनी अशीच इच्छा प्रगट केलेली आहे. पण त्या त्या काळाच्या अतिसामर्थ्यशाली सत्तांनी त्याच साधी दखल घेण्यासही नकार दिलेला आहे. आज सर्वकेंद्री सत्ता असा उल्लेख केल्यावर 'अमेरिका' असा आपण विचार करतो आणि ते बरोबरही आहे. जग दुसऱ्या महायुद्धानंतर प्रथमच इतक्या प्रबळपणे एककेंद्री झालेलं आहे. इतकं की, सत्तेपुढे व्यक्तीला प्रतिष्ठा नसण्याचा कालखंड फिरून फिरून परत इतिहासात येतो. तोच हा कालखंड आहे. पण या साऱ्याचा अमेरिकेच्या लष्करी सामर्थ्याशी फारसा काही संबंध नाही. सत्तेच्या प्रबळपणाचा खरा मापदंड तिला चुका करण्याचे किती स्वातंत्र्य आहे. त्यावरून मोजला पाहिजे. आज अमेरिका प्रबळ आहे. कारण अमेरिकेला चुका

करण्याचं अमर्याद स्वातंत्र्य आहे. अशा प्रबळ एककेंद्री सत्तेचं पतन तेव्हा सुरु होतं, जेव्हा ती सत्ता ते स्वातंत्र्य अमर्यादपणे खरोखरच वापरू लागते. अशा प्रकारचं स्वातंत्र्य केंद्रसत्तेने उपभोगण्याचे परिणाम झपाट्याने सभोवतालच्या जगावर व्हायला लागतात. आज मानवी संस्कृती विज्ञान तंत्रज्ञानाच्या ज्या टप्प्यावर उभी आहे. तिथे जग हेच एका लहान खेड्यासारखं झालेलं आहे. त्यामुळे केंद्रसत्तेने चुका करण्याचं अमर्याद स्वातंत्र्य उपभोगायला सुरुवात केली की त्याचे परिणाम जगभर पसरतात. त्यातून मानवी दु:ख पराकोटीला पोहोचवणारी विषारी वर्तुळं निर्माण होतात. जुन्या श्रद्धा कोलमडतात. अनेक नव्या कल्पना जन्म घेतात. त्यातली सर्वात धोकादायक कल्पना सर्वात तरुण ठरते. आणि वैश्विकतेचा नारा देत ती केंद्रसत्तेचा अंत घडवून आणते. एका अर्थाने ती कल्पना पितृघातकी असते. कारण तत्कालिक 'सत्ते'शिवाय तिचा जन्म होऊ शकत नाही. हा क्रम अटळ असतो. उत्क्रांतीच्या तत्त्वासारखाच.

या साऱ्याच्या पार्श्वभूमीवर भारत देशाचे आणि इथल्या हिंदू तत्त्वज्ञानाचे भवितव्य काय, असा प्रश्न वाचणाऱ्यांच्या मनात येईलच. पहिलं म्हणजे, हिंदू हे कोणतेही तत्त्वज्ञान नाही. उपनिषदं, ब्रह्मसूत्र, नारदीय सूक्त वगैरे कल्पना आहेत. त्यांचा मानवी दु:खांसंदर्भात स्वतंत्रपणे विचार करायला हवा. त्या त्या काळात त्यांनी क्रांतिकारकता दाखवलेलीही आहे. पण त्यात जडवादाच्या एका पैलूचा अभाव आहे. त्यामुळेच या कल्पनांचं संघटन नाही. सत्तेशी संघर्ष नाही. प्रत्यक्ष सत्तेत परिवर्तन नाही. 'हिंदुत्व' अशी काही क्रांतिकारी कल्पना इतिहासात कधीही नव्हती. यशस्वी झालेल्या किंवा फसलेल्या अनेक कल्पनांचे जीवाश्म दाखवून त्याला 'हिंदुत्व' असे नाव देऊन कुणी रेटून नेऊ इच्छित असेल तर त्याबद्दल करुणा असावी! त्याचा मानववंश, मानवी इतिहास, मानवी सामाजिक राजकीय बदल आणि मुख्य म्हणजे विशाल मानवी दु:खांशी काहीही संबंधच नाही. त्यामुळे हे शतक जसे 'अमेरिकन सेंच्युरी' म्हणून ओळखले जाणार नाही, तसेच ते 'हिंदू शतक' म्हणूनही ओळखले जाणार नाही. या शतकाच्या अस्तित्वाशी, राजकीय-सामाजिक ताण्याबाण्यांशी इथला भारतीय समाज पूर्णपणे अनभिज्ञ आहे. आश्चर्य म्हणजे नेमकी हीच स्थिती अमेरिकन समाजाची आहे! फक्त या दोन्ही समाजांची जागा आणि ऐतिहासिक स्थान वेगवेगळं आहे. त्यामुळे नवी धोकादायक कल्पना जन्म घेईल. तिचा या दोन समाजांशी अत्यंत जवळचा संबंध असेल. सत्ता ही कधीच अभेद्य नसते. हे केवळ राजकीय सत्तांबाबतच नव्हे. तर आर्थिक सत्तांबाबतही खरे आहे. पण सत्तांचा भेद झाल्यावर निर्माण होते तीही सत्ताच असते. कारण मुक्तीची कल्पना आणि मुक्ती यांतला फरक हा व्यवहाराचा भाग

असतो. सत्तेच्या व्यवहाराचा, झंझावाती कल्पनांनी तरुण मनांचा ताबा घेतला की, सत्ता उलथणे हा फक्त उपचाराचा भाग असतो. केवळ सत्ताच नव्हे तर सत्तेचं तत्त्वही! पण अंतत: त्यातून मानवी मुक्ती शक्यच नसते.

येणाऱ्या काळात नवीन झंझावती धोकादायक कल्पना जन्म घेईन. त्यातून सत्तेची तत्त्वं बदलतील हे नि:संशय. पण ती कल्पनाही आधीच्या कल्पनांप्रमाणेच अशास्त्रीय असेल. तरुणांच्या मनावर राज्य करणाऱ्या कल्पना नि:संशय रोमँटिक असतात. त्या कितीही शास्त्रीय भाषेत लिहिल्या गेल्या तरीही. मग त्या कल्पनांतून जी क्रांती (जगभर) जन्म घेईल तिचा इतिहास हा तेव्हाच्या शेखरला तेव्हाच्याच नंदिताला भेट द्यायला आवडेल. प्रश्न फक्त हा इतिहास कोण लिहिणार याची आहे. आत्ताच्या सर्वच लेखकांना त्यांच्या आयुष्यात असा रिपोर्ताज लिहिता आला तर आवडेल. मग तो कितीही विनाशकारी का असेना!

कारण याचं मूळ मानवी दु:खात आहे. आणि आजही ते अपार आहे!

■

महाराष्ट्र टाइम्स *(दिवाळी)* २००४

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि मुस्लिम प्रश्नाचं मूळ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना आणि वाढ कोणत्या एका मुद्याभोवती कायम फिरत राहिलेली आहे, असं विचारलं तर 'मुस्लिम प्रश्नाभोवती' असं थेट उत्तर देता येईल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी काहीही लिहिताना येणारा एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे संघाकडून किंवा संघाचे सहानुभूतीदार म्हणून ज्या कुणी जे काही लिहून ठेवलेलं आहे ते उगाच घोळदार आणि फाफटपसारायुक्त आहे. त्यातून फोलपटंच खूप निघतात. परंतु थेट मुद्दा आणि त्यासंबंधीचे युक्तिवाद हे शोधत जावे लागतात, पण हे थेट मुद्दे आणि युक्तिवाद शोधत गेल्यावर मुस्लिम प्रश्नावरची संघाची भूमिका लगेच लक्षात येते. संघाच्या सुरुवातीपासून आजपर्यंत संघाची भूमिका ही थोड्याफार फरकाने हीच राहिलेली आहे. स्वत: डॉक्टर हेडगेवारांनी आपल्या टाचणवहीत एके ठिकाणी लिहिलंय. ''हिंदुस्थानचा पंचप्राण म्हणजे त्याची हिंदू संस्कृती. म्हणून हिंदुस्थानचं रक्षण करावयाचं याचा अर्थ हिंदू संस्कृतीचं रक्षण करणं. ते आपलं आद्य कर्तव्य ठरतं. जर हिंदुस्थानातील हिंदू संस्कृती नष्ट होणार असेल

तर, हिंदू समाजाचं नावही हिंदुस्थानात उरणार नसेल, तर मग त्या राहिलेल्या केवळ जमिनीच्या तुकड्याला हिंदुस्थान किंवा हिंदू राष्ट्र हे नावही शोभणार नाही. कारण राष्ट्र म्हणजे केवळ जमिनीचा तुकडा नव्हे. हिंदू धर्म व हिंदू संस्कृती यांच्या संरक्षणाकडे आणि प्रत्यही परधर्मीयांकडून हिंदू समाजावर होत असलेल्या विध्वंसक हल्ल्यांकडे दुर्दैवाने कॉंग्रेसचं पूर्ण दुर्लक्ष होत असल्यामुळे हे अत्यंत आवश्यक कार्य करण्यासाठीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आवश्यकता आहे.'' सुरुवातीलाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्थापकांचं हे टाचण गृहीत धरलं की काही प्रश्न उभे राहतात. ते प्रश्न म्हणजे, हिंदुस्थानचं रक्षण कुणापासून करायचं? हिंदू संस्कृतीला कुणापासून धोका आहे? परधर्मीय म्हणजे नेमके कोण? आणि या सर्व प्रश्नांची उत्तरं 'मुसलमान आणि अंशत: ख्रिश्चन' अशी आहेत. मुळात हिंदूंना आणि हिंदुस्थानला धोका आहे म्हणजे काय? गेली एक हजार वर्षं ससैन्य आक्रमण करणाऱ्या बलदंड मुस्लिम आक्रमकांना जी संस्कृती तिळमात्रही नष्ट करता आली नाही ती संस्कृती अचानक १९२५ सालापासून परधर्मीयांकडून कशी नष्ट व्हायला लागली? आणि मुळात तेव्हाची कॉंग्रेस आणि आजची कॉंग्रेस खूप वेगळी आहे. तेव्हा गांधीजी जिवंत होते. एवढंच नव्हे तर पूर्ण भरात होते. पटेल, बोस, आझाद वगैरे मंडळी त्यांच्या ऐन जोशात होती. एवढंच नव्हे तर महम्मद अली जीना हे पुढे उलटच 'कॉंग्रेस ही हिंदूंच्या हिताचं रक्षण करते' असा आपला कॉंग्रेसला 'बॅकफुट'ला नेणारा आरोप करावयाचे होते. अशा परिस्थितीत डॉ. हेडगेवारांनी हिंदू रक्षणाचा बेडा उचलला आणि 'होय! हे राष्ट्र आहे!' ही आपली घोषणा केली. इथे प्रश्न असा उभा राहतो की हे सगळे प्रतिपादन हिंदूंना 'भयाच्या मानसिकतेत' ढकलणारे नव्हते काय? इंग्रजांच्या आगमनानंतर मुस्लिम आक्रमकांपैकी मुस्लिम शासक झालेल्या राजांची सद्दी संपली होती.

कायदेकानून मुस्लिमकेंद्री असण्याचे दिवसही संपलेले होते. शिवाय त्या भयावह दिवसातही डॉ. हेडगेवार आणि त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक अस्तित्वात नसताना हिंदू संस्कृती तिच्या एवंगुणवैशिष्ट्यांसह टिकलीच होती. मग हे नवीनच मुस्लिम *(किंवा हेडगेवारांच्या शब्दात 'परधर्मीयांचं')* आक्रमण कुठलं होतं? आणि ते थोपवायचं म्हणजे डॉ. हेडगेवार व त्यांची संघटना काय करणार होती? लिहिलं गेलेलं आहे. आणि जे सांगितलं जातं ते तसं धक्कादायक आहे. मुस्लिम समाजगटांमध्ये एक धर्मांधता आणि आक्रमकता होती. *(जी आजही आहे).* त्यामुळे ताबुतांची मिरवणूक असो किंवा हिंदूंच्या मिरवणुकीतील वाद्य वाजवण्याचा प्रसंग असो, मुस्लिम अरेरावीने वागत आणि त्यांच्या टर्रेबाजीला हिंदू शामळूपणामुळे उत्तर देऊ शकत नसे. इथे एक बाब ध्यानात

घेण्याजोगी आहे. १९२५ चा काळ हा जगभर औद्योगिक क्रांतीनंतर आधुनिक आणि विज्ञानबहुल अशा शासनसंस्था स्थापन होण्याचा कालखंड होता. अगदी मुसोलिनीचं फॅसिस्ट शासन किंवा पुढे येणारं हिटलरचं काळंकुट्ट नाझीपर्व हेसुद्धा आधुनिक शासनसंस्थांमध्येच मोडतात. अशा युगात तेव्हाचा बहुसंख्य मुस्लिम समाज पोहोचलाच नाही. आधुनिक ज्ञान-विज्ञान-विद्या शाखांकडे मुस्लिम शासकांनीही या देशात दुर्लक्ष केलेलं होतं. काही मुस्लिम शासकांनीही या देशात नवीन शास्त्रं आणि संस्कृतींची स्थापना केलेली होती. त्याच्याही खुणा पूर्णपणे लोप पावल्या होत्या. त्यामुळे बहुसंख्य मुस्लिम समाज एका तमोयुगात पोहोचलेला होता. त्याच्या मानसामध्ये टोळीयुद्धाचं युग संपलेलं आहे याची पुसटशी जाणीवही नव्हती. अशा या मुस्लिम-माणसाचं रस्त्यावर जे रूप प्रकट होत होतं ते रूप शासनसंस्थेद्वारे प्रबोधन युगात नेणं किंवा त्याला कायद्याचा बडगा दाखविणं हे दोनच आधुनिक पर्याय समोर होते. शासनसंस्था अजूनही इंग्रजांच्या ताब्यात होती. त्यामुळे हतबलता येणं हेही स्वाभाविक होतं. परंतु हिंदूंच्या रक्षणासाठी संघटना काढणं हे हिंदूंनाच मागे ढकलणारं होतं. इथे लक्षात घेण्याजोगी एक महत्त्वाची गोष्ट आहे. ती म्हणजे, संघटना काढणं यात काहीही गैर नव्हतं, ती संघटना (तेव्हाच्या) काँग्रेसविरोधी असण्यातही काही गैर नव्हतं; परंतु परधर्मीयांच्या विध्वंसक हल्ल्यापासून हिंदू समाजाला वाचवण्याकरता संघटना काढणं हे मात्र खूपच गैर होतं. कारण माग अशा या संघटनेचा कायमस्वरूपी संदर्भबिंदू मुसलमान आणि मुसलमानांचं वर्तन हाच राहिला. या एका संदर्भबिंदूने संघटनेला गतानुगतिक बनवलं. एवढंच नव्हे तर संघटनेला संपूर्ण स्वातंत्र्यलढ्यापासून वंचित राहावं लागलं. डॉ. हेडगेवारांच्या संघटनेचं उद्दिष्ट एकदा ठरलं की मग संघटना वाढवण्यासाठी आणि बलवान करण्यासाठी त्यांना तत्काळ पावलं उचलावी लागली. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या निकडतक्त्यावर स्वातंत्र्यआंदोलन दुय्यम स्तरावर ढकललं गेलं. प्रथम आपल्या संदर्भबिंदूला महत्त्व देणं आलं. त्यामुळे हेडगेवारांनी आपल्या स्वयंसेवकांना व्यक्तिगत स्तरावर स्वातंत्र्यआंदोलनात भाग घ्यायला सांगितलं, पण संघटना मात्र आंदोलनापासून दूर ठेवली. फार पुढे कम्युनिस्ट चळवळ तिच्या निकडतक्त्यामुळे अशीच गोत्यात आली. रशिया दोस्त राष्ट्रांचा हिस्सा बनल्यावर ब्रिटनचं जर्मनीविरुद्धचं युद्ध हे लोकयुद्ध ठरलं आणि कम्युनिस्ट बेचाळीसच्या स्वातंत्र्ययुद्धाला विरोध करू लागले. नेमकी तीच स्थिती इथे रा. स्व. संघाची झाली.

मुळात ज्या परधर्मीयांच्या विघातक आणि विध्वंसक हल्ल्याची कल्पना करून जो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पाया घातला गेला त्यातले बहुसंख्य 'परधर्मीय'

मुसलमान होते. त्यांचा नेमका या भूमीशी काय प्रश्न होता आणि त्याच्याकडे संघाने कसं पाहिलं ते समजून घेतल्याशिवाय संघाची वाटचाल समजून घेणं हे अशक्यच आहे.

मुस्लिम धर्माचं मूळ हे द्वैतावर उभं आहे. 'त्या'ला शरण जाणं हीच मनुष्यजीवनाची इतिकर्तव्यता आहे. मुस्लिम धर्मानुसार 'परमेश्वर न्याय करतो' हे वचनच चुकीचं आहे. 'अल्ला करतो तोच न्याय असतो' म्हणजेच 'काजी मुतलक'. 'इस्लाम'ची संपूर्ण रचनाच मानवाला स्वातंत्र्याचं भय असतं या समजुतीवर उभी आहे. 'इस्लाम'च्या अर्थाचे दोन प्रकार आहे. त्यातला एक म्हणजे जो बिगरइस्लामी माणसाला समजावला जातो तो आणि दुसरा म्हणजे जो स्वत: मुसलमानाच्या समजण्यासाठी असतो तो. या दोन्हीही अर्थांमध्ये खूपच तफावत आहे. उदाहरणार्थ एखादा मुस्लिम माणूस 'परमेश्वर न्याय करतो, तो दयाळू आहे, सर्व प्राणिमात्रांचं कल्याण हाच त्याचा उद्देश आहे' असं जेव्हा म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ त्या मुस्लिम माणसासाठी वेगळा असतो आणि बिगरमुस्लिम माणसासाठी तो अर्थ वेगळाच असतो. म्हणजे या विधानातील परमेश्वर म्हणजे फक्त अल्ला असा अर्थ त्याला अभिप्रेत असतो आणि त्याच वेळी त्यामागचा धर्म हा फक्त 'इस्लाम' हेच अभिप्रेत असतं. यात बदल करण्याचा अधिकारच खरं तर कोणत्याही मुसलमानाला नसतो. कारण मुस्लिम माणसाला 'तबलीग' *(स्वधर्मप्रचार)* आणि 'तरदीद' *(परधर्मखंडन)* हे अपरिहार्य आहे. इस्लाम 'दिने कामिल' आहे. म्हणजेच जगाच्या अंतापर्यंत यात काहीही बदल होणार नाही. तसा प्रयत्न करणाऱ्यालाही मृत्यू हीच सजा फर्मावलेली आहे. कुराणातल्या शब्दांना बदलणाऱ्यांना 'इस्लाम'मध्ये 'इर्तका', 'बहद' आणि 'जिन्दिक' या नावांनी ओळखलं जातं. अशांना गळ्यापर्यंत जमिनीत गाडून दगडांनी मारण्याची सजा इस्लाममध्ये फर्मावलेली आहे.

परंतु या साऱ्यामध्ये जर देशात किंवा राज्यात राजसत्ता परधर्मीयांची असेल तर मुसलमानास मनामध्ये इस्लामवर श्रद्धा ठेवून असत्य वचनं देण्यास आणि वेळप्रसंगी अगदी इस्लामविरोधी बोलावयास परवानगी देण्यात आलेली आहे. बिगरमुसलमान माणसाशी केलेले वादे आणि दिलेली वचनं मुस्लिम माणसाने पाळली नाहीत तर इस्लामनुसार ती चांगली बाब मानली जाते. याला 'सबर' असं नाव आहे. अशा स्वरूपाचा हा धर्म चौदाशे वर्षं चालत आलेला आहे. हे वाचताना असं वाटतं की, मुसलमान हा जगभरात कोठेही एकच असला पाहिजे. सर्वांचा मिळून एकच देश असला पाहिजे. त्यांचे सर्वांचे कायदे हेसुद्धा एकच असले पाहिजेत, परंतु वास्तवात तसं झालेलं नाहीए. वास्तवात मुस्लिमांचेच अनेक देश आहेत. *(मुस्लिम सत्ताधीश*

*आणि बहुसंख्य असलेले)* त्या प्रत्येक देशातले इस्लामचे कायदेही वेगवेगळे आहेत. एवढंच नव्हे तर इस्लामच्या अनुयायांमध्येही कडव्या लढाया झालेल्या आहेत. आजही होत आहेत. या साऱ्यापलीकडे जाऊन आपण पाहिलं तर हे दिसतं की एवढ्या कट्टर धर्मासोबत तेवढीच कट्टर सेना आणि कडवे सैनिक घेऊन अनेक मुस्लिम शासकांनी हिंदुस्थानवर राज्य केलं. त्यातले अनेक शासक तर शिवाजी महाराजांअगोदर शेकडो वर्षं होऊन गेले. हिंदुस्थानातल्या हिंदूंनी त्यांना टिपकागदासारखं शोषून घेतलं. जगातली अनेक साम्राज्यं सहज इस्लाममय करण्याची हिंमत असणाऱ्या इस्लामच्या कडव्या फौजा कोणताही नायक आणि कोणतंही लिखित तत्त्वज्ञान नसतानाही हिंदूंच्या पुढे अपयशी ठरल्या. हिंदुस्थान इस्लाममय करण्याचं स्वप्न पाहणारा अखेरचा औरंगजेब. त्याच्यासहित कुणालाच हा देश इस्लाममय करता आला नाही ते काही डॉ. हेडगेवार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघामुळे नव्हे! राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सुरुवातीपासूनच्या धोरणामुळे एक मुख्य गोष्ट घडली ती म्हणजे पहिल्यांदाच हिंदूंच्या बाजूने द्वैत मान्य करण्याची संघटित सुरुवात झाली. वास्तविक ज्या देशामध्ये हिंदू बहुसंख्य आहेत आणि देशाची शासनसंस्थासुद्धा हिंदूंच्याच ताब्यात आहे तर हिंदूच असुरक्षित कसा? आणि एकदा का हिंदू असुरक्षित हे मान्य केलं की एका नवीनच द्वैताची स्थापना होते, जी हिंदूंच्या इतिहासातील एक सर्वात मोठी चूक ठरते.

इस्लाममध्ये जो सर्वात धक्कादायक भाग आहे तो द्वैताचा. राधाकृष्णन यांनी अल्ला, प्रेषित आणि अनुयायी यांच्यातल्या द्वैतभावाबद्दल लिहून ठेवलंय की, ''अशा प्रकारची विचारसरणी संपूर्ण समाजाला गुलामीशिवाय काहीही देऊ शकत नाही. कारण अशा विचारसरणीत माणसामधला स्वयंसिद्ध विवेक नष्ट करते. त्याच वेळी माणसामधील विवेकातून निर्माण होणारा पाया नष्ट होऊन त्याच्यातला मूळ चांगुलपणाच नष्ट होतो.'' राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने ज्या संघटनेचा पाया घातला त्या संघटनेत हिंदूंमध्ये अशा प्रकारचं संघटन नसल्यामुळेच हिंदू हा मुसलमानांपुढे मार खातो, असं वरवर पाहता पटणारं एक गृहितक मान्य करण्यात आलं. मुळात या गृहितकातील दोन्ही मुद्दे खरे नव्हते. एक म्हणजे, हिंदू मार खातो हा मुद्दा सपशेल खोटा होता हे हजार वर्षांच्या वर दिलेल्या इतिहासावरून दिसतंच. बाकी जगाच्या तुलनेत इस्लामच्या झंझावातापुढे टिकला तो फक्त हिंदूच! आणि दुसरं म्हणजे, त्या टिकण्यामागे जी अनेक कारणं होती त्यातलं मुख्य कारण होतं ते हिंदूंचं संघटन नव्हतं हेच. हिंदुस्थान इस्लाममय करून सोडण्याची इच्छा असलेल्या अनेक कडव्या धर्मांध मुसलमान शासकांना हिंदूंचा पराभव करायचा म्हणजे नेमका कशाचा पराभव करायचा हेच

शेवटपर्यंत कळलं नाही. हिंदू म्हणजे कोणतंही धर्मपीठ नव्हतं. हिंदू म्हणजे कोणताही सम्राट शासक नव्हता. कोणता राजा नव्हता, हिंदू म्हणजे कोणतंही संघटन नव्हतं. अशा परिस्थितीत औरंगजेबालाही हिंदुस्थान इस्लाममय करायचा म्हणजे काय करायचं, हेच कळेना. भले भले इस्लामी राजे, धर्मगुरू हे या जमिनीवर हतवीर्य झाले. कारण हिंदूंचं कोणतंही असं संघटन अस्तित्वातच नसल्यामुळे नेमकं काय नष्ट करायचं हेच कोणाही इस्लामी शासकाला कळलं नाही. 'इस्लाम' हा मुळातच द्वैतावर आधारलेला धर्म असल्यामुळे मुळात अद्वैताचा प्रभाव असलेल्या समाजगटाच्या विवेकावर प्रहार करणं इस्लामच्या कोणाही शासकाला शक्य झालं नाही. ही या ऐतिहासिक प्रवाहातील बाब एकाच इस्लामी शासकाला कळली होती. तो होता मोघल सम्राट अकबर. त्याने म्हणूनच 'दिने इलाही' पंथाची स्थापना केली. त्याने मोहम्मद पैगंबरांना प्रेषित मानण्यास नकार दिला. हज यात्रेवर बंदी घातली. 'हज' हा प्रदेश इथल्या भूमीच्या बाहेर असल्यामुळे तिथे निष्ठा ठेवणं हा देशद्रोह असल्याचं जाहीर केलं. एवढंच नव्हे तर या आदेशांना विरोध करणाऱ्या मुल्ला-मौलवींना काबूलच्या बाजारात नेऊन विकलं. याही पुढे जाऊन आपल्या मुली त्याने हिंदू राजांना दिल्या आणि हिंदू राजांच्या मुली आपणाला करून घेतल्या. इस्लाममधल्या प्रेषित आणि अनुयायी या द्वैतालाच अकबराने आव्हान दिलं. खरं तर 'राणा प्रताप'चा लढा हा धार्मिक कमी आणि राजकारणातली स्वायत्तता टिकवणारा अधिक होता. इतिहास नीट वाचणाऱ्याला हे सारं व्यवस्थित कळू शकतं. पण त्याला हिंदू लढवय्या असा रंग नंतर देण्यात आलेला आहे. मुळात अकबराचा लढा हिंदूंशी नव्हताच. अकबराचा खरा लढा कडव्या धर्मांध मुसलमानांशी होता. अकबराच्या दरबारातील मुस्लिम धर्मगुरू आणि इस्लामवर कडवी श्रद्धा असणारे सरदार, अकबराच्या आणि त्या वेळच्या त्याच्या जगातील एकमेवाद्वितीय अशा सामर्थ्यशाली साम्राज्यामुळेच केवळ त्याच्याविरुद्ध बंड करू शकले नाहीत. अन्यथा त्यांनी अकबराला इस्लाममधली सर्वांत भीषण अशी शिक्षा दिली असती. कारण अकबराने मोहम्मद पैगंबरांना प्रेषित न मानण्याचं कारण त्यांनी अतिशय छोट्या मुलीशी लग्न केलं असं दिलं होतं व वर ''असा माणूस प्रेषित असू शकत नाही'' अशी त्याने टिप्पणीही केली होती! परंतु अकबराच्या या कृतींमुळेच पुढे औरंगजेबाचा सत्तेचा मार्ग खुला झाला. हुमायूं आणि शहाजहाननंतर बादशाह व्हायला योग्य अशी व्यक्ती 'दारा शुकोह' होता. त्याच्यावर शहाजहानचा जीवही होता. पण तो जर बादशाह झाला तर अकबराच्या चार पावलं पुढे जाईल अन् अकबराने सुरू केलेली क्रांती पुढे नेईल, अशी साधार भीती दिल्ली दरबारातल्या इस्लामच्या बंद्यांना

होती. पुढचा इतिहास सर्वश्रुत आहेत.

प्रश्न असा पडतो की, इस्लामच्या संदर्भात हिंदुस्थानच्या या इतिहासाचं वास्तविक आकलन संघसंस्थापकांना झालं होतं की नाही? कारण संघाची संरचना पुन्हा इस्लामला तोडीस तोड 'उत्तर' देण्याकरिता 'प्रेषित आणि अनुयायी' या संरचनेवर आधारित संघटना स्थापन करण्यात आली. हिंदू माणूस फक्त 'ब्रह्म' तत्त्व असलेल्या परमेश्वरालाच याअगोदर परमपूजनीय मानत असे. संघाच्या स्थापनेननंतर नवे नवे प. पू. भूतलावर येऊ लागले! हिंदूंच्या स्वयंसिद्ध विवेकामध्ये केलेली ही अक्षम्य ढवळाढवळ होती. त्यामुळे झालं काय की, संघ स्वयंसेवकांमध्ये क्रांतिकारी बौद्धिक बंडखोरी अवरुद्ध झाली. संघासारख्या संघटनेमध्ये व्यक्तीच्या विवेकाच्या आवाजाला काहीही महत्त्व राहिलं नाही. संघाच्या संपूर्ण जीवनात क्रांतिकारी बौद्धिक बंडखोरीचं महत्त्व कळण्याची वेळ लवकरच संघावर आली आणि तीही मुस्लिम प्रश्नावरच. १९४७ साली झालेल्या फाळणीमुळे अख्खा देश हादरला. रा. स्व. संघाचा जन्मच मुळी परधर्मीय शक्तीपासून देशाचा विध्वंस टाळण्याकरिता झालेला होता. जेव्हा फाळणी झाली तेव्हा त्या विनाशकारी तांडवापासून देशाला वाचवण्याकरिता संघाने कोणतं पाऊल उचललं? किंवा कोणती राजकीय, सांस्कृतिक, सामाकि प्रतिभा वापरली?

बाळासाहेब देवरस हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तिसरे सरसंघचालक. त्यांनी १९७३ साली सरसंघचालक झाल्यावर 'किर्लोस्कर' मासिकाला मुलाखत दिली होती. त्यात 'देशाची फाळणी आणि संघ' या विषयावर बोलताना सांगितलं की, ''हे स्वीकारण्यास मला मुळीच संकोच वाटत नाही की, संघाच्या वरिष्ठ कार्यकर्त्यांनी हिंदुस्थानच्या विभाजनाच्या अवांछनीय प्रभावाचा विचार केलेला नव्हता. त्या विभाजनास नि हिंदुहितविरोधी परिस्थितीस रोखण्याच्या दृष्टीने संघाने कोणतीही योजना आखलेली नव्हती. आम्ही असंही म्हणून शकतो की, त्या एकूण परिस्थितीचा सांगोपांग विचार करायला आम्हाला वेळच मिळाला नाही.'' याही पुढे जाऊन गंगाधर इंदुलकरांनी आपल्या ''रा. स्व. संघ-काल, आज नि उद्या' या पुस्तकात यासंबंधी एक उल्लेख केलेला आहे. त्यांनी १९४९-५० च्या वर्षभर नागपुरात वास्तव्य केलं. त्या वेळेस त्यांनी अनेकदा बाळासाहेब देवरसांना ''संघ फाळणीच्या विरोधात का उभा राहिला नाही'', असा प्रश्न विचारला. तर बाळासाहेब देवरस त्यावर म्हणाले, ''ती आमची चूकच झाली. आम्हाला त्या परिस्थितीचा तेव्हा अंदाजच आला नाही.''

हा अंदाज संघाला का घेता आला नाही, याचं कारण संघाच्या उद्दिष्टरचनेत

आणि निकडतक्त्यांमध्ये आहे. मुस्लिम समाजगटाचा प्रतिकार आपण करणार आहोत म्हणजे आपण नेमकं काय करणार आहोत याची स्पष्ट समज संघाकडे नव्हती. आजही ती नाही. त्यामुळेच तात्पुरते प्रतिक्रियावादी कार्यक्रम आखण्याखेरीज संघाला काहीही करता येणं शक्यच नव्हतं. हिंदू धर्मातली मुळातली अद्वैतवादी विचारसरणी आणि विवेकवादी विचार यांचाच संघाला मोठा अडसर आहे. संघाच्या संपूर्ण आयुष्यात संघातून अनेक संघटना जन्म घेत्या झाल्या. भारतीय मजदूर संघ, विश्व हिंदू परिषद. भारतीय किसान संघ, वनवासी कल्याणाश्रम, राष्ट्रसेविका समिती, भारतीय जनता पक्ष... वगैरे अनेक. परंतु यातल्या वेगवेगळ्या उद्दिष्टांनी जन्माला आलेल्या अनेक संघटनांनी मुस्लिम प्रश्नावर कोणतीच निर्णायक भूमिका घेतली, असं झालं नाही. याचं कारण मुळात उत्तरं शोधण्याचा नव्हता, तर प्रश्न शोधण्याचाच होता !

हिंदुस्थानच्या इतिहासामध्ये मुसलमान संस्कृतीची मुळं खोलवर गेलेली आहेत. परंतु आजचा हिंदुस्थानी मुसलमान हा जेव्हा जेव्हा आपल्या गतसाम्राज्याची आठवण करतो तेव्हा तेव्हा तो स्वत:ला असुरक्षित समजतो. आजची परिस्थिती ही त्याला उदासवाणी आणि पराभूत वाटते. हे असं आहे आणि ते मला, इतरांना किंवा रा. स्व. संघाला वाटतं म्हणून बदलू शकत नाहीए. आजच्या मुसलमानांची मुळं ही हिंदुस्थानीच होती *(म्हणजे ते बाटलेले आहेत या अर्थाने)* म्हणून त्यांना हिंदुस्थानी मुसलमान समजा, अशी भूमिका जी संघाकडून घेतली जाते तीही अप्रस्तुतच आहे. कारण माझे पूर्वज खैबर खिंडीतल्या कुठच्या तरी संस्कृतीचे भाग होते म्हणून मी आज त्या संस्कृतीचा भाग होऊ शकत नाही. मी स्वत:ला त्या संस्कृतीशी जोडून घेऊ शकत नाही. माझ्या संदर्भात जे काही बोललं, पाहिलं जाईल ते संपूर्णपणे आजचं असलं पाहिजे. रा. स्व. संघाची गोची अशी आहे की तो स्वत: गतानुगतिक आहे. संघ स्वयंसेवक *(अपवाद वगळून)* स्वत:च पाच हजार वर्षांपूर्वीपासून बोलायला सुरुवात करतात, तर मग ते हिंदुस्थानी मुसलमानांना कोणत्या प्रबोधन युगात नेणार ? संघप्रणीत विश्व हिंदू परिषदेची आणि इतर संघटनांची तथाकथित साधू संमेलनं बघतानाच अंगावर शहारा येतो. वाटतं की, अरे बापरे! आता हे हिंदूंनाच कोणत्या तमोयुगात नेणार ? अशा परिस्थितीत मुसलमानांना आजच्या युगात आणण्याचं नैतिक सामर्थ्यच संघ गमावून बसलेला आहे.

प्रवीण तोगडिया आणि तत्सम 'साधुपुरुषां'ची भाषणं आणि 'विचार' ऐकताना वाटतं की, यांच्या हातात देश आला तर पुरुषांना शेंडी आणि स्त्रियांना तोंडावरून पदर हे अपरिहार्यच करतील! बाकी बंधनं वेगळी. भारतीय जनता पक्ष केंद्रात सत्तेवर

येऊनही मुस्लिम प्रश्नाबाबत काहीही करू शकला नाही याचं कारण मुस्लिम प्रश्नाबाबत संघपरिवाराची पराकोटीची वैचारिक विसंगती आणि गोंधळ हेच आहे. आणि हा गोंधळ संघस्थापनेपासूनचा आहे.

संघाला विधायक टीकेचं वावडं नाही, अशी अफवा संघाकडून वारंवार प्रसृत करण्यात येते. परंतु जेव्हा जेव्हा संघावर टीका केली जाते तेव्हा तेव्हा संघातले ढुड्ढाचार्य 'बाबा वाक्यं प्रमाणम्' चा जप करत कालचीच 'री' आज ओढतात आणि टीका करणारा संघ स्वयंसेवक असेल तर त्याला संघाबाहेर ढकलतात. संघाबाहेरील असेल तर त्याचा दीर्घद्वेष करतात. मुस्लिम प्रश्नाबाबत संघाच्या या धोरणामुळे संघाची अवस्था अशी झालीय की संघाच्या निकडतक्त्यावरचा पहिलाच प्रश्न त्यांना किंचितही सोडवता आलेला नाही. बाकी प्रश्नांचं तर दूरच!

मुस्लिम प्रश्नाचं मूळ संघाला नेमकं कळलंच नाही हे संघाचं दारुण अपयश मानायचं की संघ तरीही वाढला हे यश मानायचं?

■

सामना *(दसरा-दिवाळी)* २००४

# बाई, बाजार आणि पॉलिटिक्स ऑफ सेक्स

"आता समाजामध्ये पूर्वीसारखी स्थिती राहिली नसून स्त्रीला कौटुंबिक आणि सामाजिक बाबींमध्ये, निर्णयप्रक्रियेमध्ये महत्त्वाची जागा आणि महत्त्वाचं स्थान मिळू लागलेलं आहे,'' हे वाक्य अगदी सहज पटण्याजोगं आहे. पण त्याची व्याप्ती आणि खोली जितकी दिसते तेवढी वरवरची व सोपी नाही. मुळात बाई ही कित्येक शतकं 'वस्तू' मानली गेलेली होती व आहे. 'सेक्स' शी संबंधित असणारा तिचा 'उपयोग' हा सर्वात महत्त्वाचा व निर्णायक मानला गेलेला होता व आहे. 'सेक्स'शी संबंधित म्हणजे त्यात अगदी प्रजोत्पादनही येतं. याचा अर्थ आपण उलगडून पहायचा ठरवला तर ते फार विचित्र दिसतं. मुलगी वयात यायला लागली की, तिचं मार्केटमध्ये एक अस्तित्व जाणवायला / समजायला / काचायला / खुपायला लागतं. 'मार्केट'मध्ये असं लिहिताना, कुटुंबसंस्थेपासून ते लग्नसंस्थेपर्यंत आणि सामाजिक व्यवहारांपासून *(ज्यात जाहिराती, चित्रपट इत्यादीही येतात)* राजकीय क्षेत्रापर्यंतच्या सर्व व्यवहारांमध्ये एक मार्केट असतंच; हे गृहीत आहे.

*आणि ते मान्य व्हायलाही काही हरकत नाही. जर आपण दांभिकपणे विचार करणार नसू तर!)* या बाजारात बाईचं नव्वद टक्के अस्तित्त्व हे लैंगिक आहे. आणि म्हणून ते पुरुषकेंद्री आहे. आपण उलट्या बाजूने ही बाब अधिक नीट व स्पष्टपणे पाहू शकतो. पुरुष जन्माला आल्यापासून मरेपर्यंत घटना क्रमाक्रमाने कशा घडतात? पुरुष वयात आला की, त्याला आता समज येईल, तो कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडायला सक्षम होईल ही गोष्ट नीट विचारात घेतली जाते. नंतर पुरुषाच्या बहराच्या वयात तो आपल्या करियरच्या बाबतीत किती दूरवर गगनाला गवसणी घालतो याची मोजमापं घेतली जातात. उतारवयात पुरुषाच्या निवृत्तीचा आणि त्याने आपल्या अनुभवांचा इतरांना उपयोग देण्यासंबंधीचा विचार होतो. पण स्त्रीच्या बाबतीत काय होतं? वयात येताना तिच्यातही पुरुषाप्रमाणेच काही लैंगिक बदल होतात. पण हे बदल पुरुषाच्या बाबतीत त्या या समज व आकलनापेक्षा गौण मानले जातात. स्त्रीच्या बाबतीत हे लैंगिक बदल हीच तिची ओळख बनते. तिचं सगळं वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्य अचानक 'पाळी येणं' याभोवती फिरू लागतं. घरात वडीलधारी मंडळी 'स्वत:ला जपायला शिक' असा पाढा तिला शिकवतात. तर टीव्हीवर सुरु असलेल्या सॅनिटरी नॅपकीनच्या जाहिराती जणू तिच्या आयुष्यातल्या लैंगिक पेचावर आपापल्या तऱ्हेने आणि पद्धतीने तिला सल्ला देऊ लागतात. कालच्या स्त्रीच्या आणि आजच्या स्त्रीमधला हा बदल वरवर पाहता मोठा आहे. कालच्या बाईला अचानक सगळी बाजारपेठ त्या चार दिवसात तिनं कसं वागावं त्याचा सल्ला देत नव्हती. आजच्या मुलीला वयात येताक्षणी जाणवतं की, तिचं लैंगिक आयुष्य ही तिची 'वैयक्तिक बाब' नसून संपूर्ण बाजारपेठेच्या जिव्हाळ्याचाच तो विषय आहे. मग डोळे आणि मन जसजसं उघडत जातं तसतसं तिला हे जाणवतं की, उत्पादन कोणतंही असो, विकायचं कोणालाही असो, ग्राहक कुणीही असो; आपल्याजवळ असणाऱ्या 'स्त्रीलिंगात' एक' 'अपील' आहे. जे अख्ख्या उत्पादन विक्रीच्या चक्राला अत्यावश्यक आहे. सॅनिटरी नॅपकीन हे तिच्यासाठीच असतं. पण त्याचं 'अपील' हे फक्त तिच्यासाठीच नसतं. सॅनिटरी नॅपकीनच्या जाहिराती, स्त्रीच्या लैंगिक अस्तित्वाचा प्रवेश बाजारपेठेत घडवतात. आपल्याकडच्या बऱ्याच सॅनिटरी नॅपकीनच्या जाहिरातीत आई-मुलीच्या संबंधाची छोटी कहानी असते. हे फार सूचक आहे. आई मुलीला नकळत या बाजारपेठेतल्या तिच्या अस्तित्वाच्या प्रवेशाची जाणीव करून देते. त्या उघडलेल्या बाजारपेठेत तिला अनेक भूमिका अदा करायच्या असतात. त्याची ती सुरुवात असते.

अशा प्रकारची निर्णयप्रक्रियेतील एकच एक नेमकी भूमिका बाईला अदा करायला मिळत नाही. तर एकाच वेळी तिला अनेक भूमिका बजावाव्या लागतात. पण बहुधा ही भूमिका प्रवृत्त करणारीही असते. तीही बदलत असते. उदाहरण ब्लेडचं घ्या किंवा पुरुषांच्या अंडरवेअरचं घ्या! खरेदी करणारा ग्राहक किंवा अधिक अचूक बोलायचं झालं तर उपभोक्ता ग्राहक पुरुष असला तरी अमुक एक ब्रँडच का घ्यावा यासाठी पुरुषाला 'अपील' करते, ती स्त्री! त्या अर्थाने पुरुषाचा बाजारातला सहभाग अगदी नगण्यच म्हणायला हवा. *(अलीकडे तरी तो थोडासा दिसू लागलेला आहे)* स्त्री घरात असो वा पडद्यावर, पुरुषाला ती काय घ्यावं, काय न घ्यावं हे सूचित करते. अपील करते. या सगळ्यात एक फार सूक्ष्म 'पॉलिटिक्स ऑफ सेक्स' असतं. ज्याचा खरा अर्थ असा असतो की, स्त्री 'वस्तू' असते आणि पुरुष 'ग्राहक'. परंतु याचा अर्थ पुरुष ग्राहक या पोझिशनमुळे काही खास अधिकार मिरवतो असं नव्हे. बाजारपेठेत ग्राहकांचे स्थान आणि महत्त्व जे आणि जेवढं असतं ते आणि तेवढंच स्थान आणि महत्त्व पुरुषाला असतं. आता इथे प्रश्न 'स्त्री' च्या 'वस्तू' असण्याचा आहे. यामागचं पॉलिटिक्स ऑफ सेक्स समजून घेतल्याशिवाय या वस्तुस्थितीची नेमकी कल्पना येणार नाही.

आपण गेलं दशकभर स्त्रियांना राजकारणात रिझर्वेशन द्यावं म्हणून भांडतो आहोत. काही प्रमाणात अशा प्रकारचं रिझर्वेशन आपण मिळवलेलंही आहे. परंतु इतर अनेक प्रश्नांप्रमाणेच त्या प्रश्नाचंही मूळ न तपासताच त्यावरील उपाय आपण सुचवत आहोत. *(मग)* या प्रकारच्या रिझर्वेशनमध्ये स्त्रियांच्या आडून पुरुषच आपला अजेंडा चालवताना दिसतात. वेगळ्या प्रकारे विचार केल्यास आपल्याला असं दिसेल की स्त्रीचं निर्णयप्रक्रियेत असणारं जे स्थान आहे तेच आहे. स्त्री कायद्यांची किंवा नियमांची अंमलबजावणी करायला बसते तेव्हा ती कृती वेगळ्या प्रकारे पुरुषकेंद्री होते.

आज घरामध्ये किंव कुटुंबामध्ये बाई निर्णय घ्यायला सक्षम झाली आहे अथवा नाही, या प्रश्नाच्या उत्तराची पार्श्वभूमी अतिशय गुंतागुंतीची आहे. वरवर पहाता मागच्या जमान्यातल्या बाईपेक्षा आजची बाई निर्णयप्रक्रियेत अधिक महत्त्वाची भूमिका बजावताना दिसते आहे. पण हा बाईचा निर्णयप्रक्रियेतील एकच एक असा सहभाग नसतो. पडद्यावर किंव जाहिरातींतून पुरुषाला 'अपील' करून एका निर्णयापर्यंत पोहोचवणारी बाईच असते हे ठीक, पण दुसरीकडे आपल्याला जास्त स्वातंत्र्य मिळाल्याच्या भावनेने भारलेली घरातली स्त्री कुठल्याही निष्कर्षाप्रत येते ती देखील बाजारपेठेच्या प्रभावाबरहुकूमच! म्हणूनच एका अर्थाने बाई ही वस्तूही असते आणि

ग्राहकही!

आता एक महत्त्वाचा प्रश्न उरतो तो हा की, संपूर्ण बाजारपेठेत पुरुषाचं अस्तित्व स्त्रीपेक्षा अधिक उन्नत आहे की शोषकाचं आहे? त्याचं एकच एक ठोस उत्तर देण्याऐवजी अगोदर गुंतागुंतीची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. बाजारपेठेच्या त्या पॉलिटिक्स ऑफ सेक्समध्ये पुरुष हा त्याच्याच उपभोगित्वाचा शिकार आहे. *(आपण ज्याला चंगळवाद म्हणतो त्याचा उगम हा असा होतो.)* ही संकल्पना तशी चमत्कारिक वाटली तरीही ती तशीच आहे हे मानल्यावाचून या निर्णयप्रक्रियेच्या चक्राचं गणित उलगडू शकत नाही. पुरुषाला स्त्रीचा निरंतर उपभोग घेण्याची अनिवार लालसा असते हे या संपूर्ण राजकारणाचं मूलतत्त्व आहे. पुरुषाच्या त्या अनिवार लालसेचा उपयोग बाजारपेठ निरंतर कार्यान्वित रहाण्यासाठी केला जातो. किंबहुना खरेदी-विक्रीचा सारा खेळ हा त्या एका गृहितकाने नियंत्रित केलेला आहे. आता नेमकं त्याच्या उलट नसतं का? हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. म्हणजे स्त्रीलाही ही पुरुषभोगाची लालसा असत नाही का? तर या प्रश्नाचं उत्तर जरी अंशत: 'हो' असं आलं तरी त्या लालसेचा रेटा बाजारपेठेच्या निर्णयप्रक्रियेला धक्का देण्याएवढा सक्षम असत नाही. त्यामुळे पॉलिटिक्स ऑफ सेक्समध्ये त्या लालसेचं सत्ता म्हणून काहीही अस्तित्व असत नाही. याचा सरळ अर्थ असा की, पुरुषाला स्त्रीसंबंधी वाटणारी लैंगिक लालसा ही बाजारपेठेच्या दृष्टीने उर्जा असते आणि पुरुषाला त्या उर्जेद्वारेच त्याच्या लालसेचा दास बनवण्याच्या धडपडीत बाजारपेठ सातत्याने कार्यरत असते. स्त्रीला पुरुषासंबंधी वाटणारी लालसा ही केंद्रिभूत न झाल्याने ती बाजारपेठेसाठी उर्जास्त्रोत बनू शकत नाही. या अखंड प्रक्रियेत मानवी आयुष्यात अजिबातच गरजेच्या नसणाऱ्या किंवा तुलनेने कमी गरजेच्या असणाऱ्या अनेक उत्पादनं पुरुषाचं कुटुंबव्यवस्थेतील 'कर्ता' हे जुनं स्थान अबाधित ठेवतात. एवढंच नव्हे तर अधोरेखित करतात. वस्तू विकत घेण्याची क्षमता असलेला, क्रयशक्ती असलेला, बाहेर पडून पैसे निर्माण करणारा अशी पुरुषाची प्रतिमा आजही कायम आहे. आजची स्त्री मिळवती झाली म्हणून बाजारपेठ तिची 'कर्ती' अशी प्रतिमा निर्माण करायला नाखूष असते. आय. सी. आय. सी. आय. च्या क्रेडिट कार्डची जाहिरात पहा. हल्ली स्त्रीकडे क्रेडिट कार्ड असणं ही किती स्वाभाविक आणि सहज गोष्ट झालेली आहे. परंतु जाहिरातीतला पुरुष क्रेडिट कार्डधारक आहे. आणि त्याची बायको मुलं खरेदीसाठी बाहेर पडल्यावर त्याला त्याचं क्रेडिट कार्ड वापरण्यासाठी विनवतात. त्यातून त्याची 'पत' असल्याचं दिसतं. बाजारपेठेचा परिणाम आपल्या अबोध मनावर असाधारण असतो. त्यामुळे बाजारपेठेशी प्रत्यक्ष संबंध नसणारे निर्णय घेतानाही स्त्रीचा

विचार हा नकळत पुरुषकेंद्री होत जातो. त्यामुळे पुरुषाचा काही फायदा होतो असं नव्हे. पण वस्तुस्थिती त्याला केंद्रस्थानी ठेवून गुंफली जाते. बाजारपेठ स्त्रीची प्रतिमा मिळवती / कर्ती अशी करायला नाखूष असल्यामुळे तिच्या; लालसा निर्माण करणाऱ्या लैंगिक अस्तित्वाला धक्का बसतो. पुरुषाला प्राप्त होणाऱ्या लालसेमध्ये स्त्रीचा समावेश; तिच्या त्याच्यावरच्या अवलंबित्वाच्या प्रतिमेमुळे कित्येक पटीने वाढतो. अशा वेळी स्त्रीच्या प्रत्यक्ष अवलंबित असण्या-नसण्यामुळे तिच्या अवलंबित्वाची प्रतिमा हीच बाजारपेठेसाठी सत्ताकेंद्र असते. त्या सत्ताकेंद्राला धक्का लावणं हे स्त्रीलाही नको असतं. आपल्या लैंगिक अस्तित्वाच्या लालसेने पुरुषाची होणारी फरफट हीच स्त्रीची खरी लालसा असते. स्त्रीच्या बाबतीत प्रत्यक्ष पुरुषाच्या लालसेपेक्षा ती कित्येकपट अधिक बलवान व उर्जास्त्रोत निर्माण करणारी असते. वेगळ्या पद्धतीने *(अप्रत्यक्षपणे)* पुरुषाचं शोषण केल्याचं स्त्रीला मिळणारं समाधान हे प्रत्यक्ष निर्णयशक्ती राबवण्यापेक्षा अधिक प्रभावी असतं. बाजारपेठेने अबोध मनावर केलेले संस्कार हे अशा तऱ्हेने कामी येतात. परंतु हे केवळ बाजारपेठेने केलेले संस्कार असत नाहीत, तर यामागे प्रेरणांचा आदिम झगडाही आहे. प्रत्येक मादीला आपण उपभोगावं, प्रत्येक नर आपल्या तालावर नाचावा, ही आदिम, रासवट पण वास्तव प्रेरणाही या बाजारपेठेच्या आणि अगदी आपल्या वैयक्तिक आयुष्यांनाही संचालित करते. बाजारपेठ असा उल्लेख जेव्हा आपण करतो, तेव्हा ती कुणा किंवा काही भांडवलशहा किंवा सरकारांचा जिव्हळाविषय असत नाही, तर बाजारपेठासुद्धा आपल्या घरांप्रमाणेच आपण स्त्री-पुरुषच संचालित करत असतो.

पॉलिटिक्स ऑफ सेक्स ही एक अशी संकल्पना आहे जी आपल्याला स्त्रीच्या लवचिक निर्णयप्रक्रियेचं रहस्य विस्तृतपणे समजून घ्यायला मदत करते. 'पुरुष शोषक व स्त्री शोषित' हे ढोबळमानाने खरं वाटणारं मानक निर्णयप्रक्रियेच्या या गुंत्यात थिटं आणि फिकं पडतं. पुरुषाला शोषक मानण्याने किंवा स्त्रीला शोषित मानल्याने आपल्याला सामाजिक निर्णयप्रक्रियांचा वास्तविक बोध होत नाही. कारण सत्ताकेंद्राचा संघर्ष सतत चालू असतो. हा संघर्ष गोलाकार असतो. एखाद्या चक्राकार साखळीसारख्या स्त्री आणि पुरुषातील या लैंगिकतेच्या राजकारणातील संघर्ष जेव्हा संकुचित होतो, तेव्हा स्त्रीचं शोषण होतं. पण ही त्या संघर्षाची कायमची स्थिती कधीच असत नाही. हा संघर्ष विशालतेकडे प्रसरण पावतो तेव्हा तो सामाजिक अभिसरणाचं स्वरूप धारण करतो. ज्यात पुरुषाचंही सतत शोषण होत असतं. पुरुषाची लालसा हा या चक्राचा मूलाधार असल्याने या शोषणालाही गर्वाने मिरवण्याची वेळ

पुरुषावर येते. त्यामुळेच स्त्रीचं निर्णयप्रक्रियेतील स्थान वाढलं आहे, किंवा कमी झालं आहे, या वाक्यांना काहीही अर्थ नसून एका सातत्यपूर्ण संघर्षात ती एका वळणावर आहे, जे वळण मानवी संस्कृतीत अपरिहार्य आहे असं म्हणता येईल. असं म्हणताना निर्णयांपेक्षा लालसा नेहमीच सातत्य राखते हे लक्षात ठेवलं म्हणजे पुरे!

■

अनुभव *(मार्च २००३)*

# कार्यक्षमता आणि नैतिकतेचा प्रवास

नैतिकतेचा आणि कपड्यांचा काय संबंध आहे?

तरीही कपड्यांबाबतचा विचार हा नैतिकता आणि अनैतिकतेची पातळी अधोरेखित करतो. खरं तर कपडे ही शरीराची सोय असते. निसर्गापासून स्वत:च्या संरक्षणासाठी माणसाने निर्माण केलेला तो एक मार्ग असतो. कपड्यांचा नैतिकतेशी असा प्रत्यक्ष संबंध येणे हे तार्किकदृष्ट्या मोठे गमतीशीर वाटते. पण तो तसा आपण आणलेला आहे. याचे अत्यंत मुळातले कारण मानवाच्या *(लैंगिक)* मूलप्रेरणा आहेत. कपडे आणि नैतिकता ह्या मूळातच आपल्या *(लैंगिक)* मूलप्रेरणांशी बांधल्या गेलेल्या गोष्टी आहेत. हे एक प्रकारचे कन्डीशनिंग आहे. मानवी उत्क्रांतीमधल्या ह्या अशा प्रकारच्या कन्डीशनिंगचा विचार केल्याशिवाय नैतिकता आणि कार्यक्षमता ह्या विषयाचा विचार करता येणे शक्य होणार नाही.

'नैतिकता आणि कार्यक्षमता' असा विचार जेव्हा होतो तेव्हा ह्या दोन्हीमध्ये अपरिहार्यपणे काही संबंध असल्याचे गृहीत आपण धरल्याचे स्पष्ट होते. हा संबंध

आजच्या संदर्भातही गृहीत धरल्याचेही स्पष्ट होते. 'नैतिकता आणि कार्यक्षमता' ह्यांच्यामध्येही आज जो काही संबंध आहे त्याच्यामागे मानवी उत्क्रांतीच्या संपूर्ण प्रवासाचा आधार आहे हे आपण लक्षात घेऊन पुढे पाहायला हवे. होमो इरेक्टस मानवाची नैतिकता ही आजच्या औद्योगिक मानवाच्या नैतिकतेहून भिन्न होती वा नाही ह्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी येते व ते उत्तर पुढच्या अनेक प्रश्नांची उत्तरे सोडवणारे असते. कार्यक्षमता *(Driving force या अर्थाने)* मानवाच्या मूळ प्रेरणांतून आलेली (ज्यामध्ये लैंगिक प्रेरणा सर्वांत महत्त्वाची) एक अभिव्यक्ती आहे; तर नैतिकता हा मानवाच्या कार्यक्षमतेचा सामाजिक परिणाम आहे. एका अर्थाने, कार्यक्षमता आणि नैतिकता दोन्हीही मानवाच्या मूलप्रेरणांशी संबंधित आहेत. पैकी पहिली म्हणजे कार्यक्षमता शारीरिक व मानसिक अर्थाने, तर दुसरी म्हणजे नैतिकता ही सामाजिक अर्थाने कार्यक्षमतेतला जो Driving force अभिप्रेत आहे तो सकारात्मक असो किंवा नकारात्मक असो, प्राणिमात्राच्या प्रबळ *(लैंगिक)* मूलप्रेरणांशिवाय अशक्यच आहे. असतो. मग त्या प्रेरणेची अभिव्यक्ती काळ आणि व्यक्तीच्या संदर्भात वेगवेगळ्या प्रकारेच होत रहाते. पण त्या अभिव्यक्तीतून *(लैंगिक)* मूलप्रेरणेशी नाळ जोडणारी प्रदर्शनवादी प्रवृत्ती *(स्थूल वा सूक्ष्म, सकारात्मक वा नकारात्मक रूपात)* स्पष्ट झाल्याशिवाय रहात नाही. व्यक्तीची कार्यक्षमता ही प्रदर्शनवादी प्रवृत्तीतूनच अभिव्यक्त होत असते, जिथे *( व ज्यामुळे)* तिचा समाजाशी संबंध येतो. व्यक्तीच्या ह्या प्रेरणांचे सामूहिक परिणाम दिशादर्शक करण्यासाठी मानवाने अनेक प्रयत्न केलेले आहेत. मानवाच्या ह्या *(लैंगिक)* मूलप्रेरणांची *(समाजशास्त्रीय अर्थाने)* जडणघडण करण्याच्या प्रयत्नातून अनेक समाजशास्त्रीय संकल्पनांचा जन्म होतो. 'नैतिकता' ही अशीच एक संकल्पना आहे. लक्षात घेण्याची महत्त्वाची गोष्ट म्हणजे कार्यक्षमतेच्यामागे जी मूलप्रेरणा असते तिच्या जोरावरच होमो इरेक्टसने आजच्या औद्योगिक लोकशाहीत जगणाऱ्या मानवापर्यंत मजल मारलेली असते. किंबहुना कार्यक्षमतेच्या ह्या नग्न मानसिक व शारीरिक प्रवासातच नैतिकतेच्या संकल्पनेचा जन्म होत असतो आणि वारंवार तिच्यात बदल होत असतो. त्यामुळे मुळामध्येच नैतिकता ही कार्यक्षमतेपुढे दुय्यम महत्त्वाची ठरते. पण नेहमीच ती तशी असत नाही. आपण ज्या अर्थाने नैतिकता हा शब्द वापरतो तो सामाजिक मान्यता असलेल्या संकल्पनेचा भाषिक आविष्कार असतो. त्या अर्थाने नैतिकता ही एक कृतक गोष्ट आहे असे मी मानतो. कारण अशी नैतिकता केवळ प्रेरणांबाबत दिशादर्शक असे भाष्य न करता उच्च-नीचतेविषयी, वर्गाविषयी व तत्संबंधीच्या हितसंबंधाविषयी दिशादर्शक असे भाष्य करू लागते. अशा

प्रकारच्या नैतिकतेचा कार्यक्षमतेवर असणारा अंकुश हा सृजनशाली कमी व व्यवस्थीय जास्त असतो, त्यातून मानवी समाजाचे हित कमी आणि ठराविक वर्गाचे *(समाजगट वर्ण, वर्ग, लिंगाप्रमाणे वेगवेगळे)* हितसंबंध जास्त जपले जातात. थोडे सोपे करून सांगण्याकरता उदाहरण द्यायचे झाले तर नैतिकतेच्या व्यवहाराबाबत बोलताना भ्रष्टाचार हा शब्द नेहमीच आपण वापरतो. एका अर्थाने भ्रष्टाचार हा शब्द अनैतिक ह्या शब्दाच्या समान अर्थाने वापरला जातो. एखादा माणूस कार्यक्षम आहे, परंतु भ्रष्ट आहे, असे म्हटले जाते तेव्हा तो माणूस व्यवहारात कार्यक्षम परंतु, अनैतिक ह्या वर्गात मोडत असतो. पण समाज लिंगभेदावर आधारित नैतिकता ही संकल्पना प्रस्थापित करत असतो तेव्हा त्या समाजात एखाद्या स्त्रीवर पुरुषाने बलात्कार केला तर भाषा त्या स्त्रीला अमुकतमुकने भ्रष्ट केले असे म्हणेल. अमुकतमुक पुरुषाचा प्रयत्न यशस्वी झाला नसेल तर त्या स्त्रीला अमुकतमुकने भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला असे म्हटले जाईल. आता लैंगिक व्यवहारामध्ये पुरुष स्त्रीला नैतिक व अनैतिक असण्याचे स्वातंत्र्य देऊ वा घेऊ शकतो ह्या मूळ मानवी प्रेरणांमध्ये नसलेल्या विषमतावादी तत्त्वाचा समावेश नैतिकतेमध्ये होतो. कार्यक्षमतेला त्या त्या व्यवस्थेच्या हितसंबंधानुरूप नैतिकतेची चौकट घातली जाते. ती कोणत्या समाजासाठी किती योग्य हे जो तो समाज ठरवतो. परंतु ह्यामध्ये इथे मला स्वत:ला परिसंवादाचा विषय म्हणून आणि एकंदरीतच व्यक्तीच्या बाबतीत अधिक Concern वाटतो.

व्यक्तीचा विकास किंवा ऱ्हास त्याच्या सातत्यपूर्ण कार्यक्षमतेवर ठरतो. पर्यायाने समाजाचा विकास किंवा ऱ्हास हा व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर ठरतो. ह्या कार्यक्षमतेला नैतिकतेची अशी चौकट घालणे हे मला सर्वथैव अयोग्य वाटते. ह्याचा लगेचच अर्थ अनैतिकतेला माझी मान्यता असून माझा भर फक्त कार्यक्षमतेवर आहे, असे मुळीच नव्हे. नैतिकतेप्रमाणेच कार्यक्षमतेबाबत आणि ह्या दोन्हींच्याबाबत एकत्रितपणे बरेच भ्रम आपण कन्डीशनिंगने *(Conditioning)* बाणवलेले आहेत. आपण ज्या अर्थाने कार्यक्षमता हा शब्द वापरतो आणि त्या कार्यक्षमतेतून नैतिकता-अनैतिकता वेगळी योजतो त्यालाच माझा गंभीर आक्षेप आहे. कार्यक्षमता हा शब्द व्यक्तीचा Driving force ह्या अर्थाने आपण फारच थोड्या वेळा वापरतो. बहुतांशी हा शब्द आपण विशिष्ट व्यवस्थेच्या संदर्भात वापरतो. ह्या परिसंवादाच्या निमित्ताने जे टिपण बनविण्यात आलेले आहे त्यातही हा शब्द व्यवस्थेच्या संदर्भातच योजलेला दिसतो. उदा. मुख्यमंत्री राज्याचा गाडा हाकताना कार्यकुशलता दाखवतात त्याच वेळी साध्याबाबत साधनशुचिता बाळगत नाहीत. किंवा पंजाबात अतिरेक्यांना वठणीवर

आणणाऱ्या उच्च पोलीस अधिकाऱ्याच्या वैयक्तिक वर्तणुकीबाबत अनेक प्रवाद असतात वगैरे. मला वाटते, अशा प्रकारे व्यवस्थेच्या संदर्भात जी 'कार्यक्षमता' आपण म्हणतो हीच मुळात भ्रष्ट अर्थाची कार्यक्षमता असते. तिच्या मूळ Driving force पासून अलग होऊन ती सृजनात्मक न उरता व्यवस्थीय बनलेली असते आणि व्यवस्थीय असल्यानेच तिच्या संदर्भात अशा वेगळ्या नैतिकतेचा विचार करावा लागतो. कार्यक्षमता ही शुद्ध प्रेरणेतून आलेली अभिव्यक्ती असेल तर ती स्वत:चा विवेकही घेऊन येत असते. मूळ प्रेरणेतूनच हा विवेक येत असतो. अशी प्रेरणा मूलत:च अविवेकी असल्याचे संपूर्ण प्राणिमात्रात उदाहरण सापडत नाही. कन्डिशनिंगला सरावलेला मानव वगळता इतर प्राणी त्यांच्या शुद्ध प्रेरणांनुसार वागताना दिसत नाहीत. कारण शुद्ध प्रेरणांमध्ये विवेकाची नियमबद्धता अपरिहार्य असते. ही विवेकाची नियमबद्धता प्रत्येक व्यक्तीमध्ये असतेच. *(मानसिक तोल ढळलेल्यांचा अपवाद वगळता)* ह्या कार्यक्षमतेबरोबर अंगभूत असलेल्या विवेकापलीकडे एक नैतिकता व्यवस्थीय कार्यक्षमतेच्या बाबतीत उभी केली जाते. मुळात अशा प्रकारच्या कार्यक्षमतेतच अनैतिकता अंतर्भूत असते. त्याही पलीकडची जी अनैतिकता अशा प्रकारच्या कार्यक्षमतेशी जोडली जाते, ती तिच्या संदर्भातल्या बाह्य नैतिक संकल्पनातूनच उगम पावत असते.

फुटीरतावादी चळवळ क्रूरपणे मुळातूनच दडपून टाकणारा उच्च पोलीस अधिकारी त्या व्यवस्थेतल्याच एका महिला अधिकाऱ्यांशी लैंगिक चाळे करू पाहतो. तेव्हा त्याच्या कार्यक्षमतेबरोबरच नैतिकतेचाही प्रश्न आपण उभा करतो. परंतु माणसांच्या आयुष्याशीच संबंधित असलेली चळवळ जेव्हा तो दडपत असतो, तेव्हा काय फक्त तो त्याच्या कार्यक्षमतेचाच प्रश्न असतो? खरं तर तेव्हाही त्याची कार्यक्षमता हाच मुळात एक अखंड नैतिकतेचा प्रश्न असतो. पण ती कार्यक्षमता एका व्यवस्थेच्या संदर्भात असते व ती व्यवस्था आपल्या सोयीची आहे असे आपण आपले कन्डीशनिंग करून घेतलेले असते. म्हणून आपण त्याची कार्यक्षमता हा नैतिकतेचा प्रश्न बनवूच शकत नाही. वर मी जे नैतिकतेबाबतचे भ्रम आपण निर्माण करतो असे म्हटले आहे त्याचे हे उदाहरण. बाह्य नैतिकता हा इथे शुद्ध सोयीस्करवाद आहे व तसा तो असतोच. एखादा कार्यक्षम मुख्यमंत्री पैसे खातो किंवा काही असामाजिक तत्त्वांना मदत करतो, तेव्हा तो कार्यक्षम असण्याबरोबरच नैतिक आहे वा नाही हा प्रश्न निघतो. पण तो मुख्यमंत्री म्हणून कार्यक्षम असतो म्हणजे काय? ह्याचा आपण फार थोडा विचार करतो. कारण असा विचार करण्यात त्याचे 'कार्यक्षम' असणे हेच काही

अनैतिक असते का ह्या सत्याचा *(अधिक)* शोध लागण्याचा धोका असतो. नेमका तोच धोका आपण सातत्याने टाळण्याच्या प्रयत्नात असतो.

स्वत:च्या मूळ प्रेरणांमध्ये जो उपजतच विवेक असतो *(त्या विवेकाचा उगम हा बराचसा निसर्ग व मानव यांच्या संबंधातून होतो)* व जो उत्क्रांत होत जातो, एका अर्थाने त्या विवेकाच्या नियमबद्धतेला शुद्ध नैतिकता असे म्हणता येईल. पण ती अशी नैतिकता प्रत्येक व्यक्तीच्याबाबत त्याची स्वत:ची असेल. त्या अर्थाने गांधीजी शुद्ध नैतिकतावादी मानता येतील. आयुष्याच्या एका टप्प्यावर ते जेव्हा प्रयोग म्हणून नग्नावस्थेत मनूबरोबर एकाच बिछान्यावर झोपत तेव्हा त्यांच्या स्वत:च्या उपजत विवेकाची परमावधी दिसून येते. त्यांनी सोयीस्कर नैतिकतेचा किती कठोरपणे मुकाबला केला हे दिसून येते. मुळात समाजासाठी नैतिकता म्हणजेच बाह्य नैतिकता हीच एका प्रदर्शनवादी वृत्तीचे प्रतीक असते. सोयीस्कर नैतिकता वरवर पहाता नियमबद्ध वाटली तरी तिचा नियमबद्धतेशी काहीही संबंध नसतो. कारण आपण अशा प्रकारे नैतिकता हा शब्द हाच प्रतिकांबरोबर जोडलेला असतो. नैतिकता म्हणताना आपल्या मनात खूप खोलवर कुठेतरी प्रतीक *(Role models)* लपलेली असतात. गांधीजी, स्वामी विवेकानंद वगैरे. फारसे विश्लेषण न करता आपण ती प्रतिके वापरत रहातो. मुख्यमंत्री, पोलीस अधिकारी वगैरेंवर त्याचे प्रयोग करतो. आपल्यासारखा समाज हे अत्यंत बेबंदपणे करतो. मुळात मुख्यमंत्री किंवा व्यवस्थेतले अधिकारी यांची कार्यक्षमता ही त्यांची नैसर्गिक सृजनात्मक प्रेरणा नसते. ती एक व्यवस्थेच्या संदर्भातली गोष्ट असते. याउलट प्रतिके, मग ती गांधींची असोत वा विवेकानंदांची – नेमकी उलट असतात. त्यांच्यासारख्या प्रतिकांची कार्यक्षमता सृजनात्मक सहजसुलभ असते. व्यवस्थेशी तिला काही देणेघेणे नसते. बऱ्याचदा प्रचलित व्यवस्थेशी संघर्षच येतो. *(येतोच किंवा आलाच पाहिजे असे नव्हे.)* अशा प्रतिकांच्या कार्यक्षमतेतूनच त्यांची शुद्ध नैतिकता उगम पावत असते. बाह्य सोयीस्कर नैतिकतेचे काही देणेघेणे नसते. गांधीजींचे उदाहरण मी घेतलेच आहे. विवेकानंद मांसाशन व तंबाखू सेवन करीत असत. ही कृती बाह्य सोयीस्कर नैतिकतेमध्ये *(संन्याशासाठी योजिलेल्या)* प्रतिकांमधून दृग्गोचर होणारी नव्हती. अशा प्रकारे जेव्हा आपण प्रतिके वापरून व्यवस्थीय अनैतिकतेला कार्यक्षमता व नैतिकतेमध्ये बसविण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आपण एका बद्ध अशा पतित संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करत असतो. ज्या संस्कृतीची सृजनशील विद्रोहाची परंपरा कुंठीत झालेली असते.

व्यवस्थेतही नैतिकता पाळणारी परंतु कार्यक्षमतेत संपूर्णपणे कमी पडणारी

माणसे आपल्याला आढळतातच, हा ह्या संदर्भात केला जाणारा अजून एक युक्तिवाद. नैतिकतेच्या संदर्भातलं जे विवेचन वर येऊन गेलेले आहे, त्या विवेचनाला हा युक्तिवाद बळकटीच आणतो. मुळात बाह्य नैतिकतेचे रोपण करून घेण्याकरता, बाह्य नैतिकताविरोधी जी तत्त्वे आहेत, त्यांचा अंगीकार न करणे ही अशा उदाहरणांची पहिली अट असते. बाह्य नैतिकतेतील प्रतिकबद्धता ही अशा व्यक्तींना ह्या व्यवस्थेत कार्यक्षमताविरोधी बनवते. कारण ह्या व्यवस्थेतील कार्यक्षमतेतच अनैतिकतेची बीजे दडलेली असतात. असे बाह्य नैतिकतेच्या प्रतिकांवरूनही प्रतित होते. त्यामुळे व्यवस्थेतल्या ज्या व्यक्ती नैतिक व अकार्यक्षम असतात, त्या मंडळींबाबत तथाकथित *(बाह्य)* नैतिकता हीच प्रदर्शनवादीपणाचे एकमेव साधन बनते. त्यांची नैतिकता ही शुद्ध स्वरूपाची नसते. कारण ते ज्या नैतिकतेचे आचरण करतात, तो त्यांच्या कार्यक्षमतेतून विकासणारा विवेक नसतो, तर ती एक उधारस्वरूपाची जीवनपद्धती असते. स्वत:च्या मूळ प्रेरणेतून येणारी कार्यक्षमता आणि त्यातून येणारा नियमबद्ध विवेक असणाऱ्या व्यक्ती ह्या परिसंवादाच्या विषयाबाहेर जातात. व्यवस्थेच्या संदर्भात कार्यक्षम आणि त्यामुळेच अनैतिक असणाऱ्या व्यक्ती समाजाचे स्थितीवादी स्वरूप दैनंदिन व्यवहारात वेगवानपणे पुढे नेत रहातात. पण अशा व्यक्ती मानवी उत्क्रांतीत फारच थोडी भर घालतात. किंबहुना बऱ्याचदा त्या उत्क्रांतीविरोधीच असतात. पण ज्या व्यक्ती बाह्य नैतिकतेचा प्रदर्शनवादीपणाचे साधन म्हणून स्वीकार करतात, त्यांच्या त्या सृजनशाली प्रेरणा ह्या निर्बिज झालेल्या असतातच. पण ह्या कृतक व नकली जीवनपद्धतीतून व्यवस्थेसंदर्भातील कार्यक्षमतासुद्धा अशा व्यक्ती गमावतात. एक अनैसर्गिक, रोगट, कृतक व ढोंगी संस्कृती अशा व्यक्ती आपल्या जीवनाच्या रूपाने स्रवत असतात.

उच्चायुक्त, सरन्यायाधीश, कुलगुरु ह्या पदावर पोहचून समाजाच्याच कलाने, समाजातील रूढ नैतिकतेची जी सरधोपट व्याख्या असते. त्याच्यासमोर मान तुकवणाऱ्या अशा व्यक्ती आपण समाजात सर्वत्र पहातो. अशांच्या मुखातून व लेखणीतून गांधी, कबीर, विवेकानंदच बाहेर पडतात! त्यांच्या पद्धतीत ठार अभाव असतो तो जाणण्याचा. (Knowingness) चा खरं तर ते जगलेलेच नसतात. मानवाच्या सुखदु:खावर, भोगांवर त्यांचे भाष्य हे कोरडे व अजाण असते, ते त्यामुळेच. समाजमनाच्या सर्व मर्यादा जाणूनसुद्धा हे मान्य करायलाच हवे की, त्यांच्याकडे पाहून समाजमनालाही प्रश्न पडतो की, हे जे बोलताहेत ते अंमलात का आणत नाहीत? त्याचे उत्तर खरे तर सोपे असते. त्यांचे जगणं हे फक्त उधार प्रदर्शन

असते. प्रदर्शनांनी मानवी संस्कृतीत जेवढी भर घातलेली आहे, तेवढीच ते घालू शकतात.

'नैतिकता आणि कार्यक्षमता' ह्या बाबतीत आपण जो विचार करतो, व्यक्त करतो तोसुद्धा उधार असतो. मूलत: मानवी उत्क्रांतीतील, तत्त्वप्रवासातील हा गुंतागुंतीचा विषय समजून घेण्याची संस्कृती आपण गमावलेली आहे. फार पूर्वी उपनिषद काळात नीतिशास्त्रावरही मानवी मनाच्या संदर्भात आपल्या समाजात विचार होत असे. पण ही चित्रे आता फार धूसर आणि फिकट झालेली आहेत. बऱ्याच प्रमाणात दिसतही नाहीत. गेल्या काही शेकडो वर्षात जगातील इतर समाजगटांची ह्या बाबतीत नुसता विचार करण्याची प्रगती जरी पाहिली तरी आपली मजल ही काऊचिऊच्या गोष्टीइतकी सामान्य आहे. उठसूठ नैतिकतेवर बोलणाऱ्या समाजाच्या नैतिकतेचाच हा प्रश्न आहे. अधिक करून म्हणजे बौद्धिक कार्यक्षमतेचा हा अधिक प्रश्न आहे.

केवळ तेवढ्यामुळेसुद्धा ह्या विषयावर लिहिताना अपराधीपणाचे वाटते.

■

दिपावली *(दिवाळी)* १९९५

# मराठी साहित्याचे धागे : उभे आणि आडवे

आजच्या साहित्यावर आणि साहित्यिकांवर इतक्या कमी शब्दात लिहिणे खूपच कठीण आहे. खरं तर एखाद्या साहित्यिकावर किंवा त्याच्या एखाद्या कलाकृतीवरसुद्धा एवढ्या कमी शब्दात लिहीणे खूपच चुकीचे आहे. कारण विश्लेषणाऐवजी तुम्हाला निरीक्षणं मांडत रहावी लागतात. हे ज्यांच्यावर लिहिले जाते त्यांना अन्यायाने वाटू शकते. त्यामुळे एकंदरीतच साहित्याबद्दल मी काही मुद्दे मांडणार आहे. जे मुद्दे मला आज अस्वस्थ करतात तेवढेच मांडावयाचे, असे मी ठरवलेले आहे. कलेच्या बाबतीत 'अस्वस्थ' करणारे मुद्दे चांगल्या अर्थाने 'अस्वस्थ' करणारे पण असू शकतात. पण फक्त 'चांगल्या अर्थानेच' एवढेच ते मर्यादित नसते हे पण खरे.

साहित्यामध्ये खरे तर जुने-नवे असे काही नसते. जसे नैतिक-अनैतिक असेही काही नसते. साहित्य फक्त चांगले असते किंवा वाईट असते. ज्ञानेश्वरी, तुकारामांचे अभंग, तेंडुलकरांची नाटके, आरती प्रभूंच्या कविता, विंदा करंदीकरांच्या कविता ह्यातले काहीही कधीच कालचे

होत नाही. कारण हे सर्व साहित्य मानवाच्या आयुष्याला समांतर जाते. लघुकथेच्या प्रांतात मला वाटते, बाबुराव बागुलांच्या काही कथा कधीच कालच्या होणार नाहीत. इतकं त्यातलं अस्वस्थ करणं *(चांगल्या अर्थाने)* अस्सल आहे. काळाच्या अर्थाने आजच्या साहित्यात कायमच 'आजचे' रहाण्याची ताकद कुणात आहे आणि कुणात नाही, हा एवढाच प्रश्न आहे.

लेखन करण्याच्या प्रेरणा बऱ्याचदा त्या त्या काळची सामाजिक आणि राजकीय परिस्थिती ठरवते. साहित्यावर त्याचा प्रत्यक्ष परिणाम दिसला नाही तरीही तसा तो परिणाम होत असतो, होत रहातो. आज स्वातंत्र्यपूर्व काळातला भारलेपणा पूर्णपणे नाहीसा झालेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातला स्वप्नाळूपणाही संपलेला आहे. साठ-सत्तरच्या दशकात उजळलेले असंतोषाचे निखारेही विझून गेल्यासारखे दिसत आहेत. विचार करू शकणाऱ्या *(साहित्य प्रसवणाऱ्या संभाव्य)* मनावर तृप्तीचा एक ओशट तवंग आलेला दिसतो आहे. जगाच्या इतिहासात झपाट्याने झालेला बदल ज्यात, सोविएत साम्राज्याचा पाडाव, जागतिक महासत्तेचं एककेंद्रीकरण, देशात एका अपरिहार्यपणे आलेले आर्थिक उदारीकरण, त्यातून व्यक्तीच्या *(व्यक्तिगत)* महत्त्वाकांक्षीपणाला मिळणारी प्रतिष्ठा ह्या साऱ्याचा आजच्या साहित्यावर परिणाम होताना दिसतो आहे. हा परिणाम चांगला कमी आणि निकृष्ट जास्त आहे.

कविता, कथा, कादंबरी, ललित लेखन, नाटक, समीक्षा लेखन, ह्या सर्व साहित्य प्रकारात आजचे मराठी साहित्य आत्मग्लानीच्या भोवऱ्यात अडकलेले दिसते आहे. मी मराठी *(आणि इतर भाषातीलही)* कवितेचा श्रद्धाळू वाचक आहे. मी स्वत: कवितेला सर्वात शुद्ध आणि साहित्य-प्रवाहाचा मापक ठरू शकेल असा घटक मानतो. मर्ढेकर, करंदीकर, प्रभू, किंवा अगदी तुकारामानेसुद्धा देशीवाद आणला की विदेशीवाद, ह्यापेक्षाही त्या त्या कवींच्या कविता वाचताना, त्यांच्या काळाचा एक छेद समजून घेता येतो. त्यांच्या काळात समाजमनामध्ये धगधगत असलेली अस्वस्थता वेगवेगळ्या पातळ्यांवर त्यांनी साहित्यामध्ये प्रतिबिंबित केली. त्यांच्या कविता आजच्या साहित्याला मापकपट्टी म्हणूनही वापरता येतात. हे त्यांचे योगदान काळातीत आहे. दिलीप चित्रेंनी स्तुती केल्याने मोठा होईल एवढा सामान्य कवी तुकाराम नव्हता. हे लक्षात न घेता आपण आजच्या कवितेचा विचार करू शकत नाही. आजच्या काळातल्या कवितेचं दुर्दैवी वैशिष्ठ्य म्हणजे, आजची अस्सल अशी कविताच नाही. मौजेच्या सार्वभौमत्वाविरूद्ध *('मौज' हे एक प्रतिक होतंच)* बंडखोरीचं निशाण रोवणाऱ्या *(ज्यांचा सत्यकथेशी संबंध होता!)* अनेक कविता अनेक

अनियतकालिकांमधून लिहिल्या गेल्या. त्या साठच्या *(नि बहुतांशी)* सत्तरच्या दशकातील कवितालेखनाहून अजूनही आजच्या काळातील कविता फारकत घेऊ शकलेली नाही. आपल्या निर्मितीतून चिरंतन असे, आपल्या अस्तित्वाहून वेगळे असे अस्तित्व निर्माण करण्याची इच्छा आणि ताकद आजच्या मराठी कवितेत दिसत नाही. बंडखोरीच्या काळातही मराठी कवितेची दिशा स्पष्ट नसली तरी तिच्यात आवेग होता. तो काहीसा रोमँटिक होता अन् काहीसा अध्यात्मिक. पण आता त्याच्याहीपेक्षा कमअस्सल कविता लिहिली आणि वाचली जात आहे. आज अशोक नायगावकर किंवा अशोक बागवे आणि त्यांचे सहकारी ज्याप्रमाणे सवंग टाळीबाजपणाची ओढ व लोकानुनायाचा कवितेला ऱ्हासाकडे नेणारा मार्ग *(जो ऱ्हस्वदृष्टीचा आहे)* स्वीकारून काव्यजत्रा भरवत आहेत, त्या प्रकारच्या *(जाहीरपणे 'बंडखोरी' ह्या नावावर वाचल्या जातात त्या)* कवितांमध्ये कोणत्याही प्रकारची प्रयोगशीलता नसून भावनांचे लेझीम अथवा गोंधळ असे त्याचे स्वरूप असते. अर्थात मराठी कवितेला अशी अवकळा येण्यास पूर्वसूरी जबाबदार आहेतच. एकीकडे कवितेविषयक अपरिपक्वतेला लाजविण्यात शंकर वैद्य आपल्या बडबडगीतांना चक्क कविता म्हणून आजही सादर करताना दिसतात. (एकदा तर चक्क 'तारा' चॅनेलच्या उद्घाटनप्रसंगी 'तारा' चॅनेलवरच त्यांनी केलेली 'कविता' ऐकण्याचाही योग आला होता!) तर दुसरीकडे दिलीप चित्रे, नेमाडे आपल्या तथाकथित बंडखोरीचे नेतृत्व तुकारामाकडे देताना दिसतात. त्यांच्या त्या जाणिवपूर्वक कृतीचा अर्थ स्वर्गातल्या जीझसच्या नावावर व्हॅटीकनमध्ये बसून पोपने पृथ्वीचे राज्य चालवण्यासारखा आहे.' कवितेमध्ये वेगळ्याच रितीने वेगळ्याच तऱ्हेचा अध्यात्मवाद असा घुसलेला दिसतो आहे. सभ्यपणे जरी त्याला अध्यात्मवाद म्हटले गेले तरी ती एक बुवाबाजीच आहे. हे लिहित असताना मराठीमध्ये लिहित असलेले अनेक कवी- कवियत्री माझ्या डोळ्यांसमोर आहेत. *(अर्थातच त्यांच्या कवितेच्या अनुषंगाने )* प्रकाश होळकर, हेमंत दिवटे, श्रीधर तिळवे, निरजा, महेश केळुस्कर किशोर कदम... असे कितीतरी. हे सर्वचजण वेगवेगळ्या तऱ्हेने आजच्या मराठी कवितेत आपले योगदान देताना दिसतात. परंतु त्यांच्या काळाचा छेद समग्रपणे पेलण्याची ताकद ते मराठी कवितेला देताना दिसत नाहीत. ही एक मोठीच शोकांतिका म्हटली पाहिजे. आज ज्या कवींच्या कवितांमध्ये मानवी अस्तित्वाच्या बेंबीत बोट घालण्याची ताकद आहे असे तीन कवी मला माहित आहेत. *(कदाचित मला माहित नसणाऱ्यांमध्येही असे काही असतील. ते मला माहित नसणे ही माझी उणीव आहे. त्यांची नव्हे.)* नारायण कुलकर्णी-कवठेकर, उत्तम

कोळगावकर, द. भा. धामणस्कर हे कवी आजही समर्थपणे कविता लिहिताना दिसतात. पण मला त्यांच्याविषयी जी माहिती आहे, त्यानुसार त्यांची वये मागच्या पिढीत जमा करण्याजोगी आहेत. द. भा. धामणस्कर *(वय ७५ +).* पण ते आजची कविता लिहिताना दिसतात. त्यामुळे त्यांना मी कालचे ठरवू शकत नाही. कवितेमध्ये नेहमीच एक मोठा धोका संभवतो. ॲबनॉर्मलिटीला शेंदूर फासणारे अनुयायी असतील तर अशा लेखनाला अचानक वेगळी, आधुनिक कविता म्हणून डोक्यावर घेण्यात येते. प्रतिभा ही अनाकलनीय असली तरी वेडामध्ये मधूनच येणारा ऱ्हीदम आणि त्यातून केले जाणारे लेखन हा प्रयोग नव्हे; कविता तर नव्हेच नव्हे. साठ आणि सत्तरच्या दशकात अशा ॲबनॉर्मलिटी असणाऱ्या चक्रमांना कवी आणि त्यांच्या रिमिक्स आणि ऱ्हीदम असणाऱ्या शेरेबाजीला 'महान प्रयोगशील कविता' असे त्यांच्याच भक्तांकडून गौरवण्यात आले. *(उदा. मनोहर ओक, सदानंद रेगे)* त्याचाही दुष्परिणाम मराठी कवितेला भोगावा लागला. आजही त्या चक्रमपणाचे अनुकरण करताना काहीजण दिसत आहेत. त्यांच्या ह्या करण्याने ते स्वत:ला आत्मग्लानीच्या कृष्णविवरात ढकलत आहेत. 'नसण्याला' अस्तित्व नसतेच. खरेतर अस्तित्वाचा अभाव म्हणजे 'नसणे.' असे 'नसणे' कविता होऊ शकत नाही. हे मराठीत लिहिणाऱ्या आजच्या सर्व 'ऱ्हीदमिक' चक्रमांनी आणि तुच्छतावाद्यांनी लक्षात ठेवावयास हवे. नावे न घेता मी हे लिहिले तर संशयाला जागा राहील. विलास सारंग, हेमंत दिवटे, श्रीधर तिळवे, *(हे स्वत:च्या कवितेची समीक्षाही स्वत:च लिहितात! त्याविषयी पुढे मी लिहिणारच आहे.)* तुलसी बेहरे, वसंत पाटणकर आणि बऱ्याच प्रमाणात *(काही मोजक्या कविता अपवाद वगळता)* दि. पु. चित्रेही ह्या प्रकारात येतात. *(अर्थात दि. पु. चित्रे स्वत:ला काळाच्या हिशेबात कुठे ढकलतात हे सर्वस्वी त्यांच्यावर अवलंबून आहे!)* मराठी कवितेबाबत लिहिताना, विंदा करंदीकरांच्या कविता समोर असताना आपण वसंत बापट, मंगेश पाडगावकर यांच्याही कविता श्रेष्ठ मानत राहिलो. रूपक कथा अशी की, खुद्द करंदीकरही बापट, पाडगावकरांबरोबर आपल्या कविता वाचत राहिले! ह्यातच आपल्या आजच्या काव्यविषयक जाणिवांचे सार दडलेले आहे.

एके काळी 'स्वान्त-सुखाय' अशा मराठी समाजावर क्षेपणास्त्रे पडावी अशी तेंडुलकरांची नाटके आली. तेंडुलकरांच्या नाटकांनी मराठी आणि आणि भारतीय रंगभूमीवर क्रांती घडवली. केवळ कथानक, त्यामागची दृष्टी, आशय, क्रांतिकारता ह्या एवढ्यावरच नव्हे तर संरचनेच्या बाबतीत तेंडुलकरांनी एक अस्सलपणा आणला. आधुनिक काळातील भारतीय रंगभूमीचे ते दार्शनिक ठरले. पण तेंडुलकरांनी नाटके

लिहिण्यास थांबवूनही बराच काळ लोटला. मराठी नाटकांमध्ये तेंडुलकरांच्याही पुढे पाऊल टाकण्याची सशक्तता असणारा प्रवाह दिसत नाही. तेंडुलकरांनी समकालीन असणारे *(वयाने नव्हे; तरी लेखनाने)* सतीश आळेकर, महेश एलकुंचवारही आज लेखनाच्या बाबतीतच नव्हे तर प्रयोगांच्याच बाबतीत थांबलेले दिसत आहेत. तेंडुलकर जेव्हा लिहित होते तेव्हाही 'अश्रूंची झाली फुले' किंवा 'रायगडाला जेव्हा जाग येते'सारखी नाटके येतच होती. पण आज फक्त केस नं. ९९, एका लग्नाची गोष्ट, तुमचा मुलगा काय करतो? सारखी नाटके आपल्या अवती-भवती दिसत आहेत. *(त्या लोकानुनयी नाटकांमध्ये मागच्या काळातील रायगडाला... किंवा अश्रूंची... सारखा भाबडा आदर्शवादही नसतो. असतो तो चोख कमर्शिअल लोकरंजनाचा मामला.)* त्याव्यतिरिक्त जी नाटके प्रयोगशीलतेचे नवनवीन मार्ग चोखाळतात ती नाटके व नाटककार म्हणजे स्वत:च नवीन शोकांतिका होताना दिसत आहेत. उदा. जयंत पवारचे 'अधांतर' किंवा शफाअत खानचे 'शोभायात्रा.' ह्या नाटकांचे नाटककार हे नाटकांच्या एक-दोन प्रयोगानंतर *(म्हणजे रंगभूमीवरच्या नव्हे!)* आपल्याला आपल्या प्रयोगशीलतेतून मिळणारे समाधान व त्याची प्रेरणा ह्यावर अनेक लेख व मुलाखती देतात. त्यात पुन्हा अजून एक गाठ आहे ती अशा प्रयोगातून ते व्यक्त काय करतात ह्याची. तेंडुलकर हे मराठी नाटकाचे पूर्वसूरी मानले तर, त्यांची प्रमुख नाटके: शांतता! कोर्ट चालू आहे, दंभ द्वीपाचा मुकाबला, बेबी, गिधाडे, सखाराम बाईंडर, घाशीराम कोतवाल ही होत. ह्यातल्या एकाही नाटकात त्यांचे आयुष्य व्यक्त होत नाही. अधिक अचूक म्हणायचे झाले तर, फक्त त्यांचेच आयुष्य व्यक्त होत नव्हते. शेफाअत खान मुसलमान आहे म्हणून तो 'राहिले दूर घर माझे' लिहिणार. जयंत पवार ज्या भागात वाढला तिथल्या दु:खांवर आणि पेचांवर प्रकाशझोत टाकणार. दु:खांची अशी 'टेरीटरी' करून लिहिण्यावर आपण काही युक्तिवाद करू शकलो नाही तरी आपल्या भोवतीच्या दु:खापलिकडे पहाण्याची वृत्ती ह्या नवप्रवाहात दिसत नाही. हे असे का होते ते आपण मुळातून जाणून घेतले पाहिजे. कारण जयंत पवार, शफाअत खानसारखी माणसे संवेदनशील आहेत, सृजनशील आहेत. त्यांच्या दृष्टीचा संकोच होण्याची कारणे ही त्यांच्या काळाचीच वैशिष्ट्ये आहेत. आजची नाटके ज्या अस्वस्थेतेतून आलेली आहेत ती अस्वस्थता नवीन आहे. ती अस्वस्थता एककेंद्री भांडवलशाहीत घडलेली आहे. ती अस्वस्थता व्यक्तीत सामावलेली समाज पहायला इच्छुक नाही. प्रतिभावंत म्हणून तिचा विस्तारही एका मर्यादेपर्यंत होता. मग शफाअत आपल्या धर्मियांची दु:खे आणि वेदना सांगण्याचे माध्यम म्हणून नाटकांची निवड करतो. अन् जयंत पवार

त्याची नाळ जोडल्या गेलेल्या वर्गाची दु:खे सांगण्यासाठी. ह्यातून मला नेहमीच एक प्रश्न पडतो. ह्या युगात मराठीसारख्या तशा उपेक्षित भाषेत खरंच निवडीचे स्वातंत्र्य आहे का? उत्तर 'नाही' असे द्यावे लागते. कारण एका राक्षसी सभ्यतेमध्ये आपण नियंत्रित असल्याची माणसाची भावना पराकोटीला पोहोचलेली आहे. त्यामुळे परत मुळांकडे जाण्याची धडपड जगभराच्या संवेदनशीलांमध्ये सुरू आहे. मराठीसारख्या एका उपेक्षित भाषेत पडणारे हे त्याचेच पडसाद आहेत. मराठी नाटकात तेंडुलकरपूर्व आणि तेंडुलकरोत्तर अशी रेषा पुसली जाण्याची चिन्हे आज तरी दिसत नाहीत. प्रेमानंद गज्बीसारख्या नाटककाराने एक वेगळी वाट चोखाळण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याने विषय व त्याची मांडणी ह्यांच्याबाबतीत इतकी कमी तरलता दाखवली की त्याची नाटके ही वैचारिक निबंधाएवढी बोजड झाली. त्याच्या एका येऊ घातलेल्या नाटकाच्या नावात आजच्या काळाचे भान होते! 'माझे तुमच्या बायकोवर प्रेम आहे,' ह्या नावाचे त्याचे नाटक अजून आलेले नाही. पण नावात तरी स्वत:पासून मुक्त करणारी वैश्विकता दिसते आहे! मराठी नाटकात जुन्यापेक्षा वेगळे, नवे मला माहीत असलेले हे एवढेच आहे. *(ह्या सर्वात मी 'शोभायात्रा'बद्दल काही लिहिले नाही. ह्याचे कारण मी 'शोभायात्रा' हे संरचनेच्या दृष्टीने फसलेले नाटक मानतो. पण हे एवढेच नव्हे, तर ती एक 'स्वस्त' प्रयोगशीलता होती. गिमिक्सच्या पातळीवर जाणारी. त्या अर्थाने ते मी (तरी) नाटक मानत नाही.)* अर्थात ह्याला काही अपवादही आहेत. अलिकडच्या काळात, राजीव नाईक ह्यांचे 'साठेचं काय करायचे?' हा तो एकमेव अपवाद. पण अपवादाने नियम सिद्ध होत नाही.

मराठी कथा आणि कादंबरीचा प्रांत मात्र आजही खूप आशाजनक आहे. कविता फसली तर 'प्रयोग' होतो; नाटक फसले तर 'प्रयोग' होत नाही! सुदैवाने आजचा मराठी कथा-कादंबऱ्यांचा प्रांत प्रयोग आणि प्रयोगाच्या दाव्यांपासून दूर आहे. अशी दावेबाजी करणारे गंगाधर गाडगीळ शेवटचे. त्यांच्यानंतर अनेकांनी नव्या कथा-कादंबऱ्या कोणतेही दावे न करता लिहिल्या. हे मराठी भाषेचे सुदैवच. मराठी कथा-कादंबरीच्या क्षेत्रात राजन खान, रंगनाथ पठारे, अनिल दामले, संजय जोशी, अनंत सामंत, विश्वास पाटील, मिलिंद बोकील, मेघना पेठे, प्रिया तेंडुलकर एवढी नावे सातत्याने लिहित आहेत. ज्यांचे सातत्याने लेखन चालू आहे ह्या सर्वांच्या प्रेरणा सारख्या नाहीत. ह्यातल्या प्रत्येकाचा प्रत्येक प्रयोग यशस्वी झालेला आहे असेही नाही. ह्यातल्या काहींची एखाददुसरी कादंबरी आलेली आहे. पण तिच्यात आशेला वाव आहे. तर काहींनी सातत्याने भरघोस लेखन केलेले आहे. पण त्यात आशेचा एखादाच किरण

दिसतो. मराठी कादंबरी वेगवेगळ्या वाटा धुंडाळते आहे. राजन खानांची सत् ना गत्, रंगनाथ पाठारे यांची नामुष्कीचे स्वगत, अनिल दामलेंची गौतमची गोष्ट, संजय जोशींची नचिकेताचे उपाख्यान, अनंत सामंत यांची एम. टी. आयवा मारू, विश्वास पाटील यांची झाडाझडती, हे व असे अनेक प्रयोग आजच्या कादंबऱ्यांमध्ये केले जात आहेत. आजच्या कादंबरी व समीक्षालेखनातील सातत्यपूर्ण व गंभीरपणे प्रयोग करणारा सृजनशील म्हणून रंगनाथ पठारे यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांची 'नामुष्कीचे स्वगत' ही कादंबरी आजच्या मराठी साहित्यातील मैलांचा दगड आहे. 'ताम्रपट' हा एक दमवून टाकणारा पण फसलेला प्रयोग होता. पण 'नामुष्कीचे स्वगत' ही रंगनाथ पठारेंची कादंबरी आजच्या तुटलेपणाचा, एकाकीपणाचा आणि जागतिक परिस्थितीत विचारीपणाच्या झालेल्या कोंडीचा तेजस्वी प्रत्यय आणून देते. रंगनाथ पठारेंपेक्षा अत्यंत वेगळी अन् सोपी सहज शैली असलेल्या राजन खान यांची नवीन कादंबरी 'सत् ना गत्' ही त्यांच्या कारकीर्दीतल्या आजवरच्या सर्व लेखनातली श्रेष्ठ कादंबरी आहे. मराठी साहित्यातीलही ही एक महत्त्वाची कादंबरी आहे. अनिल दामले आणि संजय जोशींनी वेगवेगळ्या प्रकारे शैलीचे प्रयोग केलेले आहेत. अनिल दामलेंची 'गौतमची गोष्ट' आणि संजय जोशींची 'नचिकेताचे उपाख्यान' ह्या दोन सकस अशा कादंबऱ्या आहेत. पण ह्या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये एक आश्चर्यकारक साम्य आहे. ह्या दोन्हीही लेखकांनी मागे जाऊन पुराणातल्या पात्रांमध्ये भविष्यातल्या प्रेरणांचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे नेमके आजच्या काळाला साजेसे आहे. इथे नाट्यलेखनातले मुळांकडे जाणारे लेखन आणि कादंबरीतील मुळांकडे जाणारे लेखन ह्यात आजच्या मराठी कादंबरीत जो सकसतेचा प्रत्यय येतो तो आजच्या मराठी नाटकात येत नाही. वानगीदाखल आणखी काही उदाहरणे घ्यायची झाल्यास, अनंत सामंत ह्यांची 'एम. टी. आयवा मारू', विश्वास पाटील यांची 'झाडाझडती', मिलिंद बोकील ह्यांची 'उदकाचित्रे आर्ती'ची घेता येतील.

काही वर्षांपूर्वी एम. टी. आयवा मारू नावाची कादंबरी लिहून अनंत सामंत ह्यानी मराठी कादंबरीत तपशीलांमध्ये जागतिकता प्रथमच आणली. *(विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण'चा अपवाद)* आज अनंत सामंत तपशीलांमधली जागतिकता व त्याच वेळी मानवी मनाच्या गुंत्यात रस घेऊन केलेले लेखन ह्या प्रयोगशील धडपडीत रमलेले आहेत. दुसरीकडे विश्वास पाटील 'भव्य महत्त्वाकांक्षा' ह्या मानवी गुणाचे शोधक असल्याचे त्यांच्या लेखनातून दिसते. त्यांच्या 'पानिपत'पासून 'महानायक'पर्यंतच्या कादंबऱ्या हे भव्य महत्त्वाकांक्षेने भारलेल्या माणसांची कहाणी आहे. त्यांनी

'झाडाझडती' ह्या कादंबरीत मानवी आयुष्यातील भव्य व राक्षसी महत्त्वाकांक्षांचा उलट्या बाजूने वेध घेतलेला दिसतो. धरणग्रस्तांची ही कहाणी त्या प्रयोगाचेच प्रतिक आहे. ह्या दोन्हीही लेखकांना समकालिन असणारे लेखक मिलिंद बोकील कादंबरीसोबत लघुकथाही लिहितात. त्यांच्या 'उदकाचिये आर्ती' ह्या पुस्तकात आणि त्यांच्या कथांमध्ये किंवा वैचारिक लेखनामध्येही *(उदा. जयप्रकाश नारायणांवरचा त्यांचा लेख)* त्यांच्या प्रेरणा ह्या सूक्ष्म पातळीवर अध्यात्मिक असल्याचे दिसते. ह्या प्रकारच्या प्रेरणा आजच्या साहित्यात नव्या आहेत. कथा-कादंबऱ्यांमध्ये विविध प्रेरणांनी नटलेल्या सळसळत्या प्रतिभेचे लेखक ठामपणे मानवी अस्तित्वाच्या गुंत्याचा वेध घेत आहेत. आणि मराठी साहित्याचे किमान हे दालन तरी समृद्ध करीत आहेत. असाच दुसरा प्रांत म्हणजे लघुकथा. खरं तर ह्या दोन्ही दालनांवर अधिक विस्तृत लिहायला हवं.

एवढ्या कमी शब्दात त्याचा वेध घेताना अपराधीपणाचे वाटावे असे हे आहे.

दुसरीकडे लघुकथांच्या प्रांतात तीन महत्त्वाची नावे म्हणजे भारत सासणे, मेघना पेठे, प्रिया तेंडुलकर ही होत. ह्या तिघांचे सामर्थ्य वेगवेगळे आहे. पण त्यांच्या लेखनात एक विचित्र साम्यही आहे. त्या तिघांचेही लेखन व्यक्तिवादी आहे. सामाजिक अस्वस्थतेचे प्रतिबिंब त्यात क्वचितच पडलेले दिसते आहे. अर्थात त्यांच्या लेखनाचे व्यक्तिवादी असणे हे सामर्थ्यही आहे. त्या तिन्ही लघुकथा लिहिणाऱ्यांमध्ये मानवाच्या आदिम प्रेरणांचा वेध घेण्याची क्षमता आहे. भारत सासणे वगळता उरलेल्या दोघी लेखिकांनी ज्या प्रेरणांचा वेध घेतलेला आहे, त्या प्रेरणा पूर्णपणे भौतिक आहेत. शारीर आहेत. मृत्युपलीकडच्या अनंतामधे कलावंताने डोकावून पहाण्याच्या सहज स्वाभाविक प्रवृत्तीचा त्यात अभाव आहे. त्या अर्थाने भारत सासणे लघुकथाकार म्हणून मानवामध्ये असलेल्या मूलभूत अध्यात्मिक प्रेरणांशी सहजपणे दोन हात करताना दिसतात. अदृष्टाच्या गुंत्यांमधे वाचकाला गुंतवण्याची भारत सासणेंची क्षमता आजच्या मराठी साहित्यात महत्त्वाचे योगदान करते. मेघना पेठे आणि प्रिया तेंडुलकर ह्यांनी त्यांच्या लेखनविषयक प्रेरणांबाबत समीक्षात्मक लिखाण केलेले नाही. पण ह्या दोघी स्त्रीलेखिकांनी अगोदरच्या स्त्री आणि स्त्रीवादी लेखिकांपासून स्वत:ची नाळ तोडली. त्या दोन्ही लेखिकांमध्येही एक मोठा फरक आहे. मेघना पेठेच्या कथा त्या त्याच्या संरचनेचा ताण झुगारून लिहिलेल्या आहेत. ह्या दोघींनी मराठी कथालेखनात एक सशक्त प्रवाह निर्माण करण्याचा प्रयत्न केला हे निर्विवाद.

लेखकांचे आणि त्यांनी प्रसवलेल्या साहित्याचे मोठेपण अर्थातच वाचक ठरवत

असतात. आपल्याच काळात लेखकांनी आपआपसात ते ठरवू नये. शक्य झाल्यास चांगली टीका करावी. स्वत:वर आणि इतरांवर. आजच मराठीत चांगल्या टीकाकारांच्या, समीक्षकांचा अभाव आहे. मी सातत्याने, कुणी चांगली सशक्त टीका करतो का ते शोधण्याचा प्रयत्नात असतो. माझ्या वाचनात, चांगली समीक्षा करण्याची क्षमता असलेले व चांगल्या समीक्षेचे सर्व गुण असलेले लेखन आजच्या पिढीत, नितीन रिंढेनी केले होते. *(ते सध्या लिहितात वा नाहीत कुणास ठाऊक? त्यांचे वय 'आजचे' आहे नाही हेही ठाऊक नाही.)* स्वत:ला साहित्यिक समजणाऱ्या सुमेध वडावाला रिसवूडांच्या एका कादंबरीचे व स्वत:ला 'फूल-टाइम' कवी समजणाऱ्यांपैकी वसंत आबाजी डहाळ्यांच्या एका काव्यसंग्रहाचे त्यांनी केलेले परीक्षण हे मराठीमधल्या सर्वकालिक समीक्षेतील श्रेष्ठ समीक्षण होते. दीर्घ पल्ल्यांचे असे लेखन मराठीत वाचायला मिळत नाही. किंबहुना सध्या समीक्षेच्या प्रांतात समीक्षेच्या नावाखाली बुवाबाजीचेच प्रकार चालू आहेत. ही बुवाबाजी दोन प्रकारची आहे. त्यातली एक रंगनाथ पठारेंची. हा एक श्रेष्ठ कादंबरीकार, समीक्षालेखन करताना, नेमाडेबुवांच्या देशीवादाच्या आश्रमाचे ओझे खांद्यावर घेऊन निरपेक्ष टीकालेखन वा निरपेक्ष समीक्षालेखन करू शकत नाही. देशीवादाचा *(खरंतर एक प्रकारच्या 'बहुजन' विषारी जातीयतेचा)* प्रसार करणारे लेखन हे खरे टीकालेखन नसून खऱ्या समीक्षेचा व भाषिक साहित्याचा गळा घोटणारी ती विषारी अंधश्रद्धा आहे. संवेदनशील नि सातत्य असलेल्या व ज्यांना साहित्यातील टीकेचे गांभीर्य कळते, त्यांच्याकडून ह्या प्रकारच्या लेखनाची अपेक्षा नाही. ह्या अशाच प्रकारची समीक्षात्मक बुवाबाजी चालू आहे ती श्रीधर तिळवे ह्यांची. ह्यांची समीक्षा संकुचित तर आहेच, पण अधिक कनिष्ठ पातळीचीही आहे. मराठी भाषिक साहित्यामधील समीक्षेचा ऱ्हास स्पष्टपणे त्यात दिसू शकतो. त्याप्रमाणे नवेनवे बाबा, बुवा हे नव्यानव्या क्लृप्त्या काढत असतात. वीस रुपयात जादूची अंगठी विकणारे *(ज्याने तुमचा भाग्योदय होणार असतो)* जसे अंगठीची माहिती सांगताना आईनस्टाइनच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतापासून ते मेंडेलच्या जैनुक सिद्धांतापर्यंतची सगळी परिभाषा वापरतात. पण त्यांचा मूळ मुद्दा असतो, तो आमची *('रुपये वीस'ची)* अंगठी घ्या. *(आणि 'तुमचे' भाग्य बदला!)* तिळवेंची समीक्षा ही त्या प्रकारचीच आहे. ज्या परिभाषेत आणि समर्थनार्थ जे मुद्दे घेऊन ती केलेली आहे, त्याचा आणि मुळ मुद्द्याचा काहीही संबंध नसतो. आपण व आपल्याशी संबंधितांनी लिहिलेल्या कविता कुणालाच कळणे शक्य नसल्याने व त्याचा मानवाच्या काव्यविषयक जाणिवांशी काहीच संबंध नसल्याने, आपल्याच वीस

रुपयाच्या अंगठीला 'चौथी नवता' असे भारदस्त नाव देऊन अस्तित्वात न आलेल्या सृजनाच्या नावाने केली गेलेली टर्रेबाजी असे ह्या सर्व समीक्षेचे स्वरूप आहे. ही समीक्षा फक्त आपआपल्यांपुरती मर्यादित आहे हा त्यातला आनंदाचा भाग. पण ह्या प्रकारची बुवाबाजी *(त्यातही पुन्हा नेमाडेबुवांची दीक्षा आहेच.)* कुठच्याही भाषिक साहित्याला प्रगल्भ न करता अंधकाराकडेच नेणारी ठरते, हेही नजरेआड करता उपयोगाचे नाही.

आजच्या मराठी समीक्षेत, विजय तापसांनी खरंतर चांगली समीक्षा लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण त्यात सातत्य कमी आहे. सकस साहित्य कमी निर्माण झाल्याचाही तो परिणाम असेल.

आजच्या मराठी साहित्याचा समग्रपणे विचार करताना एक गोष्ट ठळकपणे जाणवते. ती म्हणजे, आजची मराठी कथा, कादंबरी ही तिच्या पूर्वसुरींपासून वेगळी झालेली आहे. आजची मराठी कथा आणि कादंबरी जुन्या कथा आणि कादंबऱ्यापासून पृथक करता येते. आज *(वर उल्लेख केलेल्यांपैकी व न केलेल्यांपैकीही बरेच)* कथाकार व कादंबरीकार त्यांच्या पूर्वसूरींपासून बऱ्याच प्रमाणात नाळ तोडून वेगळे झाले आहेत. *(बऱ्याच प्रमाणात अशासाठी की हे पूर्णपणे कधीच शक्य नसते.)* पुन्हा त्या वेगळे होण्यात कोणताही आवेश वा अभिनिवेश नाही. उदाहरणच घ्यायचे झाले तर आज मेघना पेठे ज्या कथा लिहितात. त्या कथांमध्ये पुरुषांचं दुभंगणं ज्या ताकदीने व्यक्त होतं, त्या ताकदीने मराठीत अगोदर कधीही व्यक्त झालेलं नाही. पुन्हा हे सारं सूक्ष्म आहे. *(म्हणजे कथेत जसं असू शकतं तसं)* पण मेघना पेठेंकडे कोणताही आवेश किंवा अभिनिवेश नाही. हे वेगळं आहे. आजचे आहे. गाडगीळांनी त्यांच्या काळची 'नवकथा' लिहिली होती. तेव्हा त्यांचा आवेश आणि अभिनिवेश एखाद्या राजकीय नेत्याला *(खरंतर एखाद्या नगरसेवकाला)* शोभेलसा होता. मग आपण जे लिहितो आहोत, ते वाचकाला 'समजावे' म्हणून त्यांनी त्याची 'समीक्षा' ही लिहिली. हे तर आजच्या श्रीधर तिळवेंना शोभणारं होतं. आजच्या मेघना पेठेंना नव्हे. मेघनाचे नाव प्रातिनिधीक आहे. भारत सासणेंच्या बाबतीतही हेच म्हणता येईल. नेमाड्यांनी त्यांच्या 'कोसला'मध्ये ज्या काही 'अक्षर' ओळी लिहिल्या आहेत, त्या 'कोसला'च्या नायकाच्या मृत पावलेल्या बहिणीसंबंधी आहेत. जिच्या इवल्याशा पोटातल्या गर्भाशयाचा उल्लेख करताना नेमाडे अस्तित्वाच्या बेंबीत बोट घालतात. पण त्यानंतर तीस वर्षे आवेश आणि अभिनिवेशाच्या भडिमाऱ्याखाली ह्या एका अक्षरनिर्मितीच्या बदल्यात ते आपल्याला वेठीला धरू पहातात. ह्यापासून आजचा कादंबरीकार मुक्त आहे. आजचा कथाकार किंवा कादंबरीकार त्याला जे म्हणायचे आहे, ते त्याच्या

कथा-कादंबरीतून व्यक्त करतो. त्यावरच्या स्वत:च्यातच भाष्यातून नव्हे. केवळ ह्यामुळेच आजची मराठी समीक्षा ही क्षीण आहे. पण त्याचा अर्थ कालची समीक्षा सशक्त होती असे नव्हे; तर कालच्या समीक्षेतील सूज आज नष्ट झालेली आहे. अन् आज मराठीसमीक्षेचा खरा अशक्तपणा आपल्या नजरेस येतो आहे, असा त्याचा खरा अर्थ आहे. कवितेमध्ये माधव ज्युलियनांपासून ते कुसुमाग्रजांपर्यंत जी एक बुवाबाजी निर्माण झालेली होती, ती त्यांच्या *(लेखनकाळा)* नंतरही चालू राहिली. कथा-कादंबरीच्या प्रांतात ते झालं नाही. कथा किंवा साहित्य केवळ नवे असण्याच्या बळावर श्रेष्ठ ठरत नाही तर ते स्वत:विषयीही तटस्थ, निरपेक्ष आणि उदास असावे लागते. ह्या कसोटीला आजची मराठी कथा अन् कादंबरी उतरते, एवढाच ह्याचा अर्थ आहे.

शेवटी एवढंच म्हणता येईल की, आजचं जगणं खूपच व्यामिश्र आहे. कालच्या जगण्यातली, सोपेकरण करून जगण्याची सोय त्यात नाही. आज आपण साहित्य, आहे रे - नाही रे, दलित-ब्राह्मण, डावे-उजवे, देशी-विदेशी, स्त्रीवादी-पारंपारिक असे विभागून अभिनिवेशाच्या खोट्या नशेत जगू शकत नाही. ह्याचा फायदा आजच्या कथा-कादंबरीला झालेला आहे. ह्याचा फायदा आजच्या कविता, नाटकाला व समीक्षेला झालेला नाही. किंबहुना तोटाच झालेला आहे. असे का? ह्याचे एका मर्यादेपलीकडे उत्तर माझ्याकडे नाही. मर्यादेअलीकडच्या उत्तराचा शोध घेण्याचा प्रयत्न मी ह्या मर्यादित शब्दात घेतलेला आहे. ह्यातल्या प्रत्येक वाक्याची जबाबदारी अर्थात माझीच.

हे असं बरंच लिहिता येईल. बरं अन् वाईटही. ह्यातल्या प्रत्येक लेखक अन् कवीवर लिहीता येण्याजोगं बरंच आहे. शब्दसंख्येच्या मर्यादेमुळे शंभरातलं नव्याण्णव निसटून गेलेलं आहे. पण जे उरलंय ते आजचं आहे. माझ्या काळाचं आहे. हे सगळे आजचे आहेत. हे सगळे मराठीत लिहिताहेत. हेही काही कमी नाही. मराठी भाषेच्या दृष्टीने ही बाबही आशादायकच. मी हे लिहिताना नकळत कुणावर अन्याय करतोय् असं वाटलं तर किंवा कुणाचा उल्लेख करायचा राहून गेल्यासारखं वाटलं तर आपल्या काळाच्या अश्वत्थाखाली बसल्यावर माझं मन शून्य झालं, अन् अशी घोडचूक करण्याचं सामर्थ्य माझ्यात आले, हे समजूनही मला माफ करू नका. ही विनंती.

■

दिपावली *(दिवाळी)* २००१

# माध्यमांच्या बूमवर झूम

प्रसारमाध्यमांची भूमिका ही लोकशाहीचा चौथा खांब अशी आजवर केली जाते; परंतु ही भूमिका बजावताना, लोकशाहीचे इतर तीन खांब म्हणजे संसद, न्यायपालिका आणि प्रशासनव्यवस्था यांना बजावायला लागत नाही अशी एक भूमिका प्रसारमाध्यमांना बजावावी लागते. दृक्-श्राव्य आणि प्रिंट माध्यमांमध्ये रोज नवनवीन वाहिन्या आणि वर्तमानपत्रांची भर पडत असताना ही नवीन भूमिका पार पाडण्याच्या ओझ्यानेच माध्यमांचे खांदे वाकलेले दिसत आहेत. ही भूमिका आहे करमणूककर्त्याची! ही भूमिका नेमकी माध्यमांकडे कधी आली, हा थोडासा रुक्ष आणि संशोधनाचा विषय आहे; पण दृक्-श्राव्य माध्यमांची चलती सुरू झाल्यावर खऱ्या अर्थाने देशातली माध्यमं या दुहेरी भूमिकेच्या पेचात सापडली.

एकीकडे लोकशाहीचं संरक्षण व संवर्धन करायचं, तर दुसरीकडे आपल्या वाचकांची आणि / *( किंवा )* प्रेक्षकांची करमणूकही करायची या दोन भूमिका अगदी नेहमीच नाही, तर पन्नास टक्क्यांहून जास्त वेळा

परस्परविरोधी आहेत. सरासरी आठ महिन्याला एक याप्रमाणे येणारा नवा न्यूज चॅनेल आणि त्याच सरासरी वेगाने येणारी राष्ट्रीय वृत्तपत्रे ही आधी परस्परांशी प्रचंड स्पर्धा करणारी प्रॉडक्ट असतात. नंतर लोकशाहीचे संरक्षण-संवर्धन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येते ! प्रॉडक्ट म्हणून तुम्ही स्पर्धेत टिकाल, तेव्हाच तुमच्या लोकशाहीतल्या भूमिकेविषयी बोलण्याची वेळ येते. अन्यथा खेळच संपतो. हा पेच लोकमान्य टिळकांसमोर नव्हता, आगरकरांसमोर नव्हता की लेनिनसमोर नव्हता *( लेनिनसमोर लोकशाहीचाही प्रश्न नव्हता ! )*

अगदी मागच्या पिढीतल्या, म्हणजे नव्वदच्या दशकापर्यंतच्या वर्तमानपत्रां-समोरही हा पेच नव्हता. त्यामुळे अगदी नव्वदच्या दशकातल्या वर्तमानपत्रांच्या स्वरूपाची आणि आजच्या वर्तमानपत्रांच्या स्वरूपाची आणि आपल्या वाहिन्यांच्या स्पर्धेची तुलना करणे शक्य नाही. दर आठ-दहा महिन्यांनंतर शेकडो कोटी रुपयांचे भांडवल गुंतवून नवीन राष्ट्रीय वर्तमानपत्र किंवा वृत्तवाहिनी येऊ घालतानाच्या काळातला माध्यम प्रतिनिधी आणि मोजकी चार प्रादेशिक आणि तीन राष्ट्रीय दैनिके देशात असतानाच्या स्वास्थ्यपूर्ण काळातला माध्यम प्रतिनिधी यांची तुलनाच होऊ शकत नाही. आजच्या माध्यमप्रतिनिधीला त्याच्या कामातल्या रंजकतेच्या मूल्याला प्राधान्य द्यावे लागते, तरच त्याची स्पर्धेत उपासमार होणे टळते. त्यानंतर त्याला त्याच्या तात्त्विक भूमिकेकडे वळता येते. आता हे होणे बरोबर आहे वा नाही, हा अगदी वेगळा विषय आहे. कारण त्या विषयावर लिहायचे झाल्यास तिसऱ्या, चौथ्या किंवा पाचव्या जागतिक क्रांतीवरच लिहावे लागेल ! आत्ता सर्वाधी विचार करायला पाहिजे तो सध्या जे काही आहे ते नेमके काय आहे त्याचा. त्यातही आधी विचार करायला पाहिजे तो वर्तमानपत्रांचा.

सध्या अस्तित्वात असलेली सर्व महत्त्वाची प्रादेशिक *( म्हणजे महाराष्ट्रात मराठी )* आणि इंग्रजी वर्तमानपत्रे विकत घेणाऱ्या ग्राहकाच्या *( वाचकाच्या नव्हे )* घरी जेवढे कागद सकाळी येतात, त्याची तुलना दशकभर अगोदरच्या ग्राहकाच्या महिनाअखेर घराबाहेर निघणाऱ्या रद्दीशीच होऊ शकेल. एवढी प्रादेशिक आणि इंग्रजी *( त्यात रोज भर पडतेच आहे )* वर्तमानपत्रे, त्यांच्या रोजच्या रोज नवनवीन पुरवण्या, त्यांच्या उपपुरवण्या या साऱ्यांचा मारा इतक्या वेगाने सुरू आहे की, या वर्तमानपत्रांचा वाचक हा केवळ ग्राहक बनलेला आहे आणि त्यातूनच वर्तमानपत्र अधिकाधिक रंजकपणे चालवण्याची स्पर्धा निर्माण होते आहे. यातल्या प्रत्येक प्रॉडक्टचा स्वर

टिपेला पोहोचलेला आहे. ही रंजकता पुरवण्यांपुरतीच मर्यादित नाही, तर ती मुख्य वर्तमानपत्रं आणि बातम्यांपर्यंतही येऊन पोहोचलेली आहे. यात प्रॉडक्टच्या बाजूची अपरिहार्यता आपण नीट लक्षात घेतली पाहिजे. कोणताच ग्राहक रोज सकाळी नव्याने घरात येणाऱ्या एवढ्या कागदांच्या गठ्ठ्याला वाचक म्हणून पुरेसा न्याय देऊ शकत नाही. वरवर चाळण्यापुरताच त्याचा त्या कागदांशी संबंध येतो. त्या चाळण्याच्या क्रियेतच नजरबंद करून त्याला आपल्याशी बांधून ठेवण्याची क्रिया करण्याची धडपड प्रत्येक वर्तमानपत्र करत असते. त्यात यशस्वी होण्याकरिता प्रत्येक वर्तमानपत्राला लोकशाही मूल्यांच्या संवर्धनापेक्षा रंजकतेचाच खूप आधार असतो!

ही रंजकता बातम्यांपर्यंत पोहोचवण्यात वाहिन्यांच्या प्रचंड मोठ्या लाटेने मोठाच हातभार लावलेला आहे. मोजता येणार नाहीत एवढ्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक वाहिन्यांचा रोज वाढत जाणारा पूर हा त्यात आर्थिक उलाढाल करणाऱ्यांनाच नव्हे, तर त्या पाहाणाऱ्यांनाही एक प्रकारची असुरक्षितता देणारा आहे. एखादी महत्त्वाची बातमी अमक्या एका वृत्तवाहिनीवरच मी का पाहावी आणि तमक्या एका वृत्तवाहिनीवर का पाहू नये, हे मला कोण सांगणार? उपलब्ध तंत्रज्ञान, बातमीपर्यंत, घटनास्थळापर्यंत पोहोचण्याची क्षमता आणि त्यावर भाष्य करणाऱ्या मनुष्यबळाचा वकुब हे सर्वच सर्वसाधारणपणे सारखेच असल्यावर कोणती तरी एक वृत्तवाहिनी धरून आणि तिला पकडून मी का राहावं? यासारख्या असंख्य प्रश्नांना 'दर्शक' रोज सामोरा जातो. आणि त्याच्यासमोर चालू होतं ते 'ब्रेकिंग न्यूज' आणि 'सनसनाटी'चं एक नाट्य; ज्यामध्ये घटनेच्या वास्तविक पैलूंमध्ये रंजकता ओतण्याची आणि नाट्य निर्माण करण्याची प्रचंड धडपड सुरू असते. नव्याने येणारी प्रत्येक वृत्तवाहिनी या धडपडीत भर घालण्याकरिताच येते. कारण प्रोग्रॅमिंग चॅनल्स आणि न्यूज चॅनल्समध्ये एक मूलभूत फरक असतो. प्रोग्रॅमिंग चॅनल्स अतिनाट्य किंवा मेलोड्रामावर आधारित महामालिका निर्माण करू शकतात. न्यूज चॅनल्स *(वृत्तवाहिन्या)* स्वत: बातम्या निर्माण करत नाहीत. ज्या बातम्या असतात *(किंवा नसतात)* त्या वृत्तवाहिन्यांच्या हातात नसतात. तरीही प्रत्येक वृत्तवाहिनीला *(आणि नव्याने येणाऱ्या वृत्तवाहिनीला)* त्याच बातम्यांमध्ये आपल्याकडे काहीतरी वेगळं आहे, असं भासवून इतर स्पर्धक वृत्तवाहिन्यांना मागे टाकायचं असतं. एवढंच नव्हे तर अतिनाट्ययुक्त महामालिका दाखवणाऱ्या प्रोग्रॅमिंग चॅनल्सशीसुद्धा त्यांना स्पर्धा करायची असते. अशा वेळी बातम्या, बातम्यांचं विश्लेषण, गुन्ह्यासंबंधीचे कार्यक्रम,

राजकीय वाद या साऱ्यालाच मनोरंजनाच्या बाजारपेठेत उतरून स्पर्धा करावी लागते. वास्तवापेक्षा कितीतरी भडक, बऱ्याचदा उथळ आणि क्वचित काही वेळा वास्तवाशी संबंधित नसणाऱ्या बातम्यांची भीषण स्पर्धा जी सुरू होते, ती इथेच.

वृत्तपत्रांना शे-सव्वाशे वर्षांचा इतिहास आहे. सामाजिक आणि राजकीय लढ्यांचा आणि त्यातील बदलत जाणाऱ्या मूल्यांशी वृत्तपत्रांचा थेट परिचय आहे. त्यातही प्रादेशिक वृत्तपत्रांच्या बाबतीत हे जास्तच खरे आहे; कारण इतिहासात व्यवस्थांशी संघर्ष करणारे प्रखर लढे जे लढले गेले ते बहुतांशी प्रादेशिक वृत्तपत्रांद्वारेच लढले गेले आहेत. इंग्रजी पत्रं बऱ्याचदा प्रस्थापित व्यवस्थांच्या बाजूने उभी राहिलेली आहेत; परंतु भांडवली गुंतवणूक आणि वृत्तपत्रात काम करणाऱ्यांना मिळणारे लाभ यांच्या बाबतीत इंग्रजी वृत्तपत्रे प्रादेशिक वृत्तपत्रांपेक्षा अनेकपट सुदैवी ठरलेली आहेत. वृत्तपत्रांच्या आणि वाहिन्यांच्या अचानक मोठ्या प्रमाणात झालेल्या वाढीमुळे या बाबतीतले अनेक मापदंड उलटेपालटे झाले आहेत. प्रादेशिक वृत्तपत्रांमध्ये असणाऱ्या कसदार मनुष्यबळाला इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये आणि राष्ट्रीय वृत्तवाहिन्यांमध्ये मागणी प्रचंड वाढली आहे; मात्र याचा गुणात्मकदृष्ट्या चांगला परिणाम एकंदरच माध्यमांमध्ये झाला असं नाही; परंतु तरीही पत्रकार हा आर्थिकदृष्ट्या गरीबच प्राणी हे समीकरण बऱ्याच प्रमाणात बदललं.

पत्रकार आणि माध्यमप्रतिनिधींच्या दृष्टीने झालेला हा सकारात्मक बदल एकंदर माध्यमांच्या दृष्टीनेही तसाच ठरला असं नाही. याचं प्रमुख कारण म्हणजे राष्ट्रीय आणि प्रादेशिक मिळून सात-आठ वृत्तपत्रं आणि तेवढीच करिअरची संधी असलेल्या क्षेत्रात अचानक डझनांनी वृत्तवाहिन्या आणि वृत्तपत्रांची भर पडू लागली; परंतु अचानक आलेल्या या 'बूम'ला समर्थपणे सामावून घेणाऱ्या सकस मनुष्यबळाची मात्र एक प्रकारची टंचाई निर्माण झाली. त्यामुळे काल जे.एन.यू.तून आलेल्या तरुण-तरुणींची विश्लेषक म्हणून; तर परवाच पत्रकारितेचा डिप्लोमा घेतलेल्या तरुण-तरुणींना आज माइक हातात धरून देशातल्या सद्यस्थितीवर 'एक्स्पर्ट' भाष्य करण्याची संधी मिळू लागली. ही संधी बहुतांशी अपरिपक्वतेचं दर्शन घडवती झाली; परंतु त्याचे काही अनुषंगिक फायदेही झालेत. आपल्या संपूर्ण समाजाची संरचना सरंजामी मनोवृत्तीवर उभी आहे. त्यात एखाद्या सरंजामी मनोवृत्तीच्या राजकीय नेत्याला किंवा घराण्यामुळेच उद्योगपती झालेल्या माणसाला काल ग्रॅज्युएट झालेल्या मुलीसमोर आख्ख्या देशाला उत्तरदायी व्हावं लागतं, हे लोकशाही परंपरांचं पोषण करणारंच आहे. परंतु हे एका

अपरिहार्यतेतून आणि योजकहीनतेतून येतंय हे त्यातलं न्यून दाखवणारं आहे. कालांतराने यातून काही प्रमाणात सरंजामी मनोवृत्तीचं खच्चीकरण होत जाणार आहे हे स्पष्ट आहे; पण काहीही झालं तरी हा अनुषंगिकच फायदा आहे, हे विसरून चालणार नाही.

कोणत्याही लोकशाही समाजात माध्यमांची एक भूमिका असते. ती भूमिका न्यायालये, प्रशासन आणि संसदेकडून सर्वस्वी वेगळी असते. लोकशाहीच्या चार स्तंभांपैकी माध्यमांवरच निष्कर्ष काढण्याची जबाबदारी नाही. वस्तुस्थितीचे सर्व पैलू समाजासमोर आणण्याची आणि त्यातून कोणताही निष्कर्ष न काढण्याची सूटही फक्त माध्यमांनाच आहे. शुभंकरासोबत भयंकरही तेवढ्याच आत्मीयतेने समाजासमोर मांडण्याची आणि त्यातले शुभंकर काय किंवा भयंकर काय हे निष्कर्ष न काढण्याच्या जबाबदारीतून सवलत फक्त माध्यमांनाच मिळालेली आहे. प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया इतक्या जास्त प्रमाणात फोफावत चाललेला असताना मीडियाच्या या विशिष्ट भूमिकेचा परिणाम वेगळ्याच पद्धतीने होताना दिसतो. आपापसातील प्रचंड स्पर्धेमुळे कधीही आणि कुठेही पोहोचण्याचे वरदान मीडियाला मिळाले आहे; परंतु त्याचा उपयोग करून वस्तुस्थितीचे अनेक पैलू समाजासमोर आणण्याऐवजी तुलनेने बऱ्याच बिनमहत्त्वाच्या माहितीचा आणि बिनमहत्त्वाच्या व्यक्तींच्या व्यक्तिगत आयुष्याचा भुगा प्रचंड प्रमाणात चिवडण्याकडे मीडियामधील स्पर्धा वळण घेते आहे. लोकांना हेच आवडते असेही नव्हे. एक ताजे उदाहरण देता येईल. शेकडो कोटी रुपयांची गुंतवणूक करून आणि हरतऱ्हेचे ग्लॅमर आणून 'डीएनए' नावाच्या इंग्रजी वृत्तपत्राचा खप 'पुण्यनगरी' नावाच्या अतिशय कमी खर्चात चालणाऱ्या प्रादेशिक *(खरं तर जिल्हा)* वृत्तपत्राच्या निम्म्याच्या जवळपासही पोहोचू शकलेला नाही. बरं, अवाक् करायला लावणारी जाहिरातीची कॅम्पेन, शेकडो कोटी रु.च्या गुंतवणुकीचे आकडे, रोजच्या रोज *(बऱ्याच अर्थाने बिनमहत्त्वाच्या)* सेलिब्रिटीजचे फोटो वगैरे साऱ्या मालमसाल्याने, जिल्हा किंवा प्रादेशिक वृत्तपत्राच्यापेक्षा वेगळी कोणती तरी आंतरराष्ट्रीय अभिजात संस्कृती रुजवण्याचा प्रयत्न होतो आहे किंवा अति उच्च मूल्यांची जपणूक केली जात आहे किंवा माध्यमांमध्ये *(किमान)* निर्मितीमूल्यांमधला वेगळा प्रयोग केला जात आहे असेही नाही. तर मग ही प्रादेशिक *(किंवा कधी कधी जिल्हास्तरीय)* वृत्तपत्रांची खपाच्या आकड्यातली सरशी न्यून मानण्याचे काहीच कारण नाही.

जी बाब वृत्तपत्रांबाबत; तीच वाहिन्यांबाबत आहे. वृत्तवाहिन्यांच्या बाजारपेठेत

प्रादेशिक वृत्तांना सर्वांत जास्त लोकप्रियता लाभते. त्याखालोखाल राष्ट्रीय वृत्तांना आणि मग आंतरराष्ट्रीय वृत्तांना. अपवाद अमेरिकेत 'वर्ल्ड ट्रेड सेंटर'वरील हल्ल्यासारख्या किंवा लोकसभा निवडणुकांसारख्या प्रसंगांचा. वृत्तवाहिन्यांचे रेटिंग हे नेमक्या बातम्यांना जास्त असते आणि जे फार नेमके असते ते बऱ्याचदा भौगोलिक आणि प्रादेशिकदृष्ट्या मर्यादित असते. मुंबईतला पाऊस, दिल्लीत स्त्रियांची असुरक्षितता, गुजरातेतला भूकंप, शिवसेनेतली फूट वगैरे साऱ्या बातम्या या प्रादेशिक असतात. त्यांचे रेटिंग प्रचंड असते. याउलट ज्या बातम्या राष्ट्रीय असतात, त्या सर्वसामान्य असल्याने त्यात लोकांना रस नसतो. त्या अर्थाने प्रादेशिक वृत्तवाहिन्यांना मोठी बाजारपेठ आहे. दक्षिणेकडे तिचा शोध घेतला गेलेला आहे. महाराष्ट्रात हिंदी ही मराठीची सावत्र बहीण आहे. त्यामुळे जी परिस्थिती मराठी चित्रपटांबाबत आहे, तीच मराठी वृत्तवाहिन्यांबाबत आहे. महाराष्ट्रातील बातम्या मराठी पत्रकारच हिंदीतून देत असतील, तर मग वेगळ्या मराठी वृत्तवाहिनीची गरज ना मराठी भाषिकांना उरते ना मराठी पत्रकारांना. शिवाय प्रादेशिक वृत्तवाहिनीत काम करण्याचा आर्थिक तोटा राष्ट्रीय वृत्तवाहिनीत नसल्यामुळे ते पत्रकारांसाठीही सोयीचेच ठरते. त्यामुळे मराठी भाषिक वृत्तवाहिनी हे वाहिन्यांच्या या महापुरातही एक स्वप्न राहिले आहे.

या साऱ्या माध्यमातल्या 'बूम'च्या *(किंवा कल्लोळाच्या)* पार्श्वभूमीवर एक प्रश्न अत्यंत महत्त्वाचा ठरतो; तो म्हणजे या साऱ्यामध्ये सामान्य वाचकाचा किंवा प्रेक्षकाचा नेमका 'रोल' काय? एका रात्रीत सेलिब्रेटीज घडवण्याची किंवा एखादा विषय किंवा अविषय जागतिक बनवण्याची क्षमता असलेली ही माध्यमं नेमकी कुणासाठी काम करतात? कुणाला तरी घडवणं वा बिघडवणं नेमकं कसं ठरतं? बऱ्याचदा राजकीय पक्ष किंवा राजकीय पक्षांचे नेते 'माध्यमं आमच्या विरोधात काम करतात'चा सूर आळवताना दिसतात. आज माध्यमं ज्या प्रकारच्या व्यवस्थांमध्ये काम करतात, त्यांमध्ये कुठल्यातरी राजकीय विचारसरणीच्या बाजूने वा विरुद्ध काम करत राहाणं हे जवळ-जवळ अशक्यच आहे *(काही प्रमाणात पक्षांच्या मुखपत्रांनाही)*. एके काळी, राजा राममोहन रॉय यांच्यासारख्या माणसाने आपलं साप्ताहिक'बेंगॉल गॅझेट' हे *(संपूर्णत:)* सतीविरोध या कारणाला वाहून घेतलं होतं आणि बेंटिंगने सतीबंदीचा कायदा केल्यावर त्याचं पालन होतंय वा नाही हे पाहण्याचं काम हे साप्ताहिक करत होतं. आज असं करत राहाणं अशक्य आहे. बाबरी मशीद पडण्यासारखी इतिहासातली फार मोठी घटनासुद्धा त्यातली 'बातमी' जिवंत

असेस्तोवरच देता येते. इथे 'बाबरी'चं उदाहरण घेण्याचं कारण म्हणजे बऱ्याचदा हिंदुत्ववादी संघटनांच्या नेत्यांचं रडगाणं असतं की 'मीडिया आमच्या विरोधात काम करतो.' वास्तवात मीडियाचं सध्याचं स्वरूप इतकं व्यापक आणि विस्तृत झालं आहे की ठरवून एका विचारसरणीच्या विरोधात काम करणं कुणालाही अशक्य आहे. फक्त 'बातमी' कशात आहे याचा वेध माध्यम प्रतिनिधींना घेत राहावा लागतो. हे नेमकं असंच प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांबाबत होतं. या दोन्ही माध्यमांवर कोणतंही राजकीय तत्त्वज्ञान, विचारसरणी किंवा राजकीय नेत्यापेक्षा जबर दबाव असतो, तो प्रतिस्पर्धी वृत्तपत्र वा प्रतिस्पर्धी वाहिनी काय करते याचा. त्यामुळे वृत्तपत्रं किंवा वृत्तवाहिन्यांमध्ये असलेली स्पर्धा ही विचारसरणींमधील न राहता, जे जास्त खपेल किंवा जे जास्त रंजक ठरेल, यातील स्पर्धा होत जाते. प्रवीण तोगडियांसारख्या माणसांची लंबीचौडी वक्तव्यं 'बातमी' म्हणून सर्व वाहिन्यांवर दिवस दिवस दिसत राहातात; कारण त्यात चाळवण्याचं आणि मनोरंजनाचं मूल्य प्रचंड असतं. आणि चॅनलमधले सर्व प्रतिनिधी कम्युनिस्ट असतील *(हे एक काल्पनिक उदाहरण)* तरी त्यांना प्रवीण तोगडिया त्या दिवशी वाजवण्याशिवाय गत्यंतर नसते. प्रिंट माध्यमांबाबत हेच जरा वेगळ्याप्रकारे घडतं. 'इंडिया टुडे', 'आऊटलुक'सारखी साप्ताहिकं मधूनच 'सेक्स सर्व्हे' घेतात. ज्यात विभागागणिक स्त्रियांना आणि पुरुषांना शय्यासोबतीत काय आवडतं? किंवा स्त्रिया पुरुषाला 'सेक्सी' कधी मानतात वा पुरुष स्त्रियांना 'सेक्सी' कधी मानतात? वगैरे विषयांच्या *(अशा प्रकाराच्या अनेक)* अनेक पैलूंचा ऊहापोह असतो. हा ऊहापोह सेक्सविषयीचं प्रबोधन थोडं आणि 'सॉफ्ट पोर्न' जास्त अशा स्वरूपाचा असतो. सामान्य वाचकाच्या दैनंदिन आयुष्यात चेन्नई किंवा दिल्लीतल्या स्त्रियांना कशा प्रकारचा पुरुष सुखद वाटतो *(किंवा पुरुषांना स्त्री सुखद वाटते)* याच्यातून कोणतं प्रबोधनकारक ज्ञान मिळतं? एक सूक्ष्म चाळवणारं रंजन असंच त्याचं शेवटी स्वरूप असतं. प्रिंटप्रमाणेच इलेक्ट्रॉनिक मीडियातही होणारे 'टॉक शो'ज, वार्तालाप, लुटूपुटूची भांडणं यांचं स्वरूपही वरवर प्रबोधनकारी वाटलं तरी ते तसं असतंच असं नाही. 'वॉक द टॉक'सारखा शेखर गुप्ता यांचा टॉक शो; ज्यामध्ये आदल्या दिवशी मुकेश अंबानी येतात, दुसऱ्या दिवशी अरुण गवळी. याचा अर्थ 'वॉक द टॉक'सारख्या गंभीर टॉक शोलाही रंजनाच्या आणि सनसनाटीच्या मूल्याचे महत्त्व कमी करता येत नाही. वास्तविक अरुण गवळी हासुद्धा समाजाचा एक पैलू आहे, त्याचीही एक बाजू आहे, तीही माध्यमांनी लोकांसमोर आणली पाहिजे, हे माध्यमांचं

कर्तव्यच आहे; परंतु, त्यातलं 'लार्जर दॅन लाइफ' होत जाणारं भयंकराचं जे स्वरूप आहे ते जीवघेण्या स्पर्धेमुळे माध्यमांना टाळता येणं अशक्य झालं आहे. याचं अजून एक उत्तम उदाहरण म्हणजे दाऊद इब्राहिमची मुलगी आणि जावेद मियांदादचा मुलगा यांचं लग्न. या लग्नाबद्दल सर्वच वृत्तपत्रांनी, विशेषकरून वृत्तवाहिन्यांनी जे रिपोर्टिंग केलं ते अवर्णनीय असं होतं! दाऊदबद्दलची एवढी माहिती इतक्या वाहिन्यांना, एवढ्या प्रकारे असताना तो पकडला जात नाही, याचं गौडबंगाल त्या बातम्या पाहाणाऱ्यांना उलगडत नव्हतं. यापलीकडे या प्रबोधनाचा काहीही उपयोग किंवा फायदा नव्हता. वास्तविक वस्तुस्थितीचे अनेक पैलू उलगडून दाखवणं, त्या पैलूंचा सामाजिक-राजकीय बदलांचे पूल बांधण्यासाठी काय उपयोग आहे, हे समजावून सांगणं हे माध्यमांच्या भूमिकांचं सार आहे; परंतु आपल्या भूमिकांपासून माध्यमं दूर गेलेली आहेत असं आजच्या माध्यमांच्या 'बूम'चं स्वरूप पाहाताना दिसतं.

भोवतालच्या समाजाचा दोनच टक्के हिस्सा वर आलेला असतो. बाकी तळाच्या ९८ टक्क्यांचं नेतृत्व हळूहळू उदयाला येत असते. या नव्या नेतृत्वाची वर येण्याची सतत धडपड चालू असते. शिवाय फसणारे आणि फसलेले अनेक प्रयोग नवीन शक्यता जन्माला येण्याची क्षमता धरून असतात. हे लोकांपर्यंत पोहोचण्याने लोकशाहीचं अभिसरण होत राहातं; परंतु हे सारे प्रयोग बहुतांश लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. एक नेतृत्व घडत जात असताना त्याची प्रक्रिया लोकांपर्यंत पोचवणे हे माध्यमांचं महत्त्वाचं काम आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातले प्रयोग आणि त्यांच्या प्रक्रिया माध्यमांमध्ये प्रतिबिंबित होत राहिल्याने माध्यमं ही समाजात अनेक सकारात्मक बाबींची घुसळण करणारी वाहक बनतात. लोकशाही प्रक्रिया बलवान करण्यासाठीही हे आवश्यकच असतं; परंतु माध्यमांचा महापूर आलेल्या आजच्या युगात अशा प्रकारच्या घुसळणीला निमित्त होताना माध्यमं क्वचितच दिसतात. कुठल्याही क्षेत्रातलं नेतृत्व पूर्णपणे उदयाला आल्यावर माइकचे बोंडुकले घेऊन मागून धावणारी माध्यमे त्या उदयाच्या प्रक्रियेबाबत बरीचशी तटस्थ आणि कुतूहलहीन असतात. कित्येकदा माध्यमांची ही असंवेदनशीलता इतकी अस्वस्थ करणारी असते की, वरच्या दोन टक्क्यांच्या तुलनेत इतर ९८ टक्क्यांच्या अस्तित्वाला माध्यमं गृहीत धरतात की नाही असा प्रश्न पडतो. माध्यमांच्या सध्याच्या कल्लोळात त्यांची ताकद एवढी वाढलेली आहे की, समाजातल्या पृष्ठभागाखालच्या ९८ टक्क्यांच्या आयुष्यांना घुसळून काढण्याची क्षमता कधी नव्हे एवढी माध्यमांना प्राप्त झालेली आहे; पण या ताकदीचा वापर पृष्ठभागाखाली

घुसळण करण्यासाठी क्वचितच होतो. याउलट 'पेज थ्री' हा जणू माध्यमांचा ऑक्सिजनच बनलेला आहे.

संसद आणि न्यायपालिका या लोकशाहीतल्या इतर दोन स्तंभांना प्रभावित करण्याची क्षमता प्रिंट, विशेषत: इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी आज प्रचंड वाढवलेली आहे; पण त्याचे काही भीषण दुष्परिणामही घडून आले आहेत. सामाजिक, आर्थिक वा राजकीय अपराधात संशयित आरोपी म्हणून ज्यांना पकडण्यात येतं, त्यांना न्यायपालिकांनी आरोपी म्हणून, किंवा निर्दोष म्हणून घोषित करण्याअगोदरच आरोपी म्हणून माध्यमांकडून प्रोजेक्ट केलं जायला लागतं. कुणावरतरी गंभीर आरोप करण्यात आणि त्या गुन्ह्याच्या प्रक्रियेच्या वेगवेगळ्या कल्पना इलेक्ट्रॉनिक मीडियातून मांडण्यात प्रचंड रंजकतेचं मूल्य निर्माण होतं. एखादी व्यक्ती वा गट निर्दोष असल्याचं मांडण्यातून फारशी रंजकता निर्माण होत नाही. त्यामुळे सरकारी वकील, संशयितावर आरोप करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना मीडियामध्ये प्रचंड किंमत येते. माध्यमांच्या या आक्रमणामुळे नैसर्गिक न्यायाचे तत्त्व लयाला जात असते. बचावपक्षाची स्थिती केविलवाणी होते. संशयित दहशतवाद्यांच्या संदर्भात ही प्रचीती वारंवार येते. न्यायालयं ही कितीही तटस्थ आणि नि:पक्षपाती असली तरी न्यायाधीश व तिथे काम करणारी माणसं हीसुद्धा अखेर सूक्ष्मपणे आणि अबोध पातळीवर माध्यमांच्या राक्षसी शक्तीच्या दबावाखाली येऊ शकतात, हा आजच्या माध्यमकल्लोळातला सर्वांत मोठा धोका आहे.

दुसऱ्या बाजूला अभ्यास न करता प्रिंट मीडियात छापून आलेल्या किंवा इलेक्ट्रॉनिक मीडियात दाखवलेल्या मुद्द्यांवर संसदेमध्ये हल्लागुल्ला करणाऱ्या संसदसदस्यांची संख्या वाढते आहे. यातील सर्वांत मोठा धोका म्हणजे अप्रत्यक्षरित्या संसदेचं व्यासपीठ वापरणारे गट माध्यमांमार्फत आपला कार्यभाग साधू शकतात. या प्रकारच्या अप्रत्यक्ष 'लॉबिंग'मध्ये पृष्ठभागाखालचे जनतेचे प्रश्न उपेक्षित रहातात. शिवाय खासदारांवरही 'पेज थ्री'चा प्रभाव पडण्याचा धोका निर्माण झाला आहे! उदाहरणार्थ, स्मृती इराणींना अचानक भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारणीत स्थान मिळून लोकसभेचं तिकीट मिळणं किंवा अरुण जेटलींचा सर्व आविर्भावच जनतेसाठी नसून कॅमऱ्यासाठी असतो, हे लक्षात येण्याएवढं बटबटीत होत जाणं हा माध्यमांचा, त्यातही इलेक्ट्रॉनिक माध्यमांचाच प्रभाव आहे. पण हा संसदेला हितकारी आहे असं नव्हे!

वास्तविक प्रिंट माध्यमांना *(म्हणजे वृत्तपत्रांना)* इलेक्ट्रॉनिक वृत्तमाध्यमांनी जोरकस स्पर्धा निर्माण केली आहे, असं अजिबात नव्हे. या दोन्ही माध्यमांचं कार्यक्षेत्र

अगदी वेगळं आहे. मुंबईत पूर आल्यावर त्याची थेट क्षणचित्रे दाखवण्याचं किंवा वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला झाल्यावर त्याची क्षणचित्रं दाखविण्याचं सामर्थ्य इलेक्ट्रॉनिक मीडियात आहे, प्रिंट मीडियात नाही; परंतु अशा घटनांचं संपूर्ण विश्लेषण समोर आणण्याचं सामर्थ्य इलेक्ट्रॉनिक मीडियापेक्षा प्रिंट मीडियात प्रचंड जास्त आहे. छापून येणाऱ्या गोष्टींचं आयुष्यसुद्धा खूप जास्त असतं. त्यात वैचारिक धक्का देण्याची ताकदही बरीच जास्त असते; पण या साऱ्याची योजना तितकीच परिणामकारक रीतीने व्हावी लागते. गंमत म्हणजे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये घटना थेट दिसते म्हणून ती विश्वासार्हच असते हे मिथक आहे, हे लक्षात येतं. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्येसुद्धा दृष्टीभ्रम आणि सत्यअसत्याचे बेमालूम मिश्रण करून धडधडीत असत्य रिपोर्ट दाखवता येतात, हे मानवी चमत्काराचं अजून एक स्वरूप आहे! पुरापासून ते पक्षफुटींपर्यंत अनेक वेळा इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये अतिरंजित बातम्या दिसतात. त्या बऱ्याचदा घटना घडण्याअगोदरच बातम्या दाखवण्याच्या 'सबसे तेज' हव्यासापोटी. त्यामध्ये पाहाणाऱ्याला आणि वाचणाऱ्याचा विवेक हीच निर्णायक शक्ती ठरते. अन्यथा गणपती दूध पितो, पुन्हा पूर आला आहे, अमक्या तमक्या ठिकाणी दणादण बॉम्बस्फोट होताहेत अशा चक्षुचमत्कारिक बातम्यांच्या पुरामुळे, भेदरलेल्या माणसांची पळापळ अटळ असते. यात पुन्हा प्रिंटमध्ये ज्याला चुकीच्या बातमीने मनस्ताप होतो, त्याचा खुलासा बारीक होऊन आतल्या पानात खोल खोल तरी जातो. इलेक्ट्रॉनिक माध्यमात आदल्या दिवशीच्या विपर्यस्त बातम्यांचे खुलासे दुसऱ्या दिवशी करण्याची पद्धत नाही. माध्यमांच्या सरंजामी दादागिरीचेच हे उत्तम उदाहरण आहे.

माध्यमक्रांतीचा इलेक्ट्रॉनिक माध्यमातला सर्वांत जास्त भाग व्यापलेला आहे तो मेलोड्रामायुक्त मालिका सादर करणाऱ्या प्रोग्रॅमिंग चॅनल्सनी. या वाहिन्यांची लोकप्रियता अपार आहे; पण त्यांच्याबद्दल लिहिण्यासारखे फार थोडे आहे. माणूस हाच एक प्राणी एकाच जोडीदाराबरोबर लैंगिक आयुष्य घालवण्याचा आटापिटा करणारा प्राणी आहे; परंतु माणूस याच एका प्राण्याने अनेक प्रकारचे लैंगिक वाङ्मय आणि लैंगिक साधनांना जन्म दिलेला आहे. माणसाचे हे परस्परविपरीत वर्तन त्याच्या वेगवेगळ्या निर्मितीमधून वारंवार दिसतं. हेच सारे मालिकातून दाखवणाऱ्या वाहिन्या प्रचंड धंदा करतात. लोकांना त्या मालिका आवडतात. त्यांचा वास्तवाशी काहीही संबंध नसतो. किंबहुना, त्यांचा कशाशीच संबंध नसतो. त्यांचा संबंध असतो तो वाहिन्यांच्या मार्केटिंग डिपार्टमेंटशी आणि पाहणाऱ्यांच्या कॅथार्सिसशी.

परंतु हे सारे असले तरीही प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधील क्रांती आणि संख्यात्मक महापूर हा लोकशाहीला अप्रत्यक्षरित्या बलवान करणाराच आहे. कारण या महापुरावर कुणाचेच नियंत्रण नाही. तसे ते ठेवणे शक्यही नाही. शिवाय हितसंबंधामध्येही एकसंधता आता निर्माण होऊ शकत नाही. उलट गुंतागुंतच होते. त्यामुळे ग्राहक हाच पुढे पुढे न्यायाधीश, वकील आणि आरोपी या तिन्ही भूमिकेत असणार आहे. आता तो न्यायाधीशाच्या भूमिकेतल्या आरोपीसारखा असला तरी अजून दहा वर्षांनी तो आपली वास्तविक भूमिका समजून चुकेल. त्याला कारण प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियातली ही क्रांती किंवा कल्लोळच असेल.

हा आशेचा शेवट नसून विश्लेषणाची सुरुवात आहे!

■

महाराष्ट्र टाइम्स *(दिवाळी)* २००५